नागपूर मुख्य कार्यालय
कॉटन मार्केट, नागपूर -४४००१८

संपर्क
संपादकीय : ९९२२९७००२३
वितरण : ८८८८६४७७५३
जाहिरात : ७४४७७३५८५१ / ९३२६९०६०६२
नागपूर कार्यालय संपर्क : ७४४७७३५८५१

नागपुर, अकोला, अमरावती, खामगांव, यवतमाळ, वर्धा, गडचिरोली, वाशीम, भंडारा, गोंदिया, मुंबई, पालघर (ठाणे), नाशिक आणि चंद्रपूर महासागर

# महासागर

Epaper: www.epaper.dainikmahasagar.in nagpurpost@gmail.com / mahasagarngp@gmail.com

* वर्ष ५२ * अंक १७८ * * अकोला * बुधवार, दिनांक ३१ डिसेंबर २०२५ ८ पाने ● किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.) * विशेष ऑफर : महासागर + नागपूर पोस्ट = ४ रु. फक्त

## आसाममध्ये प्रमुख जिहादी मॉड्यूल उध्वस्त

■ **वृत्तसंस्था, गुवाहाटी, दि. ३० :** केंद्रीय एजन्सी आणि इतर राज्यांतील सुरक्षा युनिट्ससोबत संयुक्त कारवाईत, आसाम पोलिसांनी आयएमके (इमाम महमूदे काफिला) नावाच्या सक्रिय जिहादी मॉड्यूलचा पर्दाफाश केला आहे. हे नेटवर्क राज्यात कट्टरपंथी कारवायांना प्रोत्साहन देण्यात आणि तरुणांना अतिरेकीपणाकडे आकर्षित करण्यात बराच काळ गुंतलेले होते.

या कारवाईचा भाग म्हणून आसाम आणि त्रिपुरामध्ये अनेक छापे टाकण्यात आले, ज्यात आसाममधील बारपेटा आणि चिरांग जिल्ह्यांमध्ये छापे टाकण्यात आले. एकूण ११ आरोपींना अटक करण्यात आली. त्यापैकी दहा आसामचे आणि एक त्रिपुराचा होता.

## दिग्गी राजा का भडकले?




दिग्विजय सिंग उर्फ दिग्गी राजा सध्या राहुल गांधी यांच्यावर भडकलेले दिसतात. आयुष्यभर काँग्रेसमध्ये राहून केंद्रीय मंत्री, मुख्यमंत्री आणि काँग्रेस मधील इतर मोठमोठी पदे उपभोगल्यावर त्यांना अचानक राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या शिस्तीची आठवण झालेली आहे. ते मध्य प्रदेशचे मुख्यमंत्री असताना त्यांचा कारभार अत्यंत ढिसाळ होता. त्या काळात मध्य प्रदेशातील मार्गांवर खड्डे नव्हते तर, मोठमोठ्या खड्ड्यातच अनेक महामार्ग आणि रस्ते होते. अशा अनेक बाबी होत्या की ज्यावर त्यांनी लक्ष दिले नाही. तरीही दरवर्षी ते विठ्ठलाच्या देवळात येत असायचे असे ते महान विठ्ठल भक्त होते. त्यांनी काँग्रेस पक्षाची धुरा सांभाळण्यासाठी प्रयत्न केले नव्हते असे नाही, मात्र त्यांच्या टिप्पण्यांमुळे अनेक वादविवाद होत असत. कोणत्याही परिस्थितीत अगदी आत्ता आत्तापर्यंत ते काँग्रेस पक्षाचे प्रभावी नेते होते मात्र, आता वयोमानानुसार त्यांना देण्यासाठी काँग्रेसकडे पदे नसल्याने दिग्गी राजांची चिडाचीड स्वाभाविक आहे. सध्या काँग्रेसचा कारभारही वेगळ्या दिशेने सुरू आहे काँग्रेसच्या कार्यालयात भारतीय जनता पक्षाचे अनेक स्लीपर सेल आहेत असे म्हणतात, खरेखोटे त्या विठ्ठलालाच माहित असावे. दिग्गीराजांनी जे मुद्दे उचलले ते बरोबरच होते म्हणजेच काँग्रेसमध्ये शिस्त येण्याची गरज आहे असे त्यांना सांगायचे होते. त्यासाठी त्यांनी संघाचे उदाहरण दिले आता संघ आणि राहुल गांधी यांचा ३६ चा आकडा सर्वांनाच ठाऊक आहे त्यातच त्यांच्या म्हणण्याला शशी थरूर यांनी दुजोरा दिला. त्यामुळे तर काँग्रेस पक्षात चांगलीच खळबळ उडवणारे विधान करताना कसेही करून आपले अस्तित्व दाखवण्याचे कार्य दिग्गी राजाने केले. आता आजच्या घडीला राहुल गांधी यांच्याऐवजी प्रियंका गांधी अधिक प्रभावी नेत्या होऊ शकतात असे काँग्रेसचे अनेक नेते खाजगीत बोलत असतात. राहुल गांधी यांना सर्वमान्य नेता करण्यासाठी जे वातावरण पाहिजे ते काँग्रेसमध्ये दिसत नाही. मात्र प्रियंका गांधी सर्व समावेशक होऊ शकतात असे सर्रास ठिकाणी बोलले जाते. दिग्गी राजांना काँग्रेसमधील या अंतर्गत गोष्टींची चांगलीच कल्पना आहे त्यामुळेच त्यांनी ही हिंमत केली असावी. दिग्विजय यांच्याजवळ सध्या गमावण्यासारखे काहीच नाही कदाचित त्यामुळेच आता ते स्पष्टवक्तेपणा दाखवून हिरो बनण्याचे कार्य पार पाडत असतील. आणि त्यातूनच आपले अस्तित्व दाखवण्याचे कार्य करत असतील, असेच म्हणावे लागेल.

mahasagarngp@gmail.com
Mob. No. 9922970023

# १४ शहरात युती टाय टाय फिस्स..
# अखेरच्या दिवशी राडा!

■ **महासागर प्रतिनिधी नागपूर / मुंबई, दि. ३० :** राज्यातील २९ महानगर पालिकांच्या निवडणुकांसाठी उमेदवारी अर्ज भरण्याच्या शेवटच्या दिवशी राजकीय वातावरण कमालीचे तापले. एबी फॉर्म मिळवण्यासाठी सर्वच प्रमुख पक्षांच्या कार्यालयांमध्ये प्रचंड झुंबड उडाली.

अनेक ठिकाणी इच्छुकांना डावलल्याने नाराजी उसळली, तर काही ठिकाणी कार्यकर्त्यांनी थेट पक्ष नेतृत्वालाच आव्हान दिले. निष्ठावंतांना बाजूला सारून नव्याने पक्षात आलेल्यांना उमेदवारी देण्यात आल्याने राज्यभर गोंधळाचे आणि बंडखोरीचे चित्र दिसून आले.



### महिला उमेदवाराची रडारड

पुणे महानगरपालिका निवडणुकीसाठी अर्ज दाखल करण्यासाठी अवघे काही तास शिल्लक असताना पुण्यात राजकीय खळबळ उडाली आहे. प्रभाग क्रमांक ३ मधून शिवसेनेकडून (शिंदे गट) इच्छूक उमेदवार पद्मा शेळके यांनी त्यांचा अधिकृत एबी फॉर्म दुसऱ्याच कुणीतरी चोरून नेल्याचा आरोप केला आहे. पक्षाने आपल्याला उमेदवारी जाहीर केली होती, मात्र फॉर्म हातात येण्यापूर्वीच तो गायब झाल्याने पद्मा शेळके यांनी उपस्थित माध्यमांसमोर टाहो फोडला.

दरम्यान, राज्यातील २९ पैकी १४ मनपामध्ये भाजपा, शिंदेसेना आणि राकाँ अजित पवार गट यांची युती फिस्कटली आहे.

मुंबई, पुणे, छत्रपती संभाजीनगर, लातूर, नाशिकसह अमरावती, अकोला आणि नागपूर या महापालिकांमध्ये अर्ज दाखल करण्याच्या दिवशी हायव्होल्टेज राजकीय ड्रामा पाहायला मिळाला. तिकीट नाकारल्याने अनेकांनी थेट विरोधी पक्षांचा रस्ता धरला, तर काहींनी अपक्ष म्हणून मैदानात उडी घेतली.

**मुंबईत बंडखोरीचा स्फोट**

मुंबई महापालिकेत ठाकरे बंधू विरुद्ध शिवसेना-भाजप युती विरुद्ध काँग्रेस-वंचित बहुजन आघाडी अशी मुख्य लढत रंगणार आहे. शिवसेना, भाजप, काँग्रेस, मनसे आणि ठाकरे गटाने सोमवारी रात्री उशिरा एबी फॉर्म दिल्याने आज मोठ्या संख्येने अर्ज दाखल झाले. मात्र तिकीट न मिळालेल्या इच्छुकांनी बंडाचा झेंडा फडकावला.

पुणे, नाशिकसह अनेक मनपामध्ये आता भाजपा आणि शिंदेसेना एकमेकांच्या विरोधात उभे ठाकले आहेत. पुण्यात शिंदेसेना सर्व १६५ सर्व जागा लढवण्याच्या तयारीत असल्याचे सांगण्यात येते.

दरम्यान, २ जानेवारीनंतर या निवडणुकीच चित्र स्पष्ट होईल.

## काँग्रेस-वंचित आघाडीला जमिनीवरचा धक्का

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ३० :** मुंबई महापालिका निवडणुकीसाठी मोठ्या गाजावाजात जाहीर करण्यात आलेली काँग्रेस-वंचित बहुजन आघाडी प्रत्यक्ष मैदानात मात्र अडचणीत सापडल्याचे चित्र आहे. वंचित बहुजन आघाडीला वाट्याला आलेल्या ६२ जागांपैकी १६ जागांवर उमेदवारच उपलब्ध नसल्याचे उघडकीस आले आहे.

काँग्रेस आणि वंचित यांच्यात १४३-६२ असा जागावाटपाचा फॉर्म्युला जाहीर करण्यात आला होता. काही जागा राष्ट्रीय समाज पक्ष आणि यांनाही देण्याचे ठरले होते. मात्र, उमेदवारी अर्ज भरण्याच्या अखेरच्या दिवशी वंचितने १६ ठिकाणी उमेदवारच दिले नाहीत. अंतिम क्षणी काँग्रेसकडेही कोणतेच पर्याय नसल्याने तेथे काँग्रेसही उमेदवार देवू शकले नाहीत. परिणामी, या १६ जागा भाजपा-शिंदेसेनेला आयत्याच मिळाल्याची चर्चा आहे. वंचितकडून उमेदवारांची कमतरता पुढे आल्याने काँग्रेसला आपली निवडणूक रणनीती पुन्हा आखावी लागण्याची शक्यता निर्माण झाली आहे. वंचितकडून १६ जागा परत आल्याने त्या वॉर्डांमध्ये काँग्रेस उमेदवार देणार की इतर मित्रपक्षांना संधी देणार, याबाबत अद्याप स्पष्टता नाही.

## बांगलादेशच्या माजी प्रधानमंत्री खालिदा झिया यांचे निधन

■ **वृत्तसंस्था, ढाका, दि. ३० :** बांगलादेशच्या पहिल्या महिला पंतप्रधान आणि बांगलादेश नॅशनलिस्ट पार्टीच्या प्रमुख खालिदा झिया यांचे आज सकाळी ६ वाजता वयाच्या ८० व्या वर्षी निधन झाले. त्या २० दिवसांपासून व्हेंटिलेटरवर होत्या.



खालिदा गेल्या अनेक वर्षांपासून छातीत संसर्ग, यकृत, मूत्रपिंड, मधुमेह, संधिवात आणि डोळ्यांच्या समस्यांनी ग्रस्त होत्या. त्यांच्या कुटुंबियांनी आणि पक्षाच्या नेत्यांनी त्यांच्या मृत्यूची पुष्टी केली. खालिदा यांनी १९९१ ते १९९६ आणि २००१ ते २००६ असे दोनदा बांगलादेशचे पंतप्रधान म्हणून काम पाहिले. त्या माजी राष्ट्रपती झियाउर रहमान यांच्या पत्नी होत. त्यांचा मोठा मुलगा, बीएनपीचे कार्यवाहक अध्यक्ष तारिक रहमान २००८ पासून लंडनमध्ये राहत होते. ते २५ डिसेंबर रोजी बांगलादेशला परतले. त्यांचा धाकटा मुलगा अराफत रहमान याचे २०१५ मध्ये हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले.

खालिदा झिया यांनी सोमवार २९ डिसेंबर रोजी आपला उमेदवारी अर्ज दाखल केला.

त्यावेळी, खालिदा झिया यांची प्रकृती अत्यंत गंभीर असल्याचे स्पष्ट झाले होते. त्या व्हेंटिलेटरवर होत्या. तरीही, बीएनपीने खालिदा निवडणूक लढवतील असा निर्णय घेतला. तथापि, आज सकाळी त्यांचे निधन झाले.

## मुंबईत १३ प्रवाशांना बेस्ट बसने चिरडले

### चौघांचा मृत्यू : भांडूप रेल्वेस्थानक परिसरातील बस डेपोजवळील घटना

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ३० :** भांडूप रेल्वेस्थानक परिसरातील बस डेपोजवळ सोमवारी रात्रीच्या सुमारास बेस्टच्या इलेक्ट्रिक बसवरील चालकाचे नियंत्रण सुटल्याने बसने १३ प्रवाशांना ठोकरले. या हृदयद्रावक अपघातात ४ जणांचा मृत्यू झाला असून ९ जण जखमी झाले आहेत. मृतांमध्ये दोन महिलांचा समावेश असून त्या कामावरून घरी परतत होत्या.



सोमवारी रात्री १० च्या सुमारास स्थानक परिसरात प्रवाशांची मोठी गर्दी असताना बसवरील चालकाचे नियंत्रण सुटले. अनियंत्रित बसने रांगेत उभ्या असलेल्या प्रवाशांना जोरात ठोकरले. सर्व जखमी प्रवाशांना एम. टी. अग्रवाल रुग्णालयात हलवण्यात आले असता ३ जणांना मृत घोषित करण्यात आले, तर राजावाडी रुग्णालयात एका ३१ वर्षीय अज्ञात महिलेचा मृत्यू झाला आहे. जखमींपैकी ५१ वर्षीय प्रशांत लाड यांची प्रकृती चिंताजनक आहे.

घटनेनंतर अग्निशमन दल आणि पोलिसांनी तातडीने बचावकार्य राबवले. बसखाली अडकलेल्यांना बाहेर काढून उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे. पोलिसांनी बस चालकाला ताब्यात घेतले असून तांत्रिक बिघाडामुळे हा अपघात झाला की मानवी चुकीमुळे, याचा सविस्तर तपास आता सुरू करण्यात आला आहे.

## सुप्रिया सुळे केंद्रात मंत्री होणार?

### प्रकाश आंबेडकरांच्या विधानाने चर्चांना उधाण : वडेट्टीवारांचाही दुजोरा

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ३० :** वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष प्रकाश आंबेडकर यांनी केलेल्या विधानामुळे राज्याच्या राजकारणात मोठी खळबळ उडाली आहे. सुप्रिया सुळे लवकरच केंद्रात मंत्री होतील, असे थेट भाकीत करत त्यांनी शरद पवारांकडून धक्कातंत्र वापरले जाईल, असे संकेत दिले. त्यामुळे महापालिका निवडणुकांपुरती मर्यादित असलेली चर्चा थेट राष्ट्रीय राजकारणापर्यंत पोहोचली आहे.



राज्यातील १४ ठिकाणी महायुती कोलमडली आहे. भाजप आणि शिवसेना अनेक महानगरपालिकांमध्ये थेट एकमेकांविरोधात उभ्या ठाकणार आहेत. दुसरीकडे, पुण्यात काँग्रेस आणि वंचित बहुजन आघाडीची युती तुटल्याची अधिकृत घोषणा झाली आहे.

पुण्यातील पाटीलकीमुळे आमचे आणि काँग्रेसचे पटले नाही, असे स्पष्ट करत प्रकाश आंबेडकर यांनी वंचित बहुजन आघाडीला स्वबळावर निवडणूक लढवण्याचे आदेश दिले आहेत.

युती तुटल्यानंतर माध्यमांशी बोलताना प्रकाश आंबेडकर यांनी थेट केंद्रातील सत्ताकारणावर भाष्य करत एक मोठा बॉम्ब टाकला. सुप्रिया सुळे लवकरच केंद्र सरकारमध्ये मंत्री होतील, असे भाकीत करत त्यांनी चर्चांना उधाण आणले.

या चर्चांना आणखी हवा देणारे वक्तव्य काँग्रेसचे ज्येष्ठ नेते विजय वडेट्टीवार यांनी केले आहे. त्यांनी थेट दावा करत सांगितले की, उद्योगपती गौतम अदानी अलीकडेच बारामतीला येऊन गेले होते. अदानी यांच्या मध्यस्थीने शरद पवार हे लवकरच एनडीएमध्ये सहभागी होण्याची शक्यता आहे.

### खासदार धानोरकर, जिल्हाध्यक्ष धोटे यांचे
## काँग्रेसच्या यादीवर वर्चस्व

**वडेट्टीवार समर्थकांचे तिकीट कापले**

■ **महासागर प्रतिनिधी चंद्रपूर, दि. ३० :** काँग्रेस विधीमंडळ नेते आमदार विजय वडेट्टीवार समर्थक काँग्रेसचे माजी शहर अध्यक्ष विद्यमान नगरसेवक नंदू नागरकर, प्रशांत दानव, प्रविण पडवेकर, सुनिता लोढीया, विना खनके, सकीना अंन्सारी यांचे तिकीट कापल्याने काँग्रेसमध्ये वाद उफाळला आहे. काँग्रेसच्या तिकीट वाटपात खासदार प्रतिभा धानोरकर यांचे एकतर्फी वर्चस्व राहिले तर वडेट्टीवार यांना समर्थकांना उमेदवारी मिळवून देण्यात अपयश आले आहे. काँग्रेस पक्षातील या गोंधळाने कार्यकर्ते संतापले आहेत.

मागील दोन दिवसांपासून काँग्रेसच्या उमेदवारीसाठी खासदार प्रतिभा धानोरकर, आमदार विजय वडेट्टीवार, ग्रामीण जिल्हाध्यक्ष सुभाष धोटे यांच्या बैठका अपक्ष आमदार सुधाकर अडबाले यांच्या निवासस्थानी सुरू होत्या. या यादीत खासदार प्रतिभा धानोरकर यांनी अतिशय पध्दतशीरपणे आमदार विजय वडेट्टीवार समर्थक उमेदवारांचा पत्ता कट केला.

२०१७ ची महापालिका निवडणुक सर्वाधिक मतांनी विजयी झालेले माजी शहर अध्यक्ष नंदू नागरकर यांना महाकाली प्रभागातून उमेदवारी नाकारण्यात आली. तर प्रशांत दानव यांना विठ्ठ मंदिर, सुनिता लोढीया यांना वडगाव, प्रवीण पडवेकर, विना खनके व सकीना अंसारी यांना एकोरी प्रभागातून उमेदवारी नाकारण्यात आली.

दरम्यान, काँग्रेस पक्षातील या अंतर्गत वादाचा फटका काँग्रेसलाच बसण्याची चर्चा रंगली आहे.



■ *नागपूर : महानगरपालिका निवडणुकीचा रणसंग्राम रंगण्यास सुरूवात झाली असून, मंगळवार हा उमेदवारी अर्ज सादर करण्याचा अखेरचा दिवस होता. भाजपाने आज त्यांच्या उमेदवारांना एबी फॉर्म दिल्यानंतर संबंधित उमेदवारांनी शक्तीप्रदर्शन करीत नामांकन भरले. यावेळी महिलांची संख्या लक्षणिय होती.*

# भाजपामध्ये पक्षप्रवेशासाठी चेंगराचेंगरी का?

### महासागर डिजिटल चर्चासत्रात मान्यवरांची रोखठोक चर्चा : प्रा.अशोक सोनवणे, वरिष्ठ पत्रकार जयंत महाजन, ॲड. निकिता पवार यांचा सहभाग

■ **स्वप्निल दुधारे, मुंबई, दि. ३० :** निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्रभरात पक्षप्रवेशाचा धुमाकूळ गेल्या काही दिवसात पाहतच होतो पण महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर गेली दोन दिवस याच पक्षप्रवेशाचा कार्यक्रम जोर धरू लागला आहे त्यातच नाशिकमध्ये तर सगळ्या पक्षातील नेते एकाच पक्षात आले अर्थातच भाजपामध्ये.

हे सगळे पुढारी विकास कामाला प्रभावित झाले की आगामी कुंभमेळ्याच्या मलिदाचा मोह यांना कारणीभूत ठरला याविषयी 'महासागर' (यू ट्यूब, टीव्ही ) डिजिटल माध्यमातून आयोजित या विशेष चर्चासत्रात राजकीय विश्लेषक लेखक तथा वरिष्ठ पत्रकार आणि सामाजिक क्षेत्रातील मान्यवरांनी सध्याच्या गलिच्छ राजकारणावर आणि यापूर्वीच्या राजकारणावर विचार मंथन केलं.

या चर्चासत्रात ज्येष्ठ विचारवंत प्रा. अशोक सोनवणे, वरिष्ठ पत्रकार प्रा. जयंत महाजन आणि राजकीय विश्लेषक तथा सामाजिक कार्यात अग्रेसर असणाऱ्या ॲड.निकिता पवार सहभागी झाले होते. महासागर डिजिटल चे संपादक स्वप्निल दुधारे यांनी या चर्चेचे निवेदन केलं.



चर्चेत सहभागी प्रा. अशोक सोनवणे यावेळी म्हणाले की स्वतःची राजकीय सोय कुठे लागेल असा विचार करून आज-काल एक राजकीय समूह तयार झाला असून यापूर्वीच राजकारण कसं होतं याचेही त्यांनी उदाहरण दिल. १९७२ च्या दुष्काळामध्ये तत्कालीन मुख्यमंत्री कै. वसंतराव नाईक दुष्काळ दौऱ्यावर असताना रोजगार हमीवर एक जोडपं काम करताना दिसलं आणि मुख्यमंत्र्यांना आश्चर्य वाटलं कारण तो काम करणारा व्यक्ती दुसरा तिसरा कोणी नसून अगोदरच्या विधानसभेचा सदस्य होता. म्हणजे त्याकाळी राजकारण हे पैशासाठी नव्हतं तर समाजासाठी होतं असं त्यांनी महासागरच्या चर्चासत्रात नमूद केलं.




त्याचबरोबर ज्येष्ठ पत्रकार तथा दै.महासागर, नाशिकचे निवासी संपादक प्राध्यापक जयंत महाजन यांनी नाशिक मधील पक्षप्रवेशा मागचं गूढ उकलत हा पक्षप्रवेश मोठ्या प्रमाणात का होतो हे सांगितलं. त्याचबरोबर आगामी कुंभमेळाच्या पार्श्वभूमीवर येणारा भरमसाठ निधी लाटण्यासाठी सगळ्यांचे लक्ष या महापालिका निवडणुकीत गुंतल असून त्यातून माझं कसं भलं होईल हाच उद्देश डोळ्यासमोर ठेवून हे पक्षप्रवेश मोठ्या प्रमाणात झाल्याचं त्यांनी या चर्चासत्रात सांगितलं.

(महाराष्ट्रभरातील सर्व राजकीय विश्लेषण आणि घडामोडी पाहण्यासाठी आजच महासागर न्यूज ला सबस्क्राईब करा तसेच वरील चर्चासत्र लाईव्ह पाहण्यासाठी सोबत असलेल्या स्कॅनर वरती स्कॅन करा )

या चर्चासत्रात पंढरपूर वरून सहभागी झालेल्या ॲड निकिता पवार यांनी यापूर्वीच्या निवडणुकीवर प्रकाश टाकत सांगितलं की पूर्वी पंढरपुरात निवडणुकीसाठी भाजपाचे आलेले कार्यकर्ते हे आम्ही निवडून आलो तर काय करू आणि आमची काय विचारधारा आहे हे लोकांकडे सांगायचे आणि त्यावेळी आठवडाभराच्या मुक्कामात ते आमच्या घरी देखील मुक्काम करायचे अशी आठवण त्यांनी करून दिली त्याचबरोबर नुकत्याच झालेल्या नगरपरिषद निवडणुकीमध्ये एका निष्ठावंत महिलेला केवळ तिची आर्थिक परिस्थिती ठीक नसल्यामुळे पक्षाने तिकीट दिलं नाही हे देखील त्यांनी या चर्चासत्रात नमूद केलं.

## २०२६ मध्ये भारत-पाक युद्धाची शक्यता

**अमेरिकन थिंक टँकचा दावा**

■ **वृत्तसंस्था, वॉशिंग्टन, दि. ३० :** अमेरिकेच्या मोठ्या थिंक टँक 'कौन्सिल ऑन फॉरेन रिलेशन्स'ने इशारा दिला आहे की २०२६ मध्ये भारत आणि पाकिस्तान यांच्यात पुन्हा युद्ध होऊ शकते. 'कॉन्फ्लिक्ट्स टू वॉच इन २०२६' या अहवालानुसार, काश्मीरमधील दहशतवादी कारवाया वाढल्याने दोन्ही देशांमध्ये संघर्षाची शक्यता आहे.

अहवालात म्हटले आहे की, जर भारत-पाकिस्तानमध्ये संघर्ष झाला, तर त्याचा अमेरिकेच्या हितांवरही मध्यम स्तरापर्यंत परिणाम होऊ शकतो. जरी जम्मू-काश्मीरमध्ये अद्याप कोणताही मोठा दहशतवादी हल्ला झाला नसला तरी, गुप्तचर संस्थांनुसार या हिवाळ्यात जम्मू प्रदेशात ३० हून अधिक पाकिस्तानी दहशतवादी सक्रिय आहेत.

दरम्यान, भारत-पाकिस्तानमध्ये झालेल्या शस्त्रसंधीनंतरही दोन्ही देशांनी शस्त्रास्त्रांची खरेदी वाढवली आहे. भारतातील संरक्षण अधिग्रहण परिषदेने अलीकडेच ७९ हजार कोटी रुपयांच्या संरक्षण करारांना मंजुरी दिली आहे, ज्यात ड्रोन, एअर-टू-एअर क्षेपणास्त्रे आणि गाइडेड बॉम्ब यांचा समावेश आहे.

तिकडे पाकिस्ताननेही तुर्कस्तान आणि चीनकडून नवीन ड्रोन आणि एअर डिफेन्स सिस्टीम खरेदी करण्यासाठी चर्चा सुरू केली आहे, जेणेकरून कमतरता दूर करता येतील.



## खासदार नरेश म्हस्केंना झटका मुलाचे तिकीट कापले




■ **मुंबई :** उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वातील शिवसेनेने खासदार नरेश म्हस्के यांच्या मुलाला उमेदवारी नाकारत त्यांना जोरदार झटका दिला आहे. यामुळे ठाण्यातील आनंद आश्रमाबाहेर नरेश म्हस्के यांच्या कार्यकर्त्यांची गर्दी जमली असून, ते आपला वेगळा निर्णय घेतील असा दावा केला जात आहे.

शिवसेनेचे ठाण्याचे खासदार नरेश म्हस्के यांचा मुलगा आशुतोष म्हस्के यांनी ठाणे महापालिका निवडणुकीसाठी तयारी केली होती. ते प्रभाग क्रमांक १९ मधून निवडणूक लढवणार होते. यासाठी त्यांनी या प्रभागात कार्यकर्त्यांची एक मोठी फळी उभी केली होती. तसेच प्रचारही सुरू केला होता. विशेषतः स्वतः खासदार नरेश म्हस्के यांनीही आपल्या मुलाच्या उमेदवारीसाठी जोर लावला होता. पण पक्षाने ऐनवेळी आशुतोष म्हस्के यांना तिकीट नाकारून त्यांना झटका दिला.


दुसरीकडे, ठाण्याच्या मुंब्रा येथील ४ माजी नगरसेवकांनी आज शिंदे गटाला सोडचिठ्ठी देऊन अजित पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश केला आहे. राजन किने, अनिता किने, मोरेश्वर किने व अन्य एका माजी नगरसेवकाने राष्ट्रवादीचा एबी फॉर्म स्वीकारला आहे. राजन किने यांचे मुंब्रा येथे शिवसेना वाढवण्यात मोठे योगदान होते. त्यामुळे त्यांनी शिंदे गटाला सोडचिठ्ठी दिल्यामुळे राजकीय समीकरण बदलण्याची शक्यता आहे.

## 'एमसीए'च्या विशेष कामगिरीची दखल घेणे आवश्यक



■ **पुणे :** राज्यातील नवोदित क्रिकेटरांना योग्य संधी देण्यात महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशन अर्थात एमसीए यशस्वी ठरली आहे. संघटनेच्या गेल्या कार्यकाळातील विशेष कामगिरीची दखल 'खेळाडूवृत्ती'ने घेणे आवश्यक आहे, असे मत इंडिया अगेस्ट करप्शनचे राष्ट्रीय अध्यक्ष आणि क्रिकेट प्रेमी हेमंत पाटील यांनी मंगळवारी व्यक्त केले.
जानेवारीत एमसीएच्या निवडणुका होवू घातलेल्या आहेत. अशात लोढा समितीच्या शिफारसी नूसार ज्या पदाधिकाऱ्यांचा कार्यकाळ संपला आहे, त्यांनी स्वतःहून बाहेर पडले पाहिजे. असोसिएशनचे अध्यक्ष रोहित पवार यांनी याकडे विशेष लक्ष देण्याची गरज आहे, असे मत पाटील यांनी व्यक्त केले. येत्या निवडणुकीत नवीन लोकांना संधी देणे आवश्यक आहे, असे पाटील म्हणाले.
एमसीएचा गेला तीन वर्षांचा कार्यकाळ समाधानकारक ठरला असून, महाराष्ट्र प्रीमियर लीग मुळे असोसिएशनच्या तिजोरीत भर पडला आहे. राज्यातील नवोदित खेळाडूंना चांगले व्यासपीठ मिळाले. महिला संघाला देखील संधी मिळाल्याने राज्यातील क्रिकेट विश्वास समाधानकारक वातावरण आहे, असे पाटील म्हणाले. विश्वासाचे हे वातावरण कायम राखण्याची जवाबदारी संघटनेच्या पदाधिकाऱ्यांची आहे. एमसीए च्या कारभारात आणखी पारदर्शकता त्यामुळे आणली पाहिजे, असे पाटील म्हणाले.

## मुंबईत प्रकाश सुर्वेंना शिवसैनिकांनी दाखवले काळे झेंडे



■ **मुंबई :** महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राज्यात राजकीय वातावरण चांगलेच तापले आहे. मुंबईत एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेचे आमदार प्रकाश सुर्वे यांना शिवसैनिकांकडून काळे झेंडे दाखवण्यात आले आहेत. मुंबई महापालिका निवडणुकीचा प्रभाग क्रमांक 3 भाजपला सोडल्याने नाराज शिवसैनिकांनी प्रकाश सुर्वे यांच्या विरोधात जोरदार निदर्शने केली.
मुंबई महापालिकेचा प्रभाग क्रमांक ३ मध्ये प्रकाश सुर्वे यांनी प्रकाश पुजारी यांना निवडणुकीसाठी तयारी करण्याच्या सूचना दिल्या होत्या. परंतु, ऐनवेळी हा वॉर्ड भाजप नेते प्रवीण दरेकर यांचे भाऊ प्रकाश दरेकर यांना सोडण्यात आला, यामुळे नाराज शिवसैनिकांनी आमदार प्रकाश सुर्वे यांच्या विरोधात निदर्शने केली.
मुंबई महापालिकेच्या निवडणुकीसाठीचा अर्ज भरण्यासाठी अवघा एक तास उरलेला असताना मागाठाणे विधानसभा मतदारसंघात शिवसेना शिंदे गटात असंतोष उफाळून आल्याचे पाहायला मिळाले. या मतदारसंघातील इच्छुक उमेदवार वैष्णवी पुजारी यांना डावलून बाहेरचा उमेदवार भाजपकडून लादण्यात आल्याने याचा निषेध करण्यासाठी शिंदे गटाचे शाखाप्रमुख प्रकाश पुजारी आणि त्यांच्या कार्यकर्त्यांकडून काळे झेंडे दाखवत आमदार प्रकाश सुर्वे आणि उमेदवार प्रकाश दरेकर यांचा निषेध नोंदवला.

# संभाजीनगरात महायुतीचा पोपट मेला

## भाजपचा हट्ट आणि अंहकार यामुळेच युती तुटली : शिरसाट यांचा थेट आरोप

■ **वृत्तसंस्था, छ. संभाजीनगर, दि. ३० :**
संभाजीनगरच्या राजकारणात मोठी उलथापालथ झाली असून, महायुती तुटल्याची अधिकृत घोषणा शिवसेना शिंदे गटाचे नेते तसेच मंत्री संजय शिरसाट यांनी केली आहे. भाजपचा हट्ट आणि अंहकार यामुळेच ही युती टिकू शकली नाही, असा थेट आणि तीव्र आरोप शिरसाट यांनी केला.



महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर संभाजीनगरमध्ये भाजपकडून सातत्याने दबावाचे राजकारण केले जात होते. जागावाटपात शिवसेनेला डावलण्याचा प्रयत्न झाला, स्थानिक नेत्यांचा सन्मान न राखता एकतर्फी निर्णय लादले जात असल्याचा आरोप त्यांनी केला.

शिरसाट म्हणाले की, महायुती ही समानतेच्या तत्वावर उभी असते, मात्र संभाजीनगरमध्ये भाजपने भागीदार पक्षाला गृहित धरले. अनेक बैठका, चर्चा आणि समन्वयाचे प्रयत्न करूनही भाजपकडून कोणतीही लवचिकता दाखवण्यात आली नाही. अखेर स्वाभिमान आणि कार्यकर्त्यांचा आत्मसन्मान जपण्यासाठी युती तोडण्याचा निर्णय घ्यावा लागला, असे त्यांनी स्पष्ट केले.

सत्ताधारी महायुतीमधील शिंदे गटाच्या शिवसेनेने भाजपसोबतची युती तोडण्याचा निर्णय घेतल्याची अधिकृत घोषणा मंत्री संजय शिरसाट यांनी पत्रकार परिषदेत केली. भाजपच्या भूमिकेमुळे आणि सातत्याने दाखवण्यात आलेल्या अहंकारी वृत्तीमुळेच हा निर्णय घ्यावा लागला, असा थेट आणि तीव्र आरोप त्यांनी केला. शिरसाट यांनी स्पष्ट केले की, संभाजीनगरमध्ये युती व्हावी, यासाठी राज्याच्या सर्वोच्च नेतृत्वाकडूनही गंभीर प्रयत्न करण्यात आले होते. मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांनी स्वतः लक्ष घालून युतीसाठी वातावरण तयार करण्याचा प्रयत्न केला. मात्र, सुरुवातीपासूनच भाजपच्या स्थानिक कार्यकर्ते आणि नेत्यांची भूमिका वेगळी असल्याचे जाणवत होते.


युतीबाबत बोलण्यात काही आणि प्रत्यक्ष कृतीत काही, अशी परिस्थिती निर्माण होत होती, ज्यामुळे शंका बळावत गेल्या, असे शिरसाट यांनी सांगितले.
युती वाचवण्यासाठी आपण स्वतः सातत्याने प्रयत्न केल्याचेही नमूद करीत ते म्हणाले, स्थानिक नेत्यांशी फोनवरून चर्चा करण्यात आल्या. चंद्रशेखर बावनकुळे यांच्यासोबतही सविस्तर बैठक झाली, असे त्यांनी स्पष्ट केले. या चर्चांमधून काही सकारात्मक संकेत मिळतील, अशी अपेक्षा होती. मात्र, बैठका आणि चर्चांनंतरही भाजपच्या भूमिकेत फारसा बदल झाला नाही. वरवर युतीबाबत सकारात्मक बोलले जात असले, तरी प्रत्यक्षात शिवसेनेला कमी लेखणारी भूमिका कायम राहिली, असा आरोप शिरसाट यांनी केला.

पत्रकार परिषदेत बोलताना संजय शिरसाट यांनी एक महत्त्वाचा खुलासा केला. त्यांनी सांगितले की, युतीबाबतचा अंतिम टप्पा आला असताना मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत जागावाटपावर सहमती झाली होती. त्या चर्चेनंतर युती निश्चित झाली, अशा समजुतीत शिवसेना होती. त्यामुळे कार्यकर्त्यांमध्येही सकारात्मक संदेश गेला होता. मात्र, प्रत्यक्षात जागावाटपाची अंमलबजावणी करण्याची वेळ आली, तेव्हा चित्र वेगळेच समोर आले. भाजपकडून शिवसेनेच्या जागाच सोडाव्यात, असा प्रस्ताव पुढे करण्यात आला, असे शिरसाट यांनी सांगितले.

भाजपने मांडलेला प्रस्ताव शिवसेनेच्या कार्यकर्त्यांसाठी अत्यंत अपमानास्पद असल्याचे शिरसाट यांनी स्पष्ट केले. शिवसेनेच्या ताकदीच्या जागा सोडण्याची मागणी करण्यात आली, जी कोणत्याही परिस्थितीत मान्य होऊ शकत नव्हती. आमच्या कार्यकर्त्यांचा स्वाभिमान आणि पक्षाची भूमिका लक्षात घेता असा निर्णय घेणे शक्य नव्हते, असे त्यांनी ठामपणे सांगितले. एकीकडे युतीबाबत चर्चा सुरू असल्याचे सांगायचे आणि दुसरीकडे शिवसेनेला कमकुवत करणारे प्रस्ताव मांडायचे, ही भाजपची दुहेरी भूमिका असल्याचा आरोप त्यांनी केला.

## घरातील मंडळींच्या राजकीय पुनर्वसनालाच शिंदेसेनेचे प्राधान्य

### युती तुटताच भाजपचे आरोप



छत्रपती संभाजीनगरमध्ये महायुती तुटल्याची घोषणा होताच काही तासांतच राजकीय वातावरण कमालीचे तापले असून भाजपने शिंदेसेनेवर जोरदार पलटवार करत थेट आरोपांची तोफ डागली आहे.

शहराच्या विकासाचा मुद्दा बाजूला ठेवून शिंदेसेनेने घरातील मंडळींच्या राजकीय पुनर्वसनालाच प्राधान्य दिले, त्यामुळेच युती जाणीवपूर्वक तोडण्यात आली, असा गंभीर आणि खळबळजनक आरोप राज्याचे ओबीसी कल्याण मंत्री अतुल सावे आणि माजी केंद्रीय मंत्री खासदार भागवत कराड यांनी केला आहे. महापालिका निवडणुकीच्या तोंडावर झालेल्या या आरोप-प्रत्यारोपांमुळे आता युतीचा मार्ग पूर्णपणे बंद झाला असून शहरात थेट आणि कट्टर राजकीय संघर्ष अटळ असल्याचे चित्र स्पष्ट झाले आहे.

भाजपचे नेते अतुल सावे यांनी युती तुटण्यामागील पडद्यामागची सविस्तर माहिती उघड करताना सांगितले की, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यात छत्रपती संभाजीनगर महापालिकेसाठी ३७ जागांचा फॉर्म्युला अंतिम झाला होता. या फॉर्म्युलावर दोन्ही पक्षांमध्ये शिक्कामोर्तबही झाले होते. मात्र, त्यानंतर स्थानिक पातळीवर शिंदेसेनेच्या नेत्यांकडून सातत्याने नव्या मागण्या पुढे येत राहिल्या. एकदा ठरलेल्या जागांवर पुन्हा दावा केला जाऊ लागला, विद्यमान भाजप नगरसेवक असलेल्या प्रभागांवरही शिंदेसेनेने हक्क सांगितला. वैयक्तिक हितसंबंध, नातेवाईकांचे समायोजन आणि विशिष्ट मंडळींच्या पुनर्वसनासाठी प्रस्तावांमध्ये वारंवार बदल सुचवले गेले, असा आरोप सावे यांनी केला.

सावे पुढे म्हणाले की, भाजपने युती टिकवण्यासाठी मोठ्या प्रमाणावर लवचिकता दाखवली. अनेक ठिकाणी तडजोडीची भूमिका घेतली, विकासाच्या दृष्टीने एकत्र लढण्याचा प्रयत्न केला. मात्र, शिंदेसेनेच्या नेत्यांच्या मागण्या दिवसेंदिवस वाढतच गेल्या.

आम्ही शहराच्या भविष्यासाठी निर्णय घ्यायचा प्रयत्न करत होतो, पण समोरच्यांना समाधान मिळत नव्हते. मागण्या पूर्ण करूनही त्यांची भूक भागत नव्हती, असा थेट आरोप करत सावे यांनी युती तुटण्याची संपूर्ण जबाबदारी शिंदेसेनेवर ढकलली.

दरम्यान, खासदार भागवत कराड यांनी शिंदेसेनेतील अंतर्गत विसंवादावर बोट ठेवत आणखी गंभीर चित्र समोर आणले. शिंदेसेनेत पालकमंत्री, खासदार, आमदार आणि जिल्हाध्यक्ष हे चारही प्रमुख नेते कधीही एका भूमिकेवर एकत्र आले नाहीत, असा आरोप त्यांनी केला. चार नेते आणि चार वेगवेगळ्या दिशा, अशी स्थिती कायम राहिली. मतभेदांमुळेच युतीबाबत स्पष्ट निर्णय होऊ शकला नाही, असे ते म्हणाले.


## भाजपच्या 'नो रिलेटिव्ह' धोरणाला राहुल नार्वेकर कुटुंब अपवाद

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ३० :**
मुंबई महानगरपालिका निवडणुकीत पारदर्शकता आणि सामान्य कार्यकर्त्यांना संधी देण्यासाठी भाजपने 'आमदार-खासदारांच्या नातेवाईकांना तिकीट नाही' असे कडक धोरण जाहीर केले होते.

मात्र, दक्षिण मुंबईच्या राजकारणात हे धोरण शिथिल झाल्याचे दिसत आहे. भाजपचे कद्दावर नेते आणि विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांच्या घरातील चक्क तीन सदस्यांना भाजपने उमेदवारी दिली आहे. या निर्णयामुळे पक्षात आणि राजकीय वर्तुळात उलट-सुलट चर्चा सुरू झाल्यावर खुद्द राहुल नार्वेकर यांनी या उमेदवारीवर स्पष्टीकरण दिले आहे.

आपल्या कुटुंबाला मिळालेल्या उमेदवारीवर टीका करणाऱ्यांना राहुल नार्वेकर यांनी सडेतोड उत्तर दिले आहे. उमेदवारी अर्ज दाखल केल्यानंतर माध्यमांशी बोलताना ते म्हणाले, ₹ज्यांना उमेदवारी मिळाली आहे, ते कोणीही पॅराशूट उमेदवार नाहीत. त्यांनी गेल्या १०-१५ वर्षांपासून जमिनीवर राहून लोकांसाठी काम केले आहे. लोकांचा त्यांच्या कामावर विश्वास आहे आणि मतदारांनी त्यांना स्वीकारले आहे. केवळ नातेवाईक आहेत म्हणून नव्हे, तर त्यांच्या कामाच्या जोरावर त्यांना पक्षाने पुन्हा संधी दिली आहे.

### एकाच घरात तिघांना उमेदवारी



राहुल नार्वेकर यांचे बंधून मकरंद नार्वेकर यांना भाजपने प्रभाग क्रमांक २२६ मधून पुन्हा संधी दिली आहे. मकरंद नार्वेकर यांच्या पत्नी हर्षिता यांना प्रभाग क्रमांक २२७ मधून रिंगणात उतरवण्यात आले आहे. तर, राहुल नार्वेकर यांच्या चुलत भगिनी गौरवी यांना प्रभाग क्रमांक २२५ मधून भाजपने उमेदवारी दिली आहे. स्वतः राहुल नार्वेकर हे कुलाबा मतदारसंघाचे आमदार असून सलग दुसऱ्यांदा विधानसभा अध्यक्षपदाची धुरा सांभाळत आहेत.

अशा स्थित्तीत एकाच कुटुंबात चार पदे गेल्याने चर्चेला उधाण आले आहे. दरम्यान, विधानसभा अध्यक्षांच्या उपस्थितीतच तिन्ही उमेदवारांनी आज शेवटच्या दिवशी आपला अर्ज दाखल केला.

## आठवलेंचा मुंबईत राजकीय बॉम्ब

### महायुतीने डावलल्याने रिंगणात उतरवले ३९ उमेदवार

■ **महासागर प्रतिनिधी मुंबई, दि. ३० :**
तासांपूर्वीमुंबई महानगर पालिका निवडणुकीसाठी जागावाटपाचा तिढा सुटत असतानाच, महायुतीमधील घटक पक्ष 'रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया'आठवले गटाने बंडाचे निशाण फडकवले आहे. भाजप आणि शिवसेनेने (शिंदे गट) आमच्याशी विश्वासघात केला आहे, असा घणाघाती आरोप करत रामदास आठवले यांनी मुंबईत स्वतंत्रपणे लढण्याची घोषणा केली. रिपाईने आज ३९ उमेदवारांची पहिली यादी प्रसिद्ध केली असून, मुंबईत दलित मतांच्या विभाजनामुळे भाजप-शिंदे सेनेची डोकेदुखी वाढणार आहे.

महायुतीच्या नेत्यांनी रिपाइंला ७ जागा देण्याचे आश्वासन दिले होते. यासंदर्भात मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री स्तरावर चर्चाही झाली होती. मात्र, भाजपने १३७ आणि शिवसेनेने ९० जागांची घोषणा केली, पण या यादीत रिपाईच्या एकाही उमेदवाराचे नाव समाविष्ट करण्यात आले नाही.



**आता मागे हटणार नाही**

प्रसारमाध्यमांशी बोलताना आठवले म्हणाले की, आम्ही शेवटपर्यंत संयम राखला. ७ जागांची आमची माफक मागणी होती, पण आम्हाला झुलवत ठेवण्यात आले. आमच्या कार्यकर्त्यांमध्ये प्रचंड संताप आहे. त्यामुळेच आम्ही मुंबईच्या अस्मितेसाठी आणि आमच्या हक्कासाठी ३९ जागांवर लढण्याचा निर्णय घेतला आहे.

अर्ज भरण्यासाठी अवघे काही तास शिल्लक असतानाही महायुतीकडून कोणताही प्रतिसाद न मिळाल्याने रामदास आठवले यांनी आक्रमक पवित्रा घेत, आपल्या पक्षाच्या ३९ उमेदवारांची यादी जाहीर केली.

मुंबईतील अनेक वॉर्डांमध्ये आंबेडकरी समाजाची मते निर्णायक आहेत. विशेषतः ईशान्य मुंबई, उत्तर-मध्य मुंबई आणि चेंबूर-भांडुप पट्ट्यात रिपाइंला मानणारा मोठा वर्ग आहे.

आजवर ही मते महायुतीच्या पारड्यात पडत होती. मात्र, आता रिपाईने ३९ उमेदवार मैदानात उतरवल्यामुळे दलित मतांचे विभाजन अटळ आहे. मुंबईच्या निवडणुकीत जिथे १००-२०० मतेही जय-पराजयाचे गणित बदलू शकतात, तिथे रिपाइंचा हा 'स्वबळ' पॅटर्न भाजप-सेनेसाठी धोक्याची घंटा ठरणार असल्याचे बोलले जात आहे.

## अजित पवारांची राष्ट्रवादी नाराजांसाठी हक्काचं ठिकाण

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ३० :**
भाजप आणि शरद पवारांच्या राष्ट्रवादीकडून उमेदवारी न मिळाल्याने नाराज झालेल्या कार्यकर्त्यांसाठी आता हे हक्काचं ठिकाण ठरत असल्याचे चित्र स्पष्ट झाले आहे. अपक्ष म्हणून लढण्यापेक्षा अजित पवारांची राष्ट्रवादी बरी, अशी भूमिका घेत नाराजांचा ओघ राष्ट्रवादी (अजित गट) कडे वळल्याने निवडणुकीच्या अखेरच्या दिवशी राजकीय नाट्य शिगेला पोहोचले आहे.

मुंबई महापालिका निवडणुकीत अजित पवारांची राष्ट्रवादी स्वतंत्र लढत देत असून, त्यामुळे इच्छुक आणि नाराज नेत्यांसाठी हा गट आकर्षणाचा केंद्रबिंदू ठरला आहे. तिकीटवाटपात संधी न मिळालेल्या भाजप तसेच शरद पवारांच्या राष्ट्रवादीतील अनेक पदाधिकारी आणि कार्यकर्ते अपक्षाची धावपळ नको, संघटित पक्षाची ताकद हवी म्हणत थेट अजित पवार गटातून उमेदवारीच्या प्रतीक्षेत दिसून आले.

आज दिवसभर यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या मुंबईतील कार्यालयाबाहेर कार्यकर्त्यांची आणि इच्छुक उमेदवारांची तुडुंब गर्दी पाहायला मिळाली. हातात अर्ज, चेहऱ्यावर अपेक्षा आणि डोळ्यांत संधीची आस–अशा वातावरणात अखेरच्या क्षणापर्यंत राजकीय समीकरणे बदलत असल्याचे स्पष्ट झाले.

अनेकांनी आम्हाला काम करू द्या, झेंडा द्या.. अशी थेट मागणी मांडली असून, काही जागांवर उमेदवारीच्या अंतिम निर्णयासाठी वरिष्ठ पातळीवर चर्चा सुरू आहे. भाजप आणि शरद पवार गटात संधी न मिळालेल्या कार्यकर्त्यांमध्ये अपक्ष लढत टाळण्याची स्पष्ट मानसिकता दिसते. खर्च, चिन्ह, संघटन आणि विजयाची शक्यता–या सर्व बाबी लक्षात घेता अजित पवारांची राष्ट्रवादी हा सुरक्षित आणि प्रभावी पर्याय असल्याचे नाराजांचे म्हणणे आहे.

## आदित्य ठाकरेंच्या वरळीत शिवसेनेत नाराजी

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ३० :**
मुंबई महापालिका निवडणुकीसाठी एबी फॉर्मचे वाटप होताच शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) गटात अंतर्गत अस्वस्थतेचे पडसाद उमटले आहेत. विशेषतः आमदार यांचा बालेकिल्ला वरळी विधानसभा मतदारसंघात तिकीटवाटपानंतर नाराजी उघडपणे समोर आली आहे. निष्ठावंत कार्यकर्ते आणि पदाधिकाऱ्यांमध्ये अस्वस्थता पसरली असून, एका शाखाप्रमुखाने राजीनामा दिल्याने ठाकरे गटासमोर आपल्याच घरातील आव्हान निर्माण झाले आहे.

या निवडणुकीत शिवसेना (उबाठा) कडून अधिकृत यादी जाहीर न करता उमेदवारांना थेट एबी फॉर्म देण्यात आले. वॉर्ड क्रमांक १९६ महिलांसाठी खुला झाल्यानंतर विभागप्रमुख आशिष चेंबूरकर यांच्या पत्नी यांना उमेदवारी निश्चित करण्यात आली. मात्र या निर्णयामुळे निष्ठावंत पदाधिकारी कमालीचे संतापले.

## आम्ही काय नुसते झेंडेच लावायचे का?

### इच्छुकांचा संताप : मातोश्रीबाहेर संताप

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ३० :**
मुंबई महापालिका निवडणुकीसाठी ठाकरे बंधूंनी युती केली आहे. यामुळे अनेक प्रभागांतील राजकीय समीकरण बदलले आहे. ठाकरे गटातर्फे बंडखोरी टाळण्यासाठी शेवटपर्यंत प्रयत्न करण्यात येत आहेत. पण त्यानंतरही आज नाराज इच्छुक उमेदवारांचे जत्थेच्या जत्थे आज मातोश्रीवर येऊन आदळत असल्याचे चित्र होते. यापैकी अनेकांनी यावेळी पक्षावर रोष व्यक्त करत आम्ही काय नुसते झेंडेच लावायचे का? असा संतप्त सवाल उपस्थित केला.

या प्रकरणी एक शाखाप्रमुख आपला रोष व्यक्त करताना म्हणाला, मी सामान्य शिवसैनिक आहे. मागील ३६ वर्षांपासून पक्षाचे काम करतो. पण आम्ही फक्त झेंडे लावण्याचेच काम करायचे का? श्रद्धा जाधव शाखेच्या विद्युत बीलही भरत नाहीत. मेन्टेन्सही देत नाहीत. त्यांनी अक्षरशः शाखा विकून खाल्ली.

## ओमप्रकाश शहा, माधव बावगे यांना बाबा आमटे राष्ट्रीय पुरस्कार जाहीर

■ **वृत्तसंस्था, नांदेड, दि. ३० :**
२०२६ या वर्षासाठी बाबा आमटे जीवन गौरव राष्ट्रीय पुरस्कार पश्चिम बंगालमध्ये कोलकाता येथील ओमप्रकाश शहा यांना तर बाबा आमटे राष्ट्रीय सामाजिक कार्यकर्ता पुरस्कार लातूर येथील माधव बावगे यांना जाहीर झाला आहे. बाबा आमटे यांच्या पुण्यतिथी निमित्त ९ फेब्रुवारी रोजी पुरस्कार वितरण समारंभ आयोजित केला जाईल आणि मान्यवरांच्या हस्ते पुरस्कार प्रदान केले जातील.


महान समाजसुधारक स्वर्गीय श्रमर्षी बाबा आमटे यांनी संकल्पित केलेल्या ऐतिहासिक भारत जोडो (निट इंडिया) सायकल यात्रेला आता जवळजवळ ४० वर्षे पूर्ण झाली आहेत. या ऐतिहासिक चळवळींमध्ये सहभागी झालेल्या तरुणांनी अलिकडेच बाबा आमटे एकता अभियान ट्रस्टची स्थापना केली आहे.

ट्रस्टने बाबा आमटे यांच्या नावाने दोन राष्ट्रीय स्तरावरील पुरस्कार सुरू केले आहेत - बाबा आमटे जीवनगौरव राष्ट्रीय पुरस्कार आणि बाबा आमटे राष्ट्रीय सामाजिक कार्यकर्ता पुरस्कार. बाबांच्या जीवनाशी संबंधित क्षेत्र जसे राष्ट्रीय एकात्मता, युवा विकास, पर्यावरण संरक्षण, कुष्ठरोग सेवा आणि आरोग्यसेवा यासारख्या क्षेत्रात उल्लेखनीय योगदान देणाऱ्या व्यक्तींचा सन्मान या पुरस्कारातून केला जाणार आहे.

२०२६ या वर्षासाठी, बाबा आमटे जीवनगौरव राष्ट्रीय पुरस्कार पश्चिम बंगालमधील कोलकाता येथील ओमप्रकाशजी शहा (ओ. पी. शाह) यांना प्रदान केला जाईल. शाह यांनी आपले संपूर्ण आयुष्य गांधीवादी विचार आणि कृतीसाठी समर्पित केले आहे आणि एक ज्येष्ठ विचारवंत आणि कार्यकर्ते म्हणून त्यांचा मोठ्या प्रमाणात आदर केला जातो.

बाबा आमटे यांच्या नेतृत्वाखालील ऐतिहासिक भारत जोडो सायकल यात्रेदरम्यान, त्यांनी पूर्वांचल आणि पश्चिम बंगाल प्रदेशांसाठी समन्वयक म्हणून काम केले. शाह भारत आणि पाकिस्तानमधील शांततापूर्ण संबंधांना चालना देण्यासाठी सक्रियपणे कार्यरत आहेत आणि त्यांनी या विषयावर एक अत्यंत प्रशंसित पुस्तक लिहिले आहे. आजही ते राष्ट्रीय एकात्मतेसाठी अथक प्रयत्न करत आहेत.

तसेच यावर्षी बाबा आमटे राष्ट्रीय सामाजिक कार्यकर्ता पुरस्काराचे तिसरे वर्ष आहे, जो महाराष्ट्रातील लातूर येथील माधव बावगे यांना प्रदान केला जाईल. बावगे हे भारत जोडो सायकल यात्री आहेत, महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे राज्य अध्यक्ष आहेत आणि भारत जोडो युवा अकादमीचे संस्थापक सचिव आहेत. त्यांना राष्ट्रीय एकात्मतेसाठी राष्ट्रीय युवा पुरस्कार देखील मिळाला आहे.



बावगे हे बाबा आमटे, यदुनाथ थत्ते, एस. एन. सुब्बा राव आणि डॉ. नरेंद्र दाभोलकर यांना त्यांचे प्रेरणास्थान मानतात. त्यांनी लातूर येथील प्रतिष्ठित शाहू महाविद्यालयात शिक्षण घेतले, जिथे त्यांनी नंतर कार्यालय अधीक्षक म्हणून काम केले आणि संस्थेला स्वायत्त दर्जा मिळाल्यानंतर अखेर रजिस्ट्रार म्हणून निवृत्त झाले.

समतावादी समाज निर्माण करण्याच्या प्रयत्नांमध्ये ते सतत सक्रिय राहिले आहेत. उल्लेखनीय म्हणजे, त्यांनी सत्यशोधक (सत्यशोधक) परंपरेचे अनुसरण करून ३५० हून अधिक विवाह केले आहेत. राष्ट्र सेवा दल, छात्र भारती आणि महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती यासारख्या सामाजिक चळवळींमध्ये ते खोलवर सहभागी आहेत, त्यांनी आपले जीवन बुद्धिमत्ता, सामाजिक न्याय आणि प्रगतीशील सुधारणांसाठी समर्पित केले आहे.

ट्रस्टचे सचिव डॉ. अशोक बेलखोडे यांनी सांगितले की, बाबा आमटे यांच्या पुण्यतिथीनिमित्त ९ फेब्रुवारी २०२६ रोजी पुरस्कार वितरण समारंभ आयोजित केला जाईल आणि मान्यवरांच्या हस्ते पुरस्कार प्रदान केले जातील.

## अंगावर पेट्रोल ओतून जाळून घेण्याचा रिपाइं कार्यकर्त्यांचा प्रयत्न

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ३० :**
सत्ताधारी महायुतीत विशेषतः भाजपमध्ये तिकीट वाटपाच्या मुद्यावरून संतापाच्या लाटा उसळत आहेत. भाजपच्या छत्रपती संभाजीनगर येथील इच्छुक उमेदवारांनी या प्रकरणी आकांडतांडव केल्यानंतर आता मित्र पक्ष असणाऱ्या रिपाइंनेही (आ.) भाजपवर कमालीचा रोष व्यक्त केला आहे. या प्रकरणी रिपाइंच्या एका कार्यकर्त्याने चक्क अंगावर पेट्रोल ओतून आत्महत्या करण्याचा प्रयत्न केल्यामुळे एकच खळबळ माजली आहे.

छत्रपती संभाजीनगरमध्ये सत्ताधारी महायुती या निवडणुकीला मिळून सामोरे जाईल अशी शक्यता होती. पण उमेदवारी भरण्याच्या अखेरच्या दिवशी शिवसेनेने भाजपसोबतची युती तोडण्याची घोषणा करत या निवडणुकीला स्वबळावर सामोरे जाण्याची घोषणा केली.

यामुळे महायुतीतील रिपाइं (आ.) सारख्या घटकपक्षांची गोची झाली आहे. या पक्षांना महायुतीच्या जागावाटपात काही जागा मिळण्याची शक्यता होती. पण युती तुटल्यामुळे त्यांचा अपेक्षाभंग झाला आहे. या पार्श्वभूमीवर रिपाइंच्या कार्यकर्त्यांनी भाजपच्या कार्यालयात जाऊन गदारोळ केला आहे.



रिपाइंचे नेते राकेश पंडित व संजय ठोकळ यांनी आज आपल्या समर्थकांसह भाजप कार्यालयात प्रवेश केला. तिथे त्यांनी मंत्री अतुल सावे व खासदार डॉक्टर भागवत कराड यांच्याविरोधात जोरदार घोषणाबाजी केली.

भाजपने आम्हाला मित्रपक्ष म्हणून फक्त वापरून घेतले आणि उमेदवारीच्या वेळी वाटाण्याच्या अक्षता दिल्या, असा आरोप या नेत्यांनी केला.

त्यांचा संताप एवढा टोकाचा होता की, त्यांच्यासोबत आलेल्या एका कार्यकर्त्याने अंगावर पेट्रोल ओतून स्वतःला पेटवून घेण्याचा प्रयत्न केला. पण तिथे उपस्थित असलेल्या पोलिसांनी तत्काळ हस्तक्षेप केल्यामुळे पुढील अनर्थ टळला.
या घटनेनंतर रिपाइंच्या कार्यकर्त्यांनी भाजप कार्यालयाच्या मुख्य प्रवेशद्वारापुढेच ठिय्या आंदोलन केले. यावेळी त्यांनी भाजपवर आपली जाणिवपूर्वक हेटाळणी केल्याचा आरोप केला.

भाजपमध्ये अगोदरच निष्ठावंतांची बंडाळी सुरू असताना आता मित्रपक्षानेही आक्रमक पवित्रा घेतल्यामुळे भाजपच्या अडचणींत मोठी वाढ झाली आहे. या आंदोलनामुळे भाजप कार्यालय परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले होते.

## बिबट्याच्या हल्ल्यात एक जण जखमी

**अकोट :** तालुक्यात आदिवासी भागात गेल्या काही दिवसांपासून बिबट्या व वाघ या जंगली हिंसक प्राण्यांचा वावर वाढला आहे. त्यामुळे शेतकरी वर्गात भीतीचे वातावरण पसरले. सध्या शेतामध्ये कापूस वेचणी व इतर कामे सुरू आहेत.मात्र ही सर्व कामे करताना महिला वर्ग व मजूर लोकांसमोर भीती निर्माण झाली आहे. रविवारी सकाळी आदिवासी भागातील शहापूर रूपागड येथील आपल्या शेतात कापसाची वेचणी करण्यासाठी शहापूर येथील कुटुंब सकाळच्या सुमारास गेले असता त्यांच्यापैकी हुसेन मैताब सुरत्रे (५०) यांच्यावर सकाळी ९.३० वाजेदरम्यान बिबट्याने हल्ला केला. या हल्ल्यामध्ये तो व्यक्त जखमी झाला.

# अकोला महानगरपालिकेसाठी भाजपा-राष्ट्रवादी युतीची उमेदवार यादी जाहीर

अकोला: अकोला महानगरपालिका निवडणुकीमध्ये भारतीय जनता पार्टी व राष्ट्रवादी काँग्रेस यांची युती झाली असून, भारतीय जनता पार्टी एकूण ६२ ठिकाणी उमेदवार उभे करणार असून १४ ठिकाणी राष्ट्रवादी काँग्रेस उमेदवार उभे करणार आहे, आणि ४ ठिकाणी भाजपा मित्र पक्षसाठी जागा सोडणार आहे, अशी माहिती अकोला भाजपा निवडणूक प्रमुख विजय अग्रवाल यांनी दिली. ारतीय जनता पक्षाने आज उमेदवारी देताना गुजरात पॅटर्नच्या धर्तीवर ६० टक्के नवीन उमेदवारांना संधी दिली असून, नवीन आणि जुने कार्यकर्त्यांना सर्व्हे च्या आधारावर पक्षाने तिकीट दिली आहे. यामध्ये ४० टक्के २०१७ मध्ये निवडून आलेल्या नगरसेवकापैकी नवीन कार्यकर्त्यांना संधी दिली आहे. २८ महिला, ३४ पुरुष, ११ अनुसूचित जाती, १ अनुसूचित जमाती, १८ ओबीसी तसेच ३२ सर्वसाधारण तसेच सर्व वर्गाला न्याय देण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. ज्यांना तिकीट दिली नाही, अशांना संघटना विस्तारासाठी कार्यरत ठेवणार असून, त्यांचा योग्य तो सम्मान करण्यात येणार असल्याचे भाजपा सूत्रांनी सांगितले आहे. तसेच भाजपा प्रदेश निवड समितीने दिलेल्या उमेदवारांना देखील संधी देण्यात आली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण, निवडणूक प्रभारी चंद्रशेखर बावनकुळे, संघटन मंत्री डॉ. उपेंद्र कोठेकर, भाजपा प्रदेश सरचिटणीस आमदार रणधीर सावरकर, खासदार अनुप धोत्रे, पालकमंत्री ॲड. आकाश फुंडकर, आमदार वसंत खंडेलवाल, भाजपा महानगर अध्यक्ष जयंत मसने, निवडणूक प्रमुख विजय अग्रवाल यांची मान्यता घेवून भाजपा प्रसिद्धी प्रमुख गिरीश जोशी यांनी उमेदवारांच्या नावांची माहिती दिली.

१ प्रभाग – १ ( ब ) सर्वसाधारण महिला दिपाली राम बोंद्रे २ प्रभाग – २ ( ब ) ना.मा.प्र. शरद श्रीराम तुरकर ३ प्रभाग – २ ( क ) सर्वसाधारण महिला अनिता राजेश चौधरी ४ प्रभाग – २ ( ड ) सर्वसाधारण नितीन नरेश राऊत ५ प्रभाग – ३ ( अ ) अनु. जाती महिला शशिकला सतीश काळे ६ प्रभाग – ३ ( ब ) ना.मा.प्र. महिला नितू महादेव जगताप ७ प्रभाग – ३ ( क ) सर्वसाधारण सागर प्रकाशराव शेगोकार

८ प्रभाग – ३ ( ड ) सर्वसाधारण प्रशांत गोविंदराव जोशी ९ प्रभाग – ४ ( अ ) अनु. जाती संदीप राम कृष्ण शेगोकार १० प्रभाग – ४ ( ब ) ना.मा.प्र. महिला शिल्पा किशोर वरोकार ११ प्रभाग – ४ ( क ) सर्वसाधारण महिला पल्लवी शिवाजी मोरे १२ प्रभाग – ४ ( ड ) सर्वसाधारण मिलिंद डिगांबर राऊत

१३ प्रभाग – ५ ( अ ) अनु. जाती महिला विद्या सुभाष खंडारे १४ प्रभाग – ५ ( ब ) ना.मा.प्र. जयंत रामराव मसने १५ प्रभाग – ५ ( क ) सर्वसाधारण महिला रश्मी प्रशांत अवचार १६ प्रभाग – ५ ( ड ) सर्वसाधारण विजय कमलकिशोर अग्रवाल १७ प्रभाग – ६ ( अ ) अनु. जाती महिला आरती प्रकाश घोगलीया १८ प्रभाग – ६ ( ब ) ना.मा.प्र. हर्षद प्रमोद भांबरे १९ प्रभाग – ६ ( क ) सर्वसाधारण महिला निखिता राहुल देशमुख २० प्रभाग – ६ ( ड ) सर्वसाधारण पवन मुगुटराव महल्ले २१ प्रभाग – ८ ( अ ) ना.मा.प्र. महिला रंजना शाम विंचनकर २२ प्रभाग – ८ ( ब ) ना.मा.प्र. तुषार महेंद्र भिरड २३ प्रभाग – ८ ( क ) सर्वसाधारण महिला माधुरी सुनील क्षीरसागर २४ प्रभाग – ८ ( ड ) सर्वसाधारण राजेश्वर केशव घोटे २५ प्रभाग – ९ ( ब ) ना.मा.प्र. महिला ज्योती वसंत मानकर २६ प्रभाग – ९ ( ड ) सर्वसाधारण हर्षल बाबुराव चौधरी २७ प्रभाग – १० ( अ ) ना.मा.प्र. महिला मंजुषा संजय शेळके २८ प्रभाग – १० ( ब ) सर्वसाधारण महिला वैशाली विलास शेळके २९ प्रभाग – १० ( क ) सर्वसाधारण अनिल देविदास गरड

३० प्रभाग – १० ( ड ) सर्वसाधारण नितीन मुरलीधर ताकवाले ३१ प्रभाग – ११ ( ड ) सर्वसाधारण राहुल राजकुमार चौरसिया ३२ प्रभाग – १२ ( अ ) अनु. जाती संतोष देवराव डोंगरे ३३ प्रभाग – १२ ( ब ) ना.मा.प्र. महिला कल्पना संजय गोटफफोडे३४ प्रभाग – १२ ( ड ) सर्वसाधारण अजय रमेशचंद्र शर्मा

३५ प्रभाग – १३ ( अ ) अनु. जाती विशाल श्रावण इंगळे ३६ प्रभाग – १३ ( ब ) ना.मा.प्र. महिला प्राची निलेश काकड ३७ प्रभाग – १३ ( क ) सर्वसाधारण महिला सुनिता विजय अग्रवाल३८ प्रभाग – १३ ( ड ) सर्वसाधारण अनिल सुनील मुरूमकार ३९ प्रभाग – १४ ( अ ) अनु. जाती महिला दिपाली प्रवीण जगताप ४० प्रभाग – १४ ( ब ) ना.मा.प्र. महिला अस्मिता प्रकाश वगारे४१ प्रभाग – १४ ( क ) सर्वसाधारण गोपाल रघुनाथ मुळे ४२ प्रभाग – १४ ( ड ) सर्वसाधारण दिलीप तुळशीराम भरणे

४३ प्रभाग – १५ ( अ ) ना.मा.प्र. हरीश रतनलाल अलीमचंदानी ४४ प्रभाग – १५ ( ब ) सर्वसाधारण महिला मनीषा रविंद्र भंसाली ४५ प्रभाग – १५ ( क ) सर्वसाधारण महिला शारदा रणजीत खेडकर ४६ प्रभाग – १५ ( ड ) सर्वसाधारण अरविंद प्रल्हाद टाले ४७ प्रभाग – १६ ( अ ) अनु.जाती सिद्धार्थ रामदास उपर्वट ४८ प्रभाग – १६ ( ब ) ना.मा.प्र. महिला मुस्कान आशिष पंजवानी ४९ प्रभाग – १६ ( ड ) सर्वसाधारण संजय बाबूलाल बडोने ५० प्रभाग – १७ ( ब ) ना.मा.प्र. अमोल अवधूत मोहोकार

५१ प्रभाग – १७ ( ड ) सर्वसाधारण करण अशोक साहू ५२ प्रभाग – १८ ( अ ) अनु.जाती महिला सरिता सुनील कांबळे ५३ प्रभाग – १८ ( ब ) ना.मा.प्र. अमोल सुधाकर गोगे ५४ प्रभाग – १८ ( ड ) सर्वसाधारण दिलीप रामकृपाल मिश्रा ५५ प्रभाग – १९ ( अ ) अनु.जाती धनंजय गणपत धबाले

५६ प्रभाग – १९ ( ब ) अनु. जमाती गजानन शाळीग्राम सोनोने ५७ प्रभाग – १९ ( क ) ना.मा.प्र. योगिता गणेश पावसाळे ५८ प्रभाग – १९ ( ड ) सर्वसाधारण माधुरी संजय बडोने ५९ प्रभाग – २० ( अ ) अनु.जाती मंगेश भगवान झिने ६० प्रभाग – २० ( ब ) ना.मा.प्र. महिला शारदा वैकुंठ ढोरे६१ प्रभाग – २० ( क ) सर्वसाधारण महिला सोनाली गणेश अंधारे ६२ प्रभाग – २० ( ड ) सर्वसाधारण विनोद मुरलीधर मापारी

## भूजल स्त्रोत नकाशांकनाविषयी
# जिल्हाधिकारी कार्यालयात कार्यशाळेद्वारे मार्गदर्शन

**अकोला,दि ३० (प्रतिनिधी) :**
केंद्रीय भूजल मंडळाच्या वतीने मभूजल स्त्रोत माहिती, उपयोग व नकाशांकनफ या विषयावरील कार्यशाळा आज जिल्हाधिकारी कार्यालयात झाली. भूजलस्त्रोत नकाशांकनातून मिळणाऱ्या निष्कर्षांचा शाश्वत जलनियोजनासाठी प्रभावी वापर करता यावा, यासाठी यावेळी मार्गदर्शन करण्यात आले.



निवासी उपजिल्हाधिकारी गजेंद्र मालठाणे कार्यशाळेच्या अध्यक्षस्थानी होते. भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा येथील वरिष्ठ भूवैज्ञानिक संजय कराड, जलसंधारण विभागाचे डॉ. अमोल डी. मस्कर यांच्यासह मृद व जलसंधारण, जलसंपदा विभाग, जलसंधारण विभाग, लघु पाटबंधारे, जि. प. पाटबंधारे, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण आणि कृषी विभागातील विविध विभागप्रमुख व अधिकारी उपस्थित होते.

केंद्रीय भूजल मंडळाने सखोल भूजल अहवाल तयार करून सुलभ डेटा पोर्टल्स विकसित केली आहेत. जलसंपदा व्यवस्थापनासाठी ती निश्चित उपयुक्त ठरतील, असा विश्वास श्री. मालठाणे यांनी व्यक्त केला. जिल्ह्यातील भूजल संसाधनांचे वैज्ञानिक नियोजन व शाश्वत व्यवस्थापनासाठी सर्व विभागांनी या डेटाचा व जलसाठे नकाशांकन अभ्यासाचा सक्रियपणे वापर करावा, असे आवाहन त्यांनी केले.तज्ज्ञ हितेश रामटेके यांनी कार्यशाळेचे बीजभाषण केले.

यानंतर शास्त्रज्ञ निर्मलकुमार नंदा यांनी अकोला जिल्ह्याच्या राष्ट्रीय जलस्त्रोत नकाशांकन अभ्यासाचे सविस्तर सादरीकरण केले. या सादरीकरणात भूजलसाठ्यांची वैशिष्ट्ये, भूजल क्षमता, पाण्याच्या गुणवत्तेचे पैलू आणि व्यवस्थापन धोरणे यांचा समावेश होता.यावेळी त्यांनी ऑनलाइन डेटा प्लॅटॉर्मसभूजल डेटा डाउनलोड पोर्टल यांची थेट प्रात्यक्षिके सादर करून त्याचा विविध विभागांकडून नियोजन, अंमलबजावणी व जलसंबंधित योजनांच्या देखरेखीकरिता कसा उपयोग करता येईल, हे स्पष्ट केले.

कार्यशाळेदरम्यान अकोला जिल्ह्याचा राष्ट्रीय जलस्त्रोत नकाशांकन अहवाल, तसेच कृत्रिम पुनर्भरण संरचनांच्या यशोगाथा यांचे औपचारिक प्रकाशन करण्यात आले. भूजल पुनर्भरण व व्यवस्थापनातील सवोत्तम पद्धतींचे दस्तऐवजीकरण व प्रसार करण्यासाठी या उपक्रमाचा लाभ होईल. श्री. कराड यांनी राज्य शासनाच्या विभागांकडून भूजलाधारित प्रकल्प, जलसंधारण व सिंचन नियोजनाच्या टप्प्यावर तज्ज्ञांचे अहवाल व डेटासेटस कसे प्रभावीपणे वापरता येतील, याचे मार्गदर्शन केले. कार्यशाळेच्या शेवटी संवाद सत्र घेण्यात आले. सहाय्यक भूजलशास्त्रज्ञ प्रकाशचंद्र महाराणा यांनी आभार मानले. या कार्यशाळेत विविध विभागांतील एकूण ६७ अधिकारी व कर्मचारी सहभागी झाले.

# ३१ डिसेंबर दारू पिऊन नव्हे,तर दूध पिऊन साजरा करा!..

## समाजसेवक गजानन हरणे यांचे आवाहन

**अकोला,दि ३० (प्रतिनिधी) :**
३१ डिसेंबर हा वर्षाचा शेवटचा दिवस असून या दिवशी अनेक व्यक्ती दारू व इतर आमली पदार्थ खाऊन साजरा करतो यामुळे वर्षाचा शेवट व नवीन वर्षाची सुरुवात या वाईट गोष्टीने होत असल्यामुळे अशा प्रकारे नवीन वर्षाची सुरुवात व वर्षाचा शेवट ३१ डिसेंबर साजरा करू नका .त्याऐवजी दूध पिऊन व एकमेकाला दूध पाजून वर्षाचा शेवट व नवीन वर्षाची सुरुवात करण्याचे आव्हान गजानन हरणे समाजसेवक तथा संयोजक निर्भय बनो जण आंदोलन यांनी समाजातील तरुण युवक ,युवती व जागरूक परिवर्तनवादी नागरिकांना केले आहे . या दिवशी शक्यतोर घराच्या बाहेर पडण्याचे टाळावे कारण अनेक लोक दारू पिऊन मधधुंद अवस्थेमध्ये गाळ्या चालवत असल्यामुळे अनेक अपघात ३१ डिसेंबर या दिवशी दरवर्षी होत असतात. त्यामुळे अनेकांना आपल्या प्राणाला मुकावे लागते. त्यामुळे प्रत्येक घरातील आई वडील या दिवशी चिंतेत असतात. त्याची झळ दरवर्षी कोणाला कोणाला बसत असते .हे रोखायचे असेल तर तरुण युवक युवतीना ,व्यक्तींना याबाबत जागृत राहून निर्णय घेणे गरजेचे आहे. त्यासाठी ३१ डिसेंबर हा उत्सव भारतीय संस्कृती नसून विदेशी संस्कृतीचा भारतामध्ये जो मोठ्या प्रमाणात प्रवेश होत आहे. त्याला रोखण्यासाठी प्रत्येक भारतीयांनी स्वतःपासून येथे सुरुवात करून एक आदर्श निर्माण करण्याची गरज असल्याचे प्रतिपादन समाजसेवक गजानन हरणे यांनी प्रसिद्धी दिलेल्या पत्रकाद्वारे केली आहे.आणि कुणालाही नवीन वर्षाच्या शुभेच्छा देऊन गुलामीची निशाणी जपू नका. आपलं नवीन वर्ष ‘‘गुढीपाडव्या‘‘ला सुरु होतयं त्या दिवशी अख्ख्या जगाला बघू दे मराठी नववर्ष कसं भव्यदिव्य साजरं होत ते ! मी मराठी आहे मराठीच राहणार नविन वर्षाच्या शुभेच्छा गुढीपाड़व्यालाच देणार हा संकल्प सर्व नागरिकांनी घ्यावा.

# नववर्ष स्वागतासाठी अकोला जिल्हा पोलीस दल सज्ज

**अकोला,दि ३० (प्रतिनिधी) :**
नवीन वर्ष २०२६ च्या स्वागतासाठी अकोला जिल्हा पोलीस दलाने कडक सुरक्षा व वाहतूक व्यवस्थेची तयारी केली आहे. दिनांक ३१ डिसेंबर २०२५ रोजी सायंकाळी ७.०० वाजल्यापासून ते १ जानेवारी २०२६ रोजी सकाळी ५.०० वाजेपर्यंत शहर व ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणावर नाकाबंदी, तपासणी व कायदेशीर कारवाई राबविण्यात येणार आहे. शहरातील ०८ पोलीस स्टेशन हद्दीत प्रत्येकी ०६ नाकाबंदी पॉईंट नियुक्त करण्यात येणार असून, प्रत्येक पोलीस स्टेशनमध्ये ०१ पोलीस अधिकारी व ०२ पोलीस अंमलदार ब्रेथ अनालायझर मशिनसह तैनात राहणार आहेत. यार्मात ड्रंक अँड ड्राईव्ह विरोधात कठोर कारवाई करण्यात येणार आहे.तसेच वाहन चालविताना हुल्लडबाजी, ट्रपिल सीट, फॅन्सी अथवा विना नंबर प्लेट, बनावट सायलेन्सर तसेच फटाके फोडणाऱ्या वाहनांवर मोटार वाहन कायद्यानुसार कारवाई केली जाणार आहे.नववर्षाच्या रात्री सुरक्षेच्या दृष्टीने शहरातील जेल चौक ते अग्रसेन चौक ओव्हर ब्रिज, हुतात्मा चौक ते निमवाडी पोलीस क्वार्टर्स ओव्हर ब्रिज हे दोन्ही ओव्हर ब्रिज ३१/१२/२०२५ रोजी रात्री ९.०० वाजल्यापासून ते ०१/०१/२०२६ रोजी सकाळी ५.०० वाजेपर्यंत बेरिकेटिंग करून वाहतुकीसाठी बंद ठेवण्यात येणार आहेत.ग्रामीण भागातही कडक बंदोबस्त ग्रामीण भागातील १५ पोलीस स्टेशन हद्दीत प्रत्येकी ०३ नाकाबंदी पॉईंट नियुक्त करण्यात आले असून, मोठ्या प्रमाणावर पोलीस अधिकारी, अंमलदार, वाहतूक शाखेचे कर्मचारी, ई-चलान मशिन, बेरिकेटस व ब्रेथ अनालायझर मशिनचा वापर करण्यात येणार आहे.

## थोडक्यात

### नववर्ष स्वागत : उपाहारगृहांना सूचना

**अकोला :** नववर्षाच्या स्वागतासाठी दि. ३१ डिसेंबर रोजी हॉटेल, उपाहारगृहे, ढाबे, फार्महाऊस, रिसॉर्ट, तसेच इतर अन्न आस्थापनांमध्ये मोठ्या प्रमाणावर नागरिकांची गर्दी होण्याची शक्यता आहे. या पार्श्वभूमीवर नागरिकांना स्वच्छ, सुरक्षित व दर्जेदार अन्न मिळण्यासाठी सर्व व्यवसायचालकांनी अन्न सुरक्षा व मानके कायद्यातील तरतुदींचे काटेकोर पालन करावे, अशी सूचना अन्न व औषध प्रशासनार्ते करण्यात आली आहे. अन्न व औषध प्रशासनार्ते ङ्गनववर्ष संकल्प- सुरक्षित अन्न मोहीम‘‘ हे अभियान राबविण्यात येत आहे. त्यात अन्न व्यवसाय चालकांनी स्वच्छता व सुरक्षिततेबाबत मार्गदर्शक सूचनांचे पालन करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. परिसर निर्जतुक ठेवा अन्न तयार करण्यासाठी वापरण्यात येणारी सर्व भांडी, उपकरणे, काउंटर व स्वयंपाकगृह परिसर स्वच्छ व निर्जतुक असावा, कच्चे अन्नपदार्थ (भाजीपाला, मांस, मासे) व शिजवलेले अन्न वेगवेगळ्या व स्वच्छ ठिकाणी साठवावे, स्वयंपाकघर, साठवण कक्ष, शीत गृह व कचरा साठवणूक क्षेत्र स्वच्छ ठेवावे. योग्य वायुविजन असावे, अन्न पदार्थ विक्रीसाठी वृत्तपत्र, छापील कागद किंवा वापरात आलेले कागद वापरू नयेत. खाद्यपदार्थांसाठी योग्य साहित्यच वापरणे बंधनकारक आहे, तेलाचा वारंवार किंवा अतिवापर टाळावा. खराब, जळलेले अथवा वारंवार वापरलेले तेल अन्न तयार करण्यासाठी वापरणे आरोग्यास घातक आहे, अन्न तयार करणारे व विक्री करणारे कर्मचारी स्वच्छ कपडे, एप्रन, हेडकॅप व गरजेनुसार हातमोजे वापरावेत, पाणी शुद्ध व पिण्यायोग्य असावे व त्याची नियमित स्वच्छता तपासणी करण्यात यावी.

# ग्रामीण विकासाचा सेवाभाव जपणारे अंगणवाडी सेविकेसह आशा यांचे कार्य महत्त्वाचे:आनंद देशमुख

**अकोला,दि ३० (प्रतिनिधी) :**
देशाचे माजी पंतप्रधान अटल बिहारी वाजपेयी यांच्या जन्मजयंती शताब्दी वर्षाचे औचित्य साधून आयोजित राष्ट्रीय सुशासन दिनानिमित्त या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

अकोला पूर्व चे लोकप्रिय आमदार श्री रणधिर भाऊ सावरकर यांच्या मार्गदर्शनाखाली, खासदार श्री.अनुपदादा धोत्रे यांच्या संकल्पनेनुसार ,भाजपा अकोला जिल्हा अध्यक्ष मा. श्री. संतोषजी शिवरकर यांच्या नेतृत्वात व श्री आनंद शिवाजीराव देशमुख यांच्या प्रयत्नातून यावेळी आरोग्य सेविका,आशा सेविका,अंगणवाडी सेविका व अंगणवाडी मदतनीस यांचा शाल, श्रीफळ व भेटवस्तू देऊन सन्मान करण्यात आला. शिवाय कावसा सार्वजनिक आरोग्य सेवा केंद्रा च्या उभारणी साठी जमीनदान देऊन मोलाचे योगदान दिल्या बद्दल श्री . सुनिल भाऊ गोरले व श्री संजुशेठ चिंचोलकर यांचा विशेष सन्मान करण्यात आला.

कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून भाजपाचे ज्येष्ठ नेते प्राध्यापक श्री. जयदेवराव साबळे तर प्रमुख उपस्थिती म्हणून अकोला भाजपा चे सरचिटणीस मा. श्री. राजेशजी नागमते अकोला जि. प. चे माजी अध्यक्ष श्री शिवाजीराव देशमुख, अकोला जि. प. चे माजी समाज कल्याण सभापती श्री. विजयसिंह सोळंके, अकोट पं. स. समितीचे माजी सदस्य श्री रितेश भाऊ तायडे व प्रमुख पाहुणे म्हणून भाजपा चोहटा बाजार मंडळ अध्यक्ष श्री विठ्ठलराव



वाकोडे, भाजपा चोहटा बाजार युवामंडळ मोर्चा अध्यक्ष श्री ज्ञानेश्वर झामरे, श्री प्रवीण डेक्कर, श्री अशोकराव झामरे, श्री दत्तू पाटील झामरे उपस्थित होते

देशाचे माजी पंतप्रधान अटल बिहारी वाजपेयी यांनी सर्वांना सोबत घेत राष्ट्र आणि पक्ष निर्मितीचे काम केले असे मत श्री राजूभाऊ नागमते यांनी व्यक्त केले तर तळागाळापर्यंत काम करणाऱ्या आशा सेविका, अंगणवाडी सेविका/ मदतनीस,आरोग्य सेविका ह्या खऱ्या अर्थाने आपल्या आरोग्य सेवेचा पाया आहेत असे मत श्री.शिवाजीराव देशमुख यांनी व्यक्त केले या कार्यक्रमा मध्ये अनेक आशा,अंगणवाडी,आरोग्य सेविका भावनिक झाल्या व हा त्यांच्या कार्याचा यथोचित सन्मान झाल्याचे मत त्यांनी व्यक्त केले.

# शिवसेना (शिंदे गट) उमेदवार यादी

भाग क्रमांक ०१ मोहम्मद उस्मान मोहम्मद युसुफ सीमा विनोद धाडसे संचिता विजय तळेकर विजय शेषराव तळेकर प्रभाग क्रमांक ०२ कविता शंकर जयराज शुभम दिनकर वडतकर पूनम प्रदीप काशीद दिनकर सूर्यभान रानबावळे प्रभाग क्रमांक ०३ अ – सुमित पानझाडे ब – स्वानंदी पांडे क – अनंत चोपडे ड – संगीता शुक्ला प्रभाग क्रमांक ०४ अ – तुषार इंगळे ब – साक्षी पुंडकर क – सुनिता आढाव ड – गणेश गिरी ज़्यादा जानें अकोला प्रभाग क्रमांक ०५ अ – इंगळे ब – विजय वानखडे ड – जळमकार प्रभाग क्रमांक ०६ ब – चेतन सुरेश पाटील क – सौ. सारिका रुपेश जयस्वाल ड – राजेश अरुण जोशी

प्रभाग क्रमांक ०७ राखी मनीष पाटेकर विकास सीताराम रामटेके प्रभाग क्रमांक ०८ अ – मंगला म्हैसणे ब – उज्जैनकर क – मंगेश गीते ड – योगेश ढोरे ज़्यादा जानें अकोला प्रभाग क्रमांक ०९ अ – लवकेश मोहन लोखंडे ब – स्वाती अतुल एडणे क – पूजा अंकुश तवर ड – किरण आनंदा शिरसाट प्रभाग क्रमांक १० आशा मनीष मालगे पूजा सागर पूर्णेये प्रफुल गजानन देशमुख पप्पू श्रीराम मोरवाल प्रभाग क्रमांक ११ निशा सत्यनारायण ग्यारल यशवंत पोचन्ना तुमडे प्रभाग क्रमांक १२ अ – गौतम नामदेव कंकाड ब – शीतल संजय अग्रवाल क – उषा जगजीत सिंह विर्क ड – हितेश दलसुखभाई बगथेरिया प्रभाग क्रमांक १३ अ – पवन पवार क – शैला झगडे ड – दिलीप नायडू प्रभाग क्रमांक १४ अ – सोनल दुर्गे ब – पूजा सागर वाघ क – प्रवीण वाहुरवाघ ड – आशिष सोनोने ज़्यादा जानें अकोला प्रभाग क्रमांक १५ अ – भूषण चौधरी ब – नंदा दीपक इंगळे क – श्वेता लक्ष्मीकांत बाजड ड – समर्थ विजय शर्मा प्रभाग क्रमांक १६ अ – रेणू रवी थनजय ब – वैजयंती राजकुमार मूलचंदानी क – सौ. राजश्री राजकुमार मिश्रा ड – दर्शन रोशन राज प्रभाग क्रमांक १७ अ – सौ. सविता गजानन चव्हाण ब – सौ. अंकिता चेतन गुजर क – श्रीमती गीता रमाशंकर मिश्रा ड – श्री. राजेश कृपाशंकर मिश्रा प्रभाग क्रमांक १८ सपना अश्विन नवले बजरंग विकास रोडे अर्चना प्रदीप मुदिराज अश्विन उद्धवराव नवले प्रभाग क्रमांक १९ अ – अजय इंगोले ब – संगीता आत्राम क – सोनाली राजपूत ड – नैना निखिल ठाकूर प्रभाग क्रमांक २० अ – अविनाश मोरे ब – कुणाल शिंदे क – संगम मोहोळ ड – गौरव अग्रवाल

# १ जानेवारीपासून पिंप्री जैनपूर येथे ज्ञानेश्वरी पारायण सप्ताह

**अकोला,दि ३० (प्रतिनिधी) :**
वाचावी ज्ञानेश्वरी, डोळा पहावी पंढरी, ज्ञान होय अज्ञानासी, ऐसा वर या टीकेसी, या संत जनाबाई यांच्या अभंगोक्तीनुसार पिंप्री जैनपूर येथे दिनांक १ जानेवारी ते ८ जानेवारी दरम्यान श्री ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण अखंड व हरिनाम सप्ताह आयोजित करण्यात आला आहे.

श्री संत गजानन महाराज, श्री संत भास्कर महाराज, श्री संत गौरीशंकर महाराज व श्री संत वासुदेव महाराज, आदी संतांच्या चरण रजाने पुनीत झालेल्या पिंप्री जैनपूर येथे या सप्ताहामध्ये विविध वारकरी सांप्रदायिक कार्यक्रमांमध्ये पहाटे काकडा आरती, सकाळी ज्ञानेश्वरी पारायण, दुपारी प्रवचन, सायंकाळी हरिपाठ व रात्री हरिकीर्तन असा भरगच्च कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. दररोज दुपारी सुभाष महाराज बानेरकर यांचे ज्ञानेश्वरी निरूपण होईल. रात्रीच्या सत्रामध्ये सर्व श्री.ह.भ.प. वासुदेवराव महाराज महल्ले, देवेंद्र महाराज रेखाते, बाल कीर्तनकार शिवम महाराज पाटेकर,



राम महाराज गाढे, उमेश महाराज मोहोकार, आत्माराम महाराज वाकोडे, विष्णू महाराज गावंडे यांची कीर्तन सेवा संपन्न होईल. तसेच ८ जानेवारीला श्री.ह.भ.प. ज्ञानेशप्रसाद महाराज पाटील यांचे सुश्राव्य काल्याचे कीर्तन होवून दुपारी भव्य महाप्रसाद कार्यक्रम संपन्न होईल. दिनांक ७ जानेवारीला सायंकाळी नगरप्रदक्षिणा आयोजित करण्यात आली आहे.

सप्ताहामध्ये सकाळ व सायंकाळच्या सत्रात अन्नदान करणाऱ्या भक्तमंडळींमध्ये नरहरी महादेव वसु, जानकीराम विनायक बावस्कर, विनोद विश्वनाथ मानकर, किशोर विश्वनाथ पखान, पांडुरंग मुदगल मानकर, धनराज गुलाबराव पखान, पवन राजेश पखान, ज्ञानेश्वर अजाबराव पखान, पद्माकर श्रीराम भगत, संदीप अशोक पखान, भास्कर श्रीराम भगत, आनंद गजानन मानकर, अंबादास महाराज मानकर, श्री संत वासुदेव महाराज सांप्रदायिक भजन मंडळ पिंप्री ही भक्तमंडळी अन्नदान सेवा श्री चरणी अर्पण करणार आहेत. सप्ताहाचे व्यासपीठ नेतृत्व सुभाष महाराज बानेरकर, अनंता महाराज अवारे, तेजराव महाराज म्हसाये यांच्याकडे राहील. श्री हनुमान मंदिर, पिंप्री जैनपूर येथे संपन्न होणाऱ्या या श्री ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सप्ताहाच्या त्रितपपूर्ती सोहळ्याचा भाविक भक्तांनी बहुसंख्येने लाभ घेण्याचे आवाहन समस्त गावकरी मंडळी पिंप्री जैनपूर यांच्यार्ते करण्यात आले आहे.

# अकोल्यात रामशक्तीचा महास्फोट

## ५०१ विद्यार्थी यांच्या शंखनादाने शहर गुंजणार

**अकोला,दि ३० (प्रतिनिधी) :**
अयोध्येतील प्रभू श्रीरामांच्या नवसाकार मूर्तीच्या पुनर्सथापनेच्या १० लाख १९ हजार ५२० सेकंदांच्या पावन पूर्णतेनिमित्त अकोल्यातील जठारपेठ येथील बिर्ला राम मंदिरात उद्या, बुधवार दि. ३१ डिसेंबर २०२५ रोजी भव्य धार्मकि कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमांतर्गत सकाळी ९ वाजता अकोल्याच्या इतिहासात प्रथमच ५०१ विद्यार्थी-विद्यार्थिनी एकत्र येऊन ५० मिनिटांचा विराट शंखनाद करणार असून, या शंखनादाने संपूर्ण शहर रामनामने दुमदुमून जाणार आहे. या आध्यात्मिक नादातून प्रभू श्रीरामांच्या स्मरणाची दिव्य ऊर्जा सर्वत्र प्रसारित होईल, असा विश्वास आयोजकांनी व्यक्त केला आहे.शंखनादानंतर तत्काळ २४ तास अखंड रामनाम जप सुरू होणार असून तो३१ डिसेंबर २०२५ सकाळी ९.०० ते १ जानेवारी २०२६ सकाळी ९.०० या कालावधीत अखंडपणे चालणार आहे. नववर्षाची सुरुवात प्रभू रामाच्या नावाने करण्याचा हा भक्तीमय सोहळा भाविकांसाठी विशेष आकर्षण ठरणार आहे.बिर्ला राम मंदिराने गेल्या वर्षभरात राबवलेल्या विविध धार्मकि व सांस्कृतिक उपक्रमांमुळे मंदिर महाराष्ट्रातील एक महत्त्वाचे आध्यात्मिक केंद्र बनले आहे.

# पक्षीकट्टा उपक्रमातून युवा पक्षीमित्रांना नवी दिशा

■अकोला,दि ३१ (प्रतिनिधी) :
स्थानिक पक्षीमित्रांची नियमित भेट घडवून आणणे, विविध ठिकाणी पक्षी निरीक्षण करून त्यांची शास्त्रीय नोंद ठेवणे तसेच नव्या पिढीला पक्षी संवर्धन चळवळीशी जोडणे, या उद्देशाने महाराष्ट्र पक्षीमित्र, अकोला व निसर्ग कट्टा यांच्या संयुक्त विद्यमाने दर महिन्याला 'पक्षीकट्टा' हा उपक्रम राबविण्यात येतो. याच उपक्रमाचा द्विदशकी पक्षीकट्टा नुकताच वनिकी महाविद्यालय, डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला उत्साहात पार पडला. येथे या कार्यक्रमासाठी महाराष्ट्र पक्षीमित्रचे अध्यक्ष डॉ. जयंत वडतकर प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थित होते. यावेळी वनिकी महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. एस. एस. हरणे, प्राध्यापक डॉ. हर्षवर्धन देशमुख, निसर्गकट्टाचे संस्थापक अमोल सावंत तसेच महाराष्ट्र पक्षीमित्रचे अकोला जिल्हा समन्वयक डॉ. मिलिंद शिरभाते यांची प्रमुख उपस्थिती होती. मार्गदर्शन करताना डॉ. जयंत वडतकर यांनी पक्षी निरीक्षणाचे पर्यावरणीय, शैक्षणिक व संवर्धनात्मक महत्त्व स्पष्ट केले. 'पक्षीकट्टा' हा उपक्रम नव्या पक्षीमित्रांना घडविणारा असून तो राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात राबविला गेला पाहिजे. असे त्यांनी सांगितले. कार्यक्रमात सहभागी सदस्यांनी वनिकी महाविद्यालयाच्या परिसरात विविध पक्ष्यांचे निरीक्षण करून त्यांची शास्त्रीय नोंद ई बर्ड या आंतरराष्ट्रीय व्यासपीठावर नोंदविली.

# प्रतिबंधित 'चायना मांजा' जप्त; दोघांना बेड्या..!

■अकोला,दि ३० (प्रतिनिधी) :
अर्चति चांडक, पोलीस अधीक्षक, अकोला यांनी दिलेल्या निर्देशा नुसार ऑपरेशन प्रहार अंतर्गत जिल्हयात मानवी जीवनासाठी आणि मुक्या पक्ष्यांसाठी कर्दनकाळ ठरणाऱ्या प्रतिबंधित 'नायलॉन मांजा' (चायना मांजा) विरोधात अकोला पोलिसांनी मोठी कारवाई केली आहे. स्थानिक गुन्हे शाखेने (LCB) कृषी नगर अकोला, भागात छापा टाकून दोन आरोपींना अटक केली असून, त्यांच्याकडून एकूण ५४ हजार रुपये किमतीचा साठा जप्त केला आहे.अकोला येथील कृषी नगर परिसरात एका किराणा दुकानातून बंदी असलेल्या नायलॉन मांजाची छुप्या पद्धतीने विक्री होत असल्याची गुप्त माहिती स्थानिक गुन्हे शाखेला मिळाली होती. या माहितीची खातरजमा करून पोलीस पथकाने सापळा



रचला आणि पंचांच्या उपस्थितीत सदर दुकानाची झडती घेतली. यावेळी दुकानात लपवून ठेवलेला 'चायना मांजा' मोठ्या प्रमाणात मिळून आला. आरोपींची नामे १) गोपाल रामदास लाहे (वय ३० वर्षे, रा. भीम नगर, अकोला) २) मनिष बाबाराव खाडे (वय २५ वर्षे, रा. भीम नगर, अकोला), पोलिसांनी दरम्यान खालील मुद्देमाल हस्तगत केला आहे: चजछ्ज घढउ कंपनीचे ५१ बंडल (किंमत ५१,००० रु.) चजछ्जघढउ ऋखत्रऌढएठ कंपनीचे ३ बंडल (किंमत ३,००० रु.), एकूण किंमत: ५४,००० रुपये. या दोन्ही आरोपींविरुद्ध भारतीय न्याय संहिता (इछड) कलम ११०, २२३, ३(५) आणि पर्यावरण संरक्षण कायद्याच्या कलम ४ व १५ नुसार सिव्हिल लाईन पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवण्यात आला आहे.चायनिज मांजा शहरामध्ये पंतग उडविण्याकरीता वापरल्यामूळे दुचाकी चालक, पादचारी तसेच पशु पक्षी इत्यांदींचा जिव जाण्या इतपत गंभिर दुखापती होत असल्याचे दिसून येत आहे. त्यामूळे प्रतिबंधीत नायलॉन मांजा विक्रेते अपणास आढळून आल्यास त्यांचेबाबत माहीती देण्यास अकोला जिल्हा पोलीस दलाकडून नागरिकांना आवाहन करण्यात येत आहे. सदरची कार्यवाही मा. पोलीस अधिक्षक श्री अर्चति चांडक, अपर पोलीस अधिक्षक मा. बी. चंद्रकांत रेड्डी मा. श्री. शंकर शेळके पोलीस निरीक्षक स्थानिक गुन्हे शाखा अकोला यांचे मार्गदर्शनाखाली केले.

# निवासी शाळांतील विद्यार्थ्यांच्या विभागीय स्नेहसंमेलनाचा उत्साहात शुभारंभ

■अकोला,दि ३० (प्रतिनिधी) :
सामाजिक न्याय विभागार्ते शासकीय निवासी शाळांच्या विद्यार्थ्यांचे विभागीय स्नेहसंमेलन, क्रीडा व सांस्कृतिक कार्यक्रमाचा शुभारंभ उत्साहात जिल्हा क्रीडा संकुल येथे आज झाला.समाजकल्याण प्रादेशिक उपायुक्त माया केद्रार यांच्या हस्ते पथसंचलनाला हिरवी झेंडी दाखवून शुभारंभ करण्यात आला. यावेळी अमरावती विभागातील सहाय्यक आयुक्त मारुती वाठ, श्रीमती मंगला मून, श्री. मेरथ,श्री.चव्हाण, श्रीमती बोबडे आदी उपस्थित होते.जिल्हा क्रीडा संकुल येथे होत



असलेल्या या विभागीय स्नेहसंमेलनात अमरावती विभागातून पाचही जिल्ह्यांतील २६ निवासी शाळांमधील विद्यार्थी सहभागी झाले आहेत. यामध्ये सांस्कृतिक कार्यक्रमांबरोबरच क्रीडा स्पर्धामध्ये सांघिक व वैयक्तिक मैदानी खेळांचा समावेश आहे. निवासी शाळांतील कला, क्रीडा गुणांना वाव मिळण्यासाठी हा महोत्सव आयोजिण्यात आला आहे. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी संमेलन उपयुक्त ठरेल.

# पातूर तालुक्यातील २५० महिला शिक्षिकांनी घेतले कायद्याचे प्रशिक्षण



■अकोला,दि ३० (प्रतिनिधी) :
महाराष्ट्र शासन महिला व बालविकास विभाग अकोला, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण अकोला शिक्षण विभाग जिल्हा परिषद अकोला, गट शिक्षणाधिकारी कार्यालय पातूर यांचे संयुक्त विद्यम ने बालविवाह मुक्त भारत संकल्प अभियान १०० दिवस व बेटी बचाव बेटी पढाव या उपक्रमांतर्गत दिनांक ३०/१२/२०२५ रोजी श्री संत सेवालाल महाराज सभागृह पातूर येथे पातूर तालुक्यातील महिला शिक्षिका यांना महिला व बालके यांच्या कायदयाची माहिती व्हावी या करीता प्रशिक्षण कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. सदर कार्यशाळेचे उदघाटन अॅड संजय सेंगर माजी सदस्य बाल हक्क संरक्षण आयोग यांनी केले. कार्यशाळेचे प्रास्ताविक श्री गिरीश पुसदकर जिल्हा महिला व बालविकास अधिकारी अकोला यांनी केले त्यांनी आपल्या प्रास्ताविक मध्ये कार्यशाळा घेण्यामागे असणारे उद्देश यावर प्रकाश टाकला. कार्यशाळेला प्रमुख मार्गदर्शक म्हणून अॅड संजय सेंगर माजी सदस्य बाल हक्क संरक्षण आयोग,श्रीमती प्रांजली जैस्वाल सदस्य बाल कल्याण समिती श्रीमती शुभांगी लाहुडकर सुखाय फाउंडेशन अकोला, अॅड मनिषा भोरे केंद्र प्रशासक सखी वन स्टॉप सेंटर अकोला, अॅड रुपाली राऊत डॉ.प्रीती कोगदे, श्री प्रवीण डाबेराव गटशिक्षणधिकारी पातूर हे लाभले होते.

# प्रभातची सोयरा व आराध्या ह्यांची योगा स्पर्धेत राज्यस्तरावर निवड

■अकोला,दि ३० (प्रतिनिधी) :
प्रभात किडस स्कूलची सोयरा अंधारे व आराध्या घुगे ह्या खेळाडूंनी विभागस्तरीय योगा स्पर्धेत सहभाग घेतला होता. या योगा स्पर्धेत प्रभातच्या दोन खेळाडूंनी आपल्या खेळामध्ये दमदार कामगिरी करून यश संपादीत केल्याने त्यांची राज्यस्तरावर निवड झाली आहे.क्रीडा व युवक सेवा संचालनालय, पुणे अंतर्गत जिल्हा क्रीडा परिषद, जिल्हा क्रीडा संकुल व जिल्हा क्रीडा



अधिकारी कार्यालय, यवतमाळ यांच्या संयुक्त विद्यमाने विभागस्तरीय योगा स्पर्धेचे आयोजन नेहरू विद्यालय, नेर, यवतमाळ येथे विभागस्तरीय योगा स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.विभागस्तरीय सर्वसाधारण योगासन स्पर्धेत १४ वर्षाआतील मुलींमध्ये सोयरा अंधारे हिने प्रथम क्रमांक मिळविला तर तालात्मक योगासन स्पर्धेत १४ वर्षामध्ये आराध्या घुगे व सोयरा अंधारे ह्यांनी प्रथम क्रमांक मिळवून गोल्ड मेडलच्या मानकरी ठरल्या.सोयरा अंधारे व आराध्या घुगे ह्या विद्यार्थीनींना प्रभातच्या योगा प्रशिक्षक मयुरी इंगळे यांचे मार्गदर्शन लाभले. प्रभातचे संचालक डॉ. गजानन नारे, संचालिका सौ. वंदना नारे, सचिव निरज आवंडेकर, प्राचार्य वृषाली वाघमारे, उपप्राचार्य अर्चना बेलसरे, समन्वयक मो. आसिफ, क्रीडा विभागप्रमुख स्वप्निल मांदाळे व उप विभागप्रमुख आशिष बेलोकार यांनी विद्यार्थयांचे कौतुक केले असून पुढील स्पर्धेकरीता शुभेच्छा दिल्या आहेत.

# अजिंक्य कौशल्य विकास संस्थेचे कार्य कौतुकास्पद: एस.एन.साळुंके



■अकोला,दि ३० (प्रतिनिधी) :
आजच्या काळात युवकांना रोजगाराभिमुख व आरोग्यविषयक प्रशिक्षण देणाऱ्या अजिंक्य कौशल्य विकास संस्थेचे कार्य कौतुकास्पद असून आरोग्याबाबत जागरूकता वाढविण्यासाठी योग, निसर्गोपचार व नर्सिंगसारख्या अभ्यासक्रमांची मोठी गरज आहे.अशा अभ्यासक्रमांमुळे विद्यार्थयांना स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध होतात, असे प्रतिपादन जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी एस.एन.साळुंके यांनी केले.ते अजिंक्य कौशल्य विकास संस्था यांच्या वतीने आयोजित योग व निसर्गोपचार तसेच नर्सिंग प्रमाणपत्र अभ्यासक्रम प्रमाणपत्र वितरण सोहळ्यात बोलत होते.यावेळी निरामय एज्युकेशन अँड मेडिकल रिसर्च फाउंडेशनचे अध्यक्ष डॉ. सुनील बिहाडे, प्राचार्य डॉ.योगेश पाटील, वरिष्ठ लिपिकश्री भगवान सुलताने, अजिंक्य फिटनेस पार्कचे धनंजय भगत आदी उपस्थित होते. कार्यक्रमात यशस्वीरीत्या अभ्यासक्रम पूर्ण केलेल्या विद्यार्थयांना मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ सुनील बिहाडे यांनी संस्थेच्या वतीने सुरू असलेल्या उपक्रमांची माहिती देताना भविष्यात अधिकाधिक व्यावसायिक व कौशल्याधारित अभ्यासक्रम राबविण्याचा मानस व्यक्त केला.यावेळी शिक्षकवर्ग, प्रशिक्षणार्थी, पालक व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन धनंजय भगत आभारप्रदर्शन डॉ. सुनील बिहाडे यांनी केले.पद्मनिी जोत, नंदा भारसाकडे भाग्यश्री अभ्यंकर, विशाल बोरे यांनी मनोगत व्यक्त केले कार्यक्रम यशस्वितेसाठी सानिका खापरकर, रोहन जांभे, माधुरी भगत, गार्गी भगत, वंदना वानखडे यांचे सहकार्य लाभले. सर्वांनी पूर्ण वर्ष भरायची फीत अवलोकन केली तसेच रथसप्तमी सूर्यनमस्कार दिन २७ २८ जानेवारी २०२६ रोजी होणाऱ्या कार्यक्रमा संबंधी माहिती प्राप्त केली.

## प्रवाशांच्या सुलभ प्रवासासाठी 'रेल मदत' ॲप आणि एकत्रित हेल्पलाईन क्रमांक १३९

**अकोला :** भारतीय रेल्वेने प्रवाशांच्या सुरक्षेसाठी, सोयीसाठी आणि समाधानकारक प्रवास अनुभवासाठी ठरेल मदत ॲप आणि एकत्रित हेल्पलाइन क्रमांक १३९ यांच्यामार्फत एक विश्वासार्ह आणि सुलभ सहाय्य प्रणाली उभारली आहे. प्रवाशांना कोणत्याही समस्येसाठी, चौकशीसाठी किंवा मदतीसाठी वेगवेगळ्या क्रमांकांवर फोन करण्याची गरज नाही.

भारतीय रेल्वेने सर्व आपत्कालीन आणि सामान्य सहाय्य क्रमांक एकत्र करून हेल्पलाइन १३९ सुरू केली आहे, जी २४ तास सेवा देते. रेल मदत ॲप भारतीय रेल्वेने विकसित केलेला हा एक वापरकर्ता अनुकूल मोबाईल ॲप असून तो पुढील सेवा प्रदान करतो.

# आळंदा येथे शेतकरी शास्तज्ञ संवादात्मक चर्चा कार्यक्रम संपन्न!

■अकोला,दि ३० (प्रतिनिधी) :
डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विध्यापीठाचे आदरणीय कुलगुरू, डॉ. शरद गडाख यांच्या मार्गदर्शनात कोरडवाहू शेती संशोधन व कृषी हवामानशास्त्र प्रकल्प यांच्या माध्यमातून कोरडवाहू शेतकऱ्यांना विविध उपक्रमांद्वारे म ार्गदर्शन करण्यात येत आहे. केंद्रीय कोरडवाहू कृषी अनुसंधान संस्थान, हैद्राबाद चे संचालक डॉ. व्ही. के सिंघ यांनी कोरडवाहू शेती संशोधन अवलोकनासाठी नुकतीच भेट दिली. सदर भेटी प्रसंगी त्यांच्या सोबत डॉ.जे.व्ही. एन.एस. प्रसाद, प्रकल्प समन्वयक, कोरडवाहू शेती अनुसंधान प्रकल्प, हैद्राबाद व डॉ. एस. एस. माने, संशोधन संचालक, डॉ.पं.दे.कृ.वि अकोला उपस्थित होते.

या भेटी दरम्यान त्यांनी वरखेड ता.बाशीटाकळी जि.अकोला येथे सुरु असलेल्या राष्ट्रीय हवामान संवेदनक्षम शेती वर आधारित राष्ट्रीय अभिनव प्रकल्प (NICRA) या प्रकल्पातील लाभार्थी शेतकरी श्री. सचिन कोंदणकार, श्री. गजानन कोंदणकार, श्री.प्रकाश डांगे, श्री. महादेव टोपले व श्री. महादेव डांगे यांच्या प्रक्षेत्रांना



भेटी दिल्या. कोरडवाहू शेतीचे तंत्रज्ञान: बिबिएफ व शेततळे, अंतरपीक पद्धती, जल व मृद संधारण पद्धती यांचा अवलंब केल्याम ुळे शेतकऱ्यांना झालेल्या लाभा बद्दल त्यांनी समाधान व्यक्त केले.

संचालक डॉ. व्ही के सिंघ यांनी गाव आळंदा, ता. बाशीटाकळी जि. अकोला येथे कार्यान्वयित कोरडवाहू एकात्मिक शेती पद्धती प्रकल्प (ठखत्रड) येथील प्रत्याक्षिकांना सुद्धा भेटी दिल्या. या प्रक्षेत्र भेटीचे औचित्य साधून आळंदा येथे ङ्गशेतकरी शास्तज्ञ संवादात्मक चर्चाङ्क कार्यक्रम घेण्यात आला. या कार्यक्रम ास डॉ. एस. एस. माने, संशोधन संचालक, डॉ.पं.दे.कृ.वि अकोला, डॉ. अनिता चोरे, प्रमुख शास्त्रज्ञ, डॉ. राजेश पातोडे, वरीष्ठ शास्त्रज्ञ (जल व मृद संधारण), डॉ. अरविंद तुपे (कृषी हवामानशास्त्रज्ञ), डॉ. एम. एम. गणवीर (वरीष्ठ शास्त्रज्ञ कृषीविद्या), कु. संध्या कवा (तालुका कृषी अधिकारी बाशीटाकळी), कृषी विभागाचे अधिकारी/कर्मचारी, आळंदा गावातील सर्व शेतकरी व महिला यांची बहुसंख्येने उपस्थिती होती.

# डॉ.पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख यांच्या जयंतीनिमित्त तालुका रंगभरण स्पर्धा संपन्न

■तेल्हारा,दि ३१ (प्रतिनिधी) :
तेल्हारा येथील श्री शिवाजी शिक्षण संस्था अमरावती द्रारा संचालित श्री शिवाजी हायस्कूल तेल्हारा येथे शिक्षण महर्षी डॉ पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख यांच्या जयंतीनिमित्त तेल्हारा तालुका स्तरावर रंग भरण स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. या कार्यक्रमाचे उदघाटन सुधीर बापू देशमुख शाळा समिती सदस्य यांच्या हस्ते करण्यात आले आहे.
कार्यक्रम चे अध्यक्ष हि डी गावंडे मुख्याध्यापकहे होते तर अतिथी म्हणून सौ विद्या ताई देशमुख मुख्याध्यापिका, सौ शर्वरी हिंगणकर जयंती उत्सव प्रमुख, धनंजय भंगाळे जयंती उत्सव



प्रमुख, सुनील वंजारी शिक्षक प्रतिनिधी विजय दहे शिक्षकेत्तर कर्मचारी वर्ग प्रतिनिधी, उपस्थित होते.

यावेळी सर्व शिक्षक शिक्षिका शिक्षकेत्तर कर्मचारी वर्ग विद्यार्थी यांनी सहभाग घेतला आहे.रंगभरण स्पर्धा उदघाटनप्रसंगी चे सुत्रसंचालन बळीराम कुवारे सर यांनी केले आहे. तर आभार प्रदर्शन शांतीकुमार सावरकर यांनी केले आहे.

# परीक्षा केंद्रावर प्रतिबंधात्मक आदेश लागू

■अकोला,दि ३० (प्रतिनिधी) :
सांगली जिल्ह्यातील मिरज येथील पद्मभूषण वसंतदादा पाटील शासकीय रूग्णालय व आरोग्य शिक्षण पथक या संस्थेच्या सरळसेवा पदभरतीसाठी उद्या (३१ डिसेंबर) दु. १ वा. परीक्षा होणार असून, जिल्ह्यातील २ परीक्षा केंद्रांवर १०० मीटर परिसरात सकाळी ६ वा. ते सायं. ८ वा. दरम्यान प्रतिबंधात्मक आदेश लागू करण्यात आले आहेत. तसा आदेश जिल्हाधिकारी वर्षा मीना यांनी जारी केला.वाशिम रस्त्यावरील (कापशी) दत्तात्रय पेट्रोलपंपानजिकचे श्री इन्फोटेक आणि बाभुळगाव येथील श्री शिवाजी अभियांत्रिकी व तंत्रज्ञान महाविद्यालय अशी दोन परीक्षा केंद्रे आहेत. केंद्रावर पाचहून अधिक व्यक्तींनी एकत्रित प्रवेश करू नये, झेरॉक्स सेंटर, पानपट्टी आदी बंद ठेवावे. मोबाईल, लॅपटॉप, इंटरनेट साधने वापरास मनाई आहे. अनधिकृत व्यक्तींना प्रवेश नाही.

MAHAGENCO
Maharashtra State Power Generation Co. Ltd.

## e-TENDER NOTICE – 110 / 2025–26

Following e-Tender offers are invited online from registered contractors / companies etc. are available at our website https://eprocurement.mahagenco.in.

| e-Tender No. | RFX No. | Particulars of Work / Supply | Estt. Cost Rs. (In Lakhs) |
|---|---|---|---|
| TN0788 WTP1 | 3000064144 | BIENNIAL MAINTENANCE CONTRACT OF ONE CONTINUOUS AMBIENT AIR QUALITY MONITORING STATION (CAAQMS) AT WTP-500 MW KHAPERKHEDA TPS. | 20.94 |
| TN0796 EM1 | 3000064120 | SUPPLY OF HV BUSHING FOR HT TRANSFORMERS OF UNIT #3 &4, TPS KHAPERKHEDA. | 52.92 |
| TN0798 AHP1 | 3000064276 | WORK OF LIFTING, LOADING & TRANSPORTATION OF FLY ASH AND BOTTOM ASH FROM U# 3 &4 AREA TO WAREGAON ASH BUND. | 5.40 |
| TN0802 CHP2 | 3000064289 | WORK OF DESIGN, DEVELOPMENT, MANUFACTURING, MODIFICATION WITH ERECTION OF SINTERED SILICON CARBIDE MODULAR CHUTE BOXES OF BELT CONVEYOR-103A TO WOBBLER FEEDER-101/102 UP TO RBF FLOOR ALONG WITH INLET HOPPER AND "Y" CHUTE INTERCHANGEABILITY SYSTEM WITH FLAP GATE FOR SMOOTH FLOW & CENTER FEEDING INSTALLED AT COAL HANDLING PLANT 500MW, KHAPERKHEDA TPS, KHAPERKHEDA. | 110.75 |
| TN0803 CHP2 | 3000064290 | WORK OF DESIGN, DEVELOPMENT, MANUFACTURING, MODIFICATION WITH ERECTION OF SINTERED SILICON CARBIDE MODULAR CHUTE BOXES OF RBF FLOOR UP TO INLET CHUTES OF WOBBLER FEEDER-101/102 FOR SMOOTH FLOW & CENTER FEEDING INSTALLED AT COAL HANDLING PLANT 500MW, KHAPERKHEDA TPS, KHAPERKHEDA. | 109.25 |

Note »
1) Tender cost is Rs. 1,000 /- + GST.
2) Above Refer e-Tender No. TN0788 / RFx No. 300064144 / WTP1 is amended in SRM & special qualifying requirements for Environment monitoring work is incorporated in above tender. Please Note.

Sd /-
Chief Engineer (O&M)
MSPGCL, TPS Khaperkheda

RNI NO-46973/1986 Mahasagar Akola Printed, published and owned by Shrikrishna Tansukhdas Chandak. Printed at Arunodaya Press, Cotton Market, Nagpur-440018 and published at Dainik Mahasagar Office, Kamala Square, Durga Chowk, Akola. **Group Editor-in-Chief and Managing Director** - Shrikrishna Tansukhdas Chandak, **Group Editor** - Sandeep Ramrao Kale, **Managing Editor** - Pankaj Shrikrishna Chandak. **Local Editor** Purushottam Madhukarrao Dhole Phone 9881489479 (Responsible for editorial as per PRB act). Head Office Phone 7447735851,9922970023.

आर.एन.आय. नोंदणी क्रमांक ४६९७३/१९८८ महासागर अकोला **मालक, मुद्रक, प्रकाशक :** श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरूणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर, ४४००१८, येथे छापून, दैनिक महासागर कार्यालय, ॊमला स्केअर, दुर्गा चौक, अकोला, येथे प्रकाशित केले. **मुख्य संपादक व मॅनेजिंग डायरेक्टर : श्रीकृष्ण तनसुखदास चांडक, समूह संपादक : संदीप रामराव काळे, प्रबंध संपादक : पंकज श्रीकृष्ण चांडक**
**स्थानिक संपादक : *पुरूषोत्तम मधुकरराव ढोले, फोन : ९८८१४८९४७९*** (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी स्थानिक संपादकांची राहील.)

# रामराज्याच्या नावाखाली केंद्रीकरणाचे राजकारण..

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी कायदा (मनरेगा) ऐवजी लोकसभेत सादर करण्यात आलेले विकास भारत - रोजगार आणि उपजीविकेची हमी मिशन (ग्रामीण) हे विधेयक अनेक कारणांमुळे नाकारले पाहिजे. ते केवळ नाव बदलण्याचाच नाही तर विद्यमान योजनेचे मूलभूत स्वरूप देखील बदलण्याचा प्रयत्न करते. हे भाजपच्या नेतृत्वाखालील केंद्र सरकारचा राज्यांसाठी विकासाचा अवकाश कमी करण्याचा आणखी एक प्रयत्न आहे.

-------------------

नाव बदलण्याचे एकमेव कारण म्हणजे भाजपचे वैचारिक मार्गदर्शक, आरएसएस यांचे गांधींशी खोलवर मतभेद होते. २० वर्षे जुन्या या योजनेत गांधींच्या नावाचा वापर त्यांच्या ग्राम स्वराज या संकल्पनेशी असलेल्या संबंधाचे प्रतीक आहे, जे लोकशाही विकेंद्रीकरणावर भर देते. तथापि, नवीन विधेयक या उद्देशात सकारात्मक योगदान देणार नाही, कारण प्रस्तावित कायदा मोठ्या प्रमाणात निर्णय घेण्याचे अधिकार केवळ केंद्र सरकारकडे सोपवतो.

सरकारी समर्थकांचा असा युक्तिवाद आहे की कामाच्या दिवसांची संख्या दरवर्षी १२५ पर्यंत वाढवणे हा ग्रामीण भारतातील लोकांसाठी एक मोठा फायदा आहे. तथापि, मनरेगा योजनेअंतर्गत कुटुंबांना देण्यात आलेल्या रोजगाराच्या आकडेवारीवरून असे दिसून येते की २०२०-२१ आर्थिक वर्षात, कोविड-१९ साथीच्या वर्षात, फक्त ९.५% (अंदाजे ७.२ दशलक्ष) कुटुंबांनी प्रत्यक्षात १०० दिवस काम केले. मागील दोन वर्षांत, फक्त ७% कुटुंबांना त्यांचा पूर्ण कामाचा कोटा मिळाला.

व्हीबी-जी राम जी यांना केंद्र प्रायोजित योजना म्हणून नियुक्त करून, केंद्र सरकारने त्यांना मिळालेला विशेष दर्जा काढून टाकला आहे, ज्या अंतर्गत ते अकुशल शारीरिक श्रमांसाठी वेतन देण्याचा संपूर्ण खर्च उचलत होते. प्रस्तावित योजनेत, केंद्र आणि राज्यांमधील निधी वाटप पद्धती सामान्यतः ६०:४० असेल.

सध्याच्या योजनेचा एक फायदा म्हणजे ग्रामीण मजुरीत झपाट्याने वाढ झाली आहे. राज्यांचे वित्त खराब स्थितीत आहे आणि जीएसटी रचनेत बदलांच्या परिणामांबद्दल देखील चिंता आहे. शिवाय, थेट रोख हस्तांतरण योजनांना राजकीय बदल घडवून आणणारे म्हणून पाहिले जात असले तरी, हे उघड गुपित आहे की या नवीन योजनेत सहभागी होण्यास फारशी राज्ये उत्साही नसतील.

सर्वात महत्त्वाचे म्हणजे, सध्याच्या कायद्याचा आत्मा - तळापासून वरपर्यंत, मागणीपर्यंत चालणारी योजना - काढून टाकण्यात आली आहे. प्रस्तावित केलेला पुरवठा-चालित चौकट आहे, ज्यामध्ये केंद्र सरकारने वाटप मर्यादा निश्चित केली आहे. शिवाय, या मर्यादेपेक्षा जास्त खर्च राज्यांना करावा लागेल, हे एक नवीन वैशिष्ट्य आहे. तामिळनाडू आणि केरळने या विधेयकाला विरोध केला आहे, कारण ते राज्यांच्या हितांना कमी लेखते.

सन २००५ मध्ये केंद्रात असलेल्या काँग्रेस सरकारने मनरेगा या नावाने एक योजना सुरू केली होती. मनरेगाचं पूर्ण नाव आहे महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी अधिनियम. ही योजना नागरिकांच्या कामाच्या अधिकाराला केंद्रस्थानी ठेवून लागू करण्यात आली होती. या योजनेनुसार कोणत्याही ग्रामीण कुटुंबातील प्रौढ सदस्यांना वर्षाला किमान शंभर दिवसांचा रोजगार देण्याची सरकारची हमी होती.



**विकास परसराम मेश्राम**
**मु+पो. झरपडा, ता. अर्जुनी/मोर, जि. गोंदिया.**
**7875592800**

योजना लागू झाल्यानंतर तिच्यावर मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचाराचे आरोप झाले होते. त्यानंतर केंद्रात भाजपच्या नेतृत्वाखालील सरकार सत्तेत आलं, तेव्हा पंतप्रधानांनी या योजनेला काँग्रेसच्या अपयशांचं जिवंत स्मारक असं संबोधलं होतं. यासोबतच त्यांनी हेही म्हटलं होतं की, मी ही योजना बंद करणार नाही. माझी राजकीय सूजबूज सांगते की, काँग्रेसच्या अपयशाचं स्मारक म्हणून तिला वाजत-गाजत सुरू ठेवायला हवं. त्यामुळे आपल्या अकरा वर्षांच्या सत्ताकाळात भाजपच्या नेतृत्वाखालील सरकारने ही योजना सुरूच ठेवली. वस्तुतः ही एक गरज होती आणि कोणत्याही लोककल्याणकारी राज्यात अशा गरजेकडे दुर्लक्ष करता येत नाही.

मनरेगा ही योजना किती उपयुक्त ठरत आहे, पूर्वी त्यात किती भ्रष्टाचार होता आणि आता किती आहे, हा स्वतंत्र चर्चेचा विषय असू शकतो. मात्र आज या विषयावर चर्चा करण्याची गरज सरकारने केलेल्या या घोषणेमुळे निर्माण झाली आहे की, २०४७ पर्यंत भारताला विकसित राष्ट्र बनवण्यासाठी या योजनेचं नाव बदलणं आवश्यक आहे. सरकारने ठरवलं आहे की आता या योजनेला पूज्य बापू ग्रामीण रोजगार योजना असं नाव दिलं जाईल संक्षेपाने जी रामजी विधेयक. नाव बदलण्यासोबतच या योजनेत इतरही काही बदल केले जात आहेत.

हे बदल स्वतंत्र चर्चेचा विषय आहेत. सध्या जो वाद सुरू आहे, तो असा की या जनहितकारी योजनेच्या नावातून राष्ट्रपिता महात्मा गांधी यांचं नाव सरकार का काढत आहे? या संदर्भात आतापर्यंत दिली जात असलेली उत्तरं एवढ्यापुरतीच मर्यादित आहेत की स्वातंत्र्याच्या शंभराव्या वर्षापर्यंत विकसित भारताचं स्वप्न साकार करण्यासाठी असं करणं गरजेचं आहे!

असंही म्हटलं जात आहे की नाव बदलल्याने काय फरक पडतो? महात्मा गांधींच्या जागी ह्यपूज्य बापूह्न हेच नाव दिलं जात आहे. त्यातही गांधीजींचे आराध्य देव राम यांचं नाव आहेच. मग नाव बदलल्याने कुणाला आक्षेप का असावा?

आक्षेप यासाठी आहे की, प्रश्न केवळ महात्मा गांधींच्या जागी बापू हे नाव देण्यापुरता मर्यादित नाही... प्रश्न सरकारच्या नियतेचा आहे. संसदेत मनरेगाची टीका करताना पंतप्रधान मोदींनी आपल्या राजकीय सूजबूज याचाही उल्लेख केला होता. आज योजनेचं नाव बदलताना ही राजकीय सूजबूज स्पष्टपणे सांगितली जात नसली, तरी भाजपच्या नेतृत्वाखालील सरकारवर नाव बदलण्याच्या राजकारणाचा आरोप केला जात आहे.

गेल्या दहा-बारा वर्षांत या नाव बदलण्याच्या राजकारणाची वारंवार चर्चा झाली आहे. काँग्रेसचा सातत्याने आरोप राहिला आहे की, तिच्या योजनांची नावं बदलून सध्याचं सरकार श्रेय लाटण्याचा प्रयत्न करत आहे. या धोरणावरही चर्चा होऊ शकते; पण आज खरी गरज आहे ती म्हणजे योजना, ठिकाणं, शहरं यांची नावं बदलून केल्या जाणाऱ्या राजकारणाच्या औचित्यावर विचार करण्याची.

गेल्या दहा-बारा वर्षांतच पाहिलं तर लक्षात येतं की असंख्य ठिकाणांची, रस्त्यांची नावं बदलून राजकीय फायदा घेण्याचा प्रयत्न झाला आहे. आणि हे केवळ भाजपच करत आहे असं नाही. वेगवेगळ्या काळात वेगवेगळ्या सरकारांनी असं केलं आहे आणि आता तर ही जणू एक परंपराच बनली आहे. राजधानी दिल्लीत कित्येक रस्त्यांची नावं बदलली गेली आहेत. पण समजून घेण्यासारखी गोष्ट म्हणजे प्रत्येक बदल म्हणजे प्रगती नसते.

राजपथाचं कर्तव्य पथ असं नामांतर केल्याने त्या रस्त्यावरून चालणाऱ्यांची मानसिकता आपोआप बदलणार नाही. मानसिकतेचं परिष्कार करण्यासाठी समाजाच्या विचारधारेला बदलण्याची गरज असते. अतार्किक बदलांनी काही साध्य होत नाही. ठोस बदलांची आवश्यकता आहे.

सांस्कृतिक पुनर्निर्मितीचा युक्तिवाद किंवा इतिहासातील कथित चुकांचा आधार घेऊन नावं बदलणं ही मुळात संकुचित विचारसरणीच दर्शवते. या विचारातून बाहेर पडणं आवश्यक आहे. हेही समजून घेणं गरजेचं आहे की फक्त नाव बदलल्याने परिस्थिती बदलत नाही.

मनरेगा योजनेत काही दोष असतील, तर ते गांधीजींचं नाव जोडलेलं असल्यामुळे नव्हते; आणि फक्त आता नवीन नावात भगवान राम यांचं नाव जोडल्यामुळे ती योजना चांगली ठरणार नाही.

ज्या रामराज्याची दुहाई बापूंनी दिली होती, या रामराज्याच्या संकल्पनेला राजकीय सूजबूज म्हणून घेतलेल्या निर्णयांशी जोडणं म्हणजे रामराज्याच्या संकल्पनेशीच खेळ करणं आहे.

मनरेगाचं नामांतर जर शासनाच्या राजकीय सूजबूजीनुसार केलं जात असेल, तर त्यामागे कुठेतरी राजकीय हेतू आहे, असंच त्याचा अर्थ होतो. या नाव बदलण्याच्या राजकारणापासून दूर राहिलं तरच खऱ्या विकासाच्या पायऱ्या चढता येतील. पण राजकीय स्वार्थासाठी नाव बदलण्याच्या राजकारणातून बाहेर पडणं अत्यावश्यक आहे. विकासाच्या दृष्टीने हे राजकारण कुठेही पोहोचवणार नाही. आणि शेवटी हा प्रश्नही सरकारलाच उत्तरावा लागेल की मनरेगामधून महात्मा गांधींचं नाव काढणं का आवश्यक वाटलं?

ते महात्मा कोणत्याही एका राजकीय पक्षाचे नव्हते; ते संपूर्ण राष्ट्राचे आणि संपूर्ण विश्वाचे होते. त्यांच्या नावाने चालणाऱ्या एखाद्या योजनेत बदल करण्याचा अर्थ असा नसावा की त्यातून राजकीय स्वार्थाचा वास यावा. देश-विदेशात गांधींच्या पुतळ्यांसमोर मान झुकवून नव्हे, तर गांधींनी दाखवलेल्या मार्गावर चालल्यानेच खरा बदल घडेल.

गांधींचं नाव काढण्याची मानसिकता म्हणजे गांधींनाच नाकारण्याचं प्रतीक आहे. आणि या विधेयकाचे एक प्रमुख वैशिष्ट्य म्हणजे पेरणी आणि कापणी दरम्यान योजनेचे काम शेतीच्या कामाशी संघर्ष करत नाही याची खात्री करणे.

राज्यांशी सल्लामसलत केल्यानंतर, ते मनरेगा योजनेत स्पष्टपणे समाविष्ट केले जाऊ शकते. ग्रामीण विकास मंत्री शिवराज सिंह चौहान यांनी कितीही आग्रहाने दावा केला की नवीन कायदा गांधींच्या आत्म्याशी सुसंगत आहे, तरीही रामराज्याच्या कल्पनेचे मुख्य ध्येय असलेले सुशासन, विकेंद्रित तळागाळातील लोकशाहीशिवाय वास्तवात येणार नाही - प्रस्तावित कायदा या स्थितीला प्रोत्साहन देत नाही किंवा त्याचे पालनपोषण करत नाही.

■ ■ ■

# वाघ म्हणाला बिबट्याला...

काल वाघ म्हणाला बिबट्याला,
अरे तुझी सरकारकडे तक्रार झालीय.
थोडा कानोसा घेतल्यावर माझ्या,
वेगळीच खबर कानावर आलीय.

तू गावात घुसून अगाऊपणा केलास,
त्याचा फायदाच झालाय म्हणे.
एक कोटी बकऱ्या पाठवायचा निर्णय,
मंत्री मंडळाने केलाय म्हणे.

तुझ्या सारखी युक्ती मला नाही सुचली,
मी ही असे करायचे होते काय?
आमच्या हातानेही काही गावातले,
माणसं मरायचे होते काय?

बिबट्या म्हणाला वाघाला
अरे,
सरकारी योजनाचं काय
खरय.
समोर गेलोत तर आफ्रिकेत
सोडतील,
लपून बसतोत तेच बरय.

सरकारने पाठवले तरी तुला वाटतय का?
आपल्या पर्यंत बकरे येतील?
अरे ज्यांच्या नावाने टेंडर काढलंय,
तेच बकरे पळवून नेतील.

जंगलात बकरे सोडले म्हणून,
सरकार पर्यंत अहवाल जाईल.
नाव फक्त बिबट्याचं आणि,
बकरे मात्र दुसराच खाईल.

सरकारी योजना जेवढ्याला तेवढी,
कर्मचारी जनतेपर्यंत नेत नसतात
म्हणून एका कोटी बकरे सुद्धा,
बिबट्या पर्यंत येत नसतात...



# महापालिका निवडणुका नवीन पद्धत

**उत्तरार्ध**

**लेखन : सुधीर थोरवे**
**संपादन: देवेंद्र भुजबळ**
**9869484800**

आणखी एक महत्त्वाचा मुद्दा म्हणजे की चार नगरसेवक म्हणजे नंतर ह्याच प्रभागाचे चार विभाग होतील का? तर तसे नाही. प्रत्यक्षात कायद्याने असा कोणताही अधिकृत विभाग केलेला नाही. चारही नगरसेवक संपूर्ण प्रभागासाठी समान जबाबदार असतील. नागरिक कोणत्याही नगरसेवकाकडे आपली समस्या किंवा तक्रार मांडू शकतात. व्यवहारात मात्र नगरसेवक आपापसात कामाचे क्षेत्र अनौपचारिकपणे वाटून घेऊ शकतात परंतु हे वाटप प्रशासकीय नोंदीत कायद्याने ठेवता येणार नाही.

आणखी एक महत्त्वाचा मुद्दा म्हणजे ब?्याच पक्षांची युती झालेली आहे. नवी पद्धत आणि विविध पक्षांच्या युतीचे गणित यामुळे निवडणूक अधिक गुंतागुंतीची झाल्यासारखी वाटते. सामान्य नागरिकांसाठी हा कसोटीचा काळ ठरू शकतो.

युतीमध्ये चार नगरसेवक निवडावे लागणार तेव्हा युती म्हणजे केवळ विचारांचा मेळ नसून तर ती अंकगणिताची कवायत असते. दोन पक्षांची युती असेल तर दोन अधिक दोन किंवा तीन अधिक एक हा फॉम्युर्ला वापरला जाऊ शकतो. हा निकष नागरिकांच्या गरजांवर नाही तर कोण जास्त जिंकू ह्यावर ठरवले जाणार असले तरी नागरिकांनी मात्र निवडणुकीला जाण्यापूर्वी त्याचा अभ्यास करणे गरजेचे आहे, जेणेकरून योग्य अशा चार उमेदवारांनाच मतदान करता येईल.

या नव्या व्यवस्थेमुळे नागरिकांना काही फायदे मिळू शकतात. त्यामध्ये एक नगरसेवक दुर्लक्ष करत असल्यास दुसरा पर्याय उपलब्ध राहील. महिलांना आणि विविध सामाजिक घटकांना प्रतिनिधित्वाची संधी वाढू शकते. तसेच चार नगरसेवकांमधील स्पधेर्मुळे कामाचा दर्जा सुधारू शकतो. एका प्रभागातून चार नगरसेवक ही पद्धत चांगली की वाईट, हे पूर्णपणे नागरिकांच्या जागरूकतेवर अवलंबून आहे.

योग्य उमेदवार निवडले आणि त्यांना सतत जबाबदार धरले, तर ही व्यवस्था लोकशाहीसाठी अधिक मजबूत करू शकते. अन्यथा ती गोंधळ वाढवणारी ठरू शकते.

■ ■ ■

# पक्षबदलूंना जनतेने धडा शिकवा!

**वाचक लिहितात**

महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर सर्वच पक्ष जोमाने तयारीला लागले आहेत. पक्षाची अधिकृत उमेदवारी देताना वाडार्तील जुन्या जाणत्या एकनिष्ठ कार्यकर्त्यापेक्षा त्या वार्डात वजन कुणाचे आहे याचा विचार आधी केला जात आहे मग तो कोणत्याही पक्षाचा का असेना. त्याला आपल्याकडे खेचण्याची स्पर्धा रंगताना पाहायला मिळते आहे.

एखाद्या पक्षाच्या तिकिटावर निवडून आलेल्या उमेदवाराने पक्षाशी एकनिष्ठ राहावे यासाठी १९८५ मध्ये पक्षांतरबंदी कायदा करण्यात आला. या कायद्यान्वये उमेदवाराने निवडून आल्यानंतर अन्य पक्षात प्रवेश केला, तर त्याचे त्या सभागृहाचे सदस्यत्व रद्दबातल ठरवण्यात येते; मात्र निवडणुकांच्या तोंडावर जो घोडेबाजार चालतो त्यावर दुर्दैवाने कायद्याचा कोणताच अंकुश ठेवण्यात आलेला नाही.

पक्षाने तिकीट नाही दिले, पक्षश्रेष्ठींविषयी नाराजी, पक्षांतर्गत मतभेद किंवा अन्य पक्षाने दिलेली मोठी ऑफर अशा या ना त्या कारणाने अनेक नेतेमंडळी निवडणुकांच्या तोंडावर पक्ष बदलत असतात. पक्षाची प्रमुख मंडळीही अन्य पक्षातील मोठा मासा आपल्या गळाला लागावा यासाठी बराच काथ्याकूट करत असतात.

ही पक्षबदलू मंडळी आपल्याशी एकनिष्ठ असलेल्या कार्यकर्त्यांनाही सोबत घेऊन जातात. बड्या राजकीय पक्षांना हे नित्याचे असले, तरी सामान्य कार्यकर्त्यांचा मात्र अशा घटनांतून हिरमोड होत असतो. आपल्या स्वाथार्साठी दर निवडणुकांना खांद्यावरील झेंडे बदलणारी ही मंडळी कधीतरी जनतेशी एकनिष्ठ राहू शकतील का? अशा पक्षबदलू स्वार्थांध उमेदवारांना खरेतर जनतेनेच मतदानातून धडा शिकवायला हवा.

■ **सौ. मोक्षदा घाणेकर**
**काळाचौकी, मुंबई.**

# करील मनोरंजनातून शिक्षण जो मुलांचे...
# जडेल नाते प्रभूशी तयाचे!

गेली ४० वर्षे बालसाहित्य आणि बालशिक्षण या क्षेत्रांमध्ये अतुलनीय योगदान देणारे आणि ज्यांच्या 'आभाळमाया' या बालकवितासंग्रहाला साहित्य अकादमीचा २०२५ चा पुरस्कार प्राप्त झाला आहे असे ज्येष्ठ साहित्यिक तथा शिक्षणतज्ज्ञ डॉ. सुरेश सावंत म्हणतात की, आजची शिक्षणप्रणाली ही बालककेंद्री आणि ज्ञानकेंद्री नसून बोलके पोपट घडविणारी आहे. अशा साचेबद्ध आणि चिरेबंद शैक्षणिक वातावरणात बालकांची सर्जनशीलता मारली जात आहे. त्यांच्यात न्यूनगंड वाढून मुले एकलकोंडी होत आहेत. ही दुष्ट कोंडी फोडून मुलांना त्यांचे रम्य बालपण पुन्हा मिळवून द्यायचे, असेल तर आनंददायी शिक्षण आणि त्यासाठी उत्तम बालसाहित्याची गरज आहे. यासाठी मी जाणीवपूर्वक बालसाहित्याकडे वळलो.

समृद्ध आणि सुसंस्कारित बालपण हा उत्तम जीवनाचा आणि यशस्वी भविष्याचा भक्कम पाया असतो. बालकांवर संस्कार करण्याचे महत्कार्य शाळा आणि कुटुंब करीत असतात. पण दुर्दैवाने आजच्या आपल्या शाळा या व्यावसायिक झाल्या आहेत आणि पोटापाण्याच्या उद्योग-व्यवसायामुळे पालकांना त्यासाठी पुरेसा वेळ मिळत नाही. अशा कोंडमाऱ्यात कोवळ्या बालकांचा श्वास गुदमरतो आहे. त्यांना आनंददायी शैक्षणिक अनुभव देण्याची नितांत गरज आहे.

अशा शाळांमध्ये वाचनसंस्कृती आणि लेखनसंस्कृती वाढविण्याची आवश्यकता आहे, हे नेमकेपणाने हेरणारे डॉ. सुरेश सावंत यांचा जन्म नांदेड जिल्ह्यातील, उमरी तालुक्यातील गोरठा या गावी झाला.

शालेय व महाविद्यालयीन शिक्षण घेत असताना त्यांनी अवतीभोवतीचे अनुभवविश्व शब्दांत बांधण्यासाठी ग्रामीण साहित्य, दलित साहित्य आणि बालसाहित्य असे विपुल वाचन केले. वयाच्या २५ व्या वर्षापासून त्यांनी लेखनास सुरुवात केली. या साहित्य प्रवासात त्यांना बालसाहित्याचे महत्त्व समजले, म्हणून ते बालसाहित्याकडे जाणीवपूर्वक वळले. त्यांची आतापर्यंत ५७ पुस्तके प्रकाशित झाली असून त्यापैकी ३५ पुस्तके ही बालसाहित्याची आहेत. त्यांना महाराष्ट्र शासनाच्या तीन पुरस्कारांसह अन्य प्रतिष्ठित साहित्य संस्थांच्या ४५ पुरस्कारांनी गौरविण्यात आले आहे. नांदेडच्या राजर्षी शाहू विद्यालय आणि कनिष्ठ महाविद्यालयात त्यांनी २० वर्षे शिक्षक व १४ वर्षे मुख्याध्यापक-प्राचार्य पदावर काम केले. ह्या काळात त्यांनी बालकांच्या सर्वांगीण विकासासाठी नावीन्यपूर्ण असे ८१ उपक्रम राबविले. त्यामुळे शाळेत चैतन्यदायी वातावरण निर्माण झाले.



'एक बालक। एक शिक्षक। एक लेखणी एक पुस्तक। हे जग निश्चित बदलू शकते।' असा दृढ विश्वास बाळगणाऱ्या डॉ. सावंत सरांनी विद्यार्थ्यांमध्ये वाचनसंस्कृती आणि लेखनसंस्कृती रुजविण्यासाठी विशेष असे सर्जनशील प्रयोग केले.

पुस्तके विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवण्यासाठी 'फिरते वाचनालय' हा उपक्रम राबविला. 'लेखक आपल्या भेटीला' या उपक्रमातून पाठ्यक्रमात अभ्यासाला असलेल्या लेखक व कवींना शाळेत प्रत्यक्षात बोलावून विद्यार्थ्यांसोबत त्यांचा संवाद घडवून आणला. 'मागेल त्याला मागेल ते पुस्तक', 'नव्या पुस्तकांचे जाहीर स्वागत', 'वाचनकट्टा' या उपक्रमांद्वारे विविध पुस्तकांचे वाचनानुभव विद्यार्थ्यांना दिले.

मुख्याध्यापक असताना त्यांनी त्यांच्या शाळेच्या ग्रंथालयातील पुस्तकांची संख्या एक हजारापासून १० हजार पुस्तकांपर्यंत नेली, असे ते मोठ्या अभिमानाने सांगतात. त्यांनी १ लाख रुपयांची पुस्तके शाळेला भेट दिली.

अशा विविध उपक्रमांतून विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची गोडी निर्माण करण्यात त्यांना यश आले. वाचनसंस्कृती नंतर विद्यार्थी हा लिहिता व्हावा म्हणून 'शोध प्रतिभाकळ्यांचा', 'नोबेल प्रतिभा', 'वाचनप्रेरणा पुरवणी' असे १० अभिनव उपक्रम सुरू केले. वाचन प्रेरणा पुरवणीमध्ये विद्यार्थ्यांनी वर्षभरात लिहिलेल्या लेखांचा समावेश करण्यात आला.

एका वर्षी आठ पानांच्या या पुरवणीचे प्रकाशन विश्व मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष प्रा. शेषराव मोरे यांच्या हस्ते करण्यात आले. याशिवाय 'रोजनिशी : माझी सखी', 'लेखन कार्यशाळा' आणि भारतातील पहिला अभिनव प्रयोग म्हणजे शाळेतल्या शिक्षकांचे चरित्र विद्यार्थ्यांच्या लेखनातून उतरविणे. या माध्यमातून 'माझा शिक्षक : चरित्रनायक' हे आगळेवेगळे पुस्तक प्रकाशित करण्यात आले.




विद्यार्थ्यांमध्ये बालसाहित्य समीक्षाकौशल्य यावे यासाठी मुंबईचे साहित्यिक एकनाथ आहाड आणि डॉ. भगवान अंजनीकर यांच्या पुस्तकांवर समीक्षा लिहिण्यास सांगितले. यातून विद्यार्थ्यांना विविध लेखकांची लेखनशैली, त्यांचे विचार, त्यांचे अनुभव जवळून अनुभवता आले. शालेय विद्यार्थ्यांमध्ये लेखनसंस्कृती निर्माण झाली. विद्यार्थ्यांनी लिहिलेल्या बालसाहित्य समीक्षेची २ पुस्तके प्रकाशित केली.

शिक्षणक्षेत्रातील या त्यांच्या अतुलनीय व समर्पित योगदानाबद्दल भारत सरकारचा राष्ट्रपती पुरस्कार त्यांना मिळाला आहे. विविध शैक्षणिक उपक्रम राबवित असताना त्यांचे बालसाहित्य निर्मितीचे कामसुद्धा निष्ठेने सुरूच होते. बालसाहित्याकडे वळायचे तर बालकांची मानसिकता, त्यांची आवडनिवड, त्यांचे स्वप्न, त्यांचे छंद, त्यांच्या अपेक्षा, भावना, त्यांना येणारे अनुभव यांचा अभ्यास असण्याची आवश्यकता असते.

ही संपूर्ण तयारी त्यांनी चालवलेल्या उपक्रमांतून त्यांची झाली होती. ते म्हणतात, बालसाहित्य लिहायचे असेल, तर आपले थोरपण बाजूला ठेवून लहानाहुनी लहान होऊन जगावे लागते. बालसाहित्याच्या निर्मितीसाठी आकलनसुलभ व चपखल शब्दयोजना, शब्दचमत्कृती आणि अर्थसमृद्धी, कल्पनांची नवलाई, तरलता, नावीन्यपूर्णता, प्राणीसृष्टीचे मानवीकरण या गोष्टींची आवश्यकता असते.

या सर्वांची सांगड त्यांच्या 'आभाळमाया' ह्या बालकवितासंग्रहात दिसून येते. या त्यांच्या वैशिष्ट्यपूर्ण बालकवितासंग्रहात ३५ बालकविता असून १४ कविता या निसर्गविषयक आहेत. निसर्गाचे शोषण आणि त्याविषयीची जागरूकता, पुस्तकांशी मैत्री, शाळेविषयीची कृतज्ञता, आपला तेजस्वी सांस्कृतिक वारसा, कामाप्रति निष्ठा, रागावर नियंत्रण, साहस अशा विविध विषयांतून विद्यार्थ्यांना ज्ञान आणि संस्कार देण्याचा प्रयत्न त्यांनी ह्या बालकवितासंग्रहातून केला आहे.

'करील मनोरंजनातून शिक्षण जो मुलांचे, जडेल नाते प्रभूशी तयाचे' ह्या रवींद्रनाथ टागोर यांच्या वचनाचा त्यांनी आयुष्यभर गुरुमंत्रासारखा जप केला. डॉ. सुरेश सावंत नवोदितांना प्रेमाचा सल्ला देतात, की उदयोन्मुख कवी-लेखकांनी लिखाणाची घाई न करता प्रथम विपुल वाचन करावे. सामाजिक समस्यांचे अवलोकन करावे व आपले अनुभवविश्व अधिक समृद्ध करावे. विद्यार्थ्यांच्या पिढ्या आणि नवोदित लेखकांना घडविण्याचे डॉ. सुरेश सावंत यांचे सेवाभावी कार्य असेच अखंडित चालू राहो, यासाठी त्यांना शुभेच्छा.

**: डॉ. सुरेश सावंत संपर्क क्रमांक : 8806388535**

■ ■ ■

# लाल फुलाचे पाणी पिण्याचे फायदे



जास्वंदीचे फूल केवळ दिसायलाच सुंदर नाही तर त्यात अनेक प्रभावी औषधी गुणधर्म देखील आहेत. आयुर्वेदात ते अनेक आजारांवर उपचार करण्यासाठी वापरले जाते. अशातच तुम्हाला जर तुम्हाला शरीरकदृष्ट्या तंदुरस्त राहायचे असेल तर जास्वंदीच्या फुलाचे पाणी आरोग्य फायदे प्रदान करते, जसे की रोगप्रतिकारक शक्ती वाढवणे, त्वचेचा रंग सुधारणे आणि मासिक पाळीच्या समस्यांपासून मुक्तता.

जास्वंदीच्या फुलांमध्ये व्हिटॅमिन सी आणि अँटीऑक्सिडंट्स भरपूर प्रमाणात असतात, जे शरीराची रोगप्रतिकारक शक्ती वाढवतात आणि बॅक्टेरिया आणि विषाणूजन्य संसगार्शी लढण्यास मदत करतात.

जास्वंदीचे पाणी शरीरातील विषारी पदार्थ बाहेर काढण्यास मदत करते, ज्यामुळे त्वचा स्वच्छ आणि चमकदार होते. तसेच मुरुम आणि त्वचेच्या ?लर्जी कमी करण्यास देखील मदत करते.

जास्वंदीच्या पाण्याच्या सेवनाने केसांच्या मुळांना पोषण मिळते, ज्यामुळे केस गळणे कमी होते आणि त्यांना नैसर्गिक चमक मिळते.

हे पाणी मधुमेही रुग्णांसाठी फायदेशीर ठरू शकते, कारण ते रक्तातील ग्लुकोजची पातळी संतुलित करण्यास मदत करते.

महिलांमध्ये अनियमित किंवा वेदनादायक मासिक पाळी कमी करण्यास जास्वंदीचे पाणी मदत करू शकते. ते हार्मोनल संतुलन सुधारते.

हे पाणी चयापचय गतिमान करते आणि फॅट बर्न करण्याची प्रक्रिया वाढवते, ज्यामुळे वजन कमी होण्यास मदत होते.

गॅस, ॲसिडिटी आणि अपचन यासारख्या समस्या दूर करण्यासाठी जास्वंदाचे पाणी प्रभावी आहे. ते दररोज प्यायल्याने तुमचे पोट स्वच्छ राहण्यास मदत होते.

**जास्वंदीच्या फुलांचे पाणी कसे बनवायचे?**

२ ते ३ ताजी लाल जास्वंदीची फुले धुवून घ्या. एका पॅनमध्ये २ कप पाणी घेऊन त्यात ही फुले टाका. पाणी गुलाबी किंवा लाल होईपर्यंत ५ ते ७ मिनिटे उकळवा. नंतर हे पाणी गाळून त्यात मध किंवा लिंबाचा रस मिक्स करून सेवन करा.

सकाळी रिकाम्या पोटी ते पिणे अधिक फायदेशीर आहे. जास्वंदाचे पाणी नैसर्गिक टॉनिक म्हणून काम करते आणि ते नियमितपणे प्यायल्याने शरीराला अनेक फायदे होतात. ■ ■

**अशोकायन**

प्रा. अशोक सारडा
मेहकर
(९४२१३९४३३९)



## गुडबाय २०२५

सरत्या वर्षात
काय कमवलं, काय गमवलं
याचा घ्यावा आढावा
स्वप्नपुर्तीचा
संकल्प करूनी
अविरत प्रयत्न करावा..

प्रयत्नांती परमेश्वर
हे सुत्र ठेवावे ध्यानी
आज नाही तर उद्या
यश मिळेल हे
ठसवावे मनी!

# संतूरने गाठला २८५० कोटीं विक्रीचा टप्पा

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ३० :

भारतीय ग्राहकांची सखोल समज आणि संतूर मॉम या लोकप्रिय संकल्पनेच्या आधारावर संतूर ब्रँडने गेल्या चार दशकांपासून भारतीय कुटुंबांसोबत एक मजबूत नाते निर्माण केले आहे

विप्रो कन्ज्युमर केअर अँड लाइटिंगचा संतूर हा देशातील सर्वात मोठा साबण ब्रँड ठरला आहे. जवळपास चार दशकांच्या प्रवासात संतूरसाठी हा एक महत्त्वाचा टप्पा आहे.




चंदन आणि हळद या खास गुणधर्मांमुळे ओळखला जाणारा संतूर 1985 मध्ये बंगळुरूमध्ये मर्यादित स्वरूपात सुरू झाला. त्यानंतर 1986 मध्ये तो संपूर्ण देशभरात उपलब्ध झाला. गेल्या 12 महिन्यांतील कंपनीच्या विक्रीच्या आकडेवारीनुसार संतूरने वैयक्तिक स्वच्छतेच्या उत्पादनांमध्ये 2,850 कोटी रुपयांची विक्री केली असून भारतातील सर्वात मोठा साबण ब्रँड ठरला आहे. संतूरने सर्वसामान्य भारतीय महिलांसाठी

## भारतातील सर्वात मोठा साबण ब्रँड

तरुण दिसणारी त्वचा हा सहज समजणारा संदेश दिला. हा संदेश संतूर मॉम या जाहिरातीद्वारे लोकांपर्यंत पोहोचवला गेला, सातत्याने वापरला गेला. परंतु काळानुसार महिलांच्या बदलत्या इच्छा-आकांक्षा आणि त्यांच्या विविध भूमिका दाखवण्यासाठी या संदेशाचे सादरीकरण बदलत गेले, ज्यामुळे ग्राहकांशी संतूरचं नाते अधिक घट्ट झाले. गेल्या अनेक वर्षांत संतूरने आपल्या उत्पादनाची गुणवत्ता आणि पॅकेजिंग सुधारण्यासाठी मेहनत केली आणि संतूरला त्याच्या चमकदार नारिंगी रंगासोबत जोडून एक वेगळी ओळख निर्माण केली. मजबूत कामकाज आणि महत्त्वाच्या बाजारपेठांमध्ये अव्वल स्थान मिळवण्यावर लक्ष केंद्रित केल्यामुळे संतूरचा हा यशस्वी प्रवास शक्य झाला.

या धोरणात संतूरने विस्तारापेक्षा खोलवर प्रभाव निर्माण करण्यावर भर दिला, म्हणजे गुंतवणूक आणि ब्रँडची उपस्थिती ठराविक बाजारपेठांमध्ये अधिक मजबूत करण्यात आली. 2018 पर्यंत संतूरने 2,000 कोटी विक्रीचा टप्पा गाठला आणि मूल्याच्या दृष्टीने लक्सला मागे टाकून भारतातील दुसऱ्या क्रमांकाचा साबण ब्रँड बनला. आज अंदाजे 2,850 कोटींच्या वार्षिक उलाढालीसह, संतूरने लाइफबॉयला मागे टाकत भारतातील सर्वात मोठा साबण ब्रँड बनला आहे.

### महिला टी-२० गोलंदाजांच्या क्रमवारीत

# दीप्ती अव्वल स्थानावर कायम

■ वृत्तसंस्था, क्रीडा डेस्क, दि. ३० :



भारतीय महिला क्रिकेट संघाची सलामीवीर शेफाली वर्माने उत्कृष्ट कामगिरीच्या जोरावर आयसीसी महिला टी-२० आंतरराष्ट्रीय फलंदाजी क्रमवारीत मोठी झेप घेतली आहे. मंगळवारी शेफाली फलंदाजांच्या यादीत सहाव्या स्थानावर पोहोचली आहे. शेफालीने श्रीलंकेविरुद्ध सलग ३ अर्धशतके झळकावली. तिने ६९, ७९ आणि ७९ धावांची खेळी केली. संघाची उपकर्णधार स्मृती मंधानानेही चौथ्या टी-२० मध्ये ८० धावांची शानदार खेळी करत क्रमवारीत आपले तिसरे स्थान कायम राखले आहे. तर, जेमिमा रॉड्रिग्ज एक पायरी खाली घसरून १०व्या स्थानावर पोहोचली आहे.


भारताची अष्टपैलू दीप्ती शर्मा गोलंदाजांच्या क्रमवारीत अजूनही नंबर-१ आहे. वेगवान गोलंदाज रेणुका सिंग ठाकूरनेही श्रीलंकेविरुद्ध उत्कृष्ट कामगिरी केली असून, आठ स्थानांची झेप घेऊन ती संयुक्तपणे सहाव्या स्थानावर पोहोचली आहे. तिने तिसऱ्या टी-२० मध्ये ४ बळी घेऊन भारताला मालिका जिंकून देण्यात महत्त्वाची भूमिका बजावली. याव्यतिरिक्त, डाव्या हाताची फिरकी गोलंदाज श्री चरणी आणि वैष्णवी शर्मा यांच्या क्रमवारीतही सुधारणा झाली आहे. चरणीने श्रीलंकेविरुद्धच्या सुरुवातीच्या चार सामन्यांमध्ये चार बळी घेतले आहेत, ज्यामुळे तिच्या क्रमवारीत १७ स्थानांनी सुधारणा झाली असून ती आता ५२व्या स्थानावर पोहोचली आहे.

### सोनी सबवरील इत्ती सी खुशी मालिकेत ध्रुवीच्या रूपात

# गरिमा कौशलच्या एंट्रीमुळे आशा पालवली

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ३० :

सोनी सबवरील इत्ती सी खुशी मालिकेत अन्विता (सुंबुल तौकीर खान)चा प्रवास उलगडून दाखवला आहे. आत्ता अन्विता संजय (ऋषी सक्सेना)च्या मनातील वाढती असुरक्षितता आणि विराट (रजत वर्मा)चा अजून मनावर असलेला प्रभाव यामध्ये सापडली आहे. त्यात विराटचे वडील राजनाथ वर्मा (फारूख सईद) यांच्या दमदार उपस्थितीमुळे मामला आणखीन गुंतागुंतीचा झाला आहे. अन्विताला काही कठोर निर्णय घ्यावे लागणार आहेत, ज्यात तिची ताकद आणि नाती यांची कसोटी होणार आहे.



ध्रुवीची भूमिका करणारी गरिमा कौशल म्हणते, मी जेव्हा ध्रुवीची व्यक्तिरेखा आणि तिची विचारसरणी समजून घेतली तेव्हा ती तत्काळ मला आपलीशी वाटली. ध्रुवीविषयी मला ही गोष्ट फार आवडते की ती स्वतःच्या स्वार्थापलीकडे पाहते. ती केवळ अन्विताला साथ देण्यासाठी मालिकेत आलेली नाही, तर एक विचारसरणी सादर करणारे हे पात्र आहे. व्यक्तिशः मला अशा गोष्टींचे आणि जागांचे जतन करणे महत्त्वाचे वाटते, ज्या लोकांना एकत्र आणतात म्हणजे निसर्ग, कला किंवा भावना आणि आठवणींशी संबद्ध जागा. त्यामुळे ध्रुवीच्या भूमिकेत शिरणे मला सहज वाटले. अन्विताला साथ देण्याचा तिचा निर्णय सहानुभूती आणि हिंमतीमधून आला आहे आणि मला वाटते प्रेक्षक त्याचे स्वागत करतील.

अन्विताची भूमिका करणारी सुंबुल तौकीर खान म्हणते, कथानकातील हा टप्पा मला खूप प्रिय आहे, कारण त्यामध्ये कितीही प्रतिकूल बळ तुमच्याविरुद्ध असले तरी, जे खरे आहे, त्याच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहण्याबद्दल सांगितले आहे. मला वाटते आपल्यापैकी अनेकांच्या जीवनात असे काही तरी असते, जे खूप वैयक्तिक वाटते. त्यामुळे परिस्थिती कितीही कठीण असली, तरी त्याच्यासाठी आपण झगडतो. पर्सी कॅफे वाचवण्यासाठी अन्विता जो लढा देत आहे, त्यामागे भावना, चिकाटी आणि विश्वास आहे. आणि मला वाटते, बऱ्याच प्रेक्षकांना हा लढा आपलासा वाटेल.

## हेमंत खेरचे सोनी सबवरील पुष्पा इम्पॉसिबलमध्ये नाट्यमय पुनरागमन

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ३० :



गुपिते, फसवेगिरी आणि असंभव वाटणारे पर्याय यांनी भरलेल्या दमदार कथानकाच्या बळावर सोनी सबवरील पुष्पा इम्पॉसिबल मालिकेने प्रेक्षकांना खिळवून ठेवले आहे. या मालिकेत एका गृहिणीमधून न्यायासाठी झगडणाऱ्या वकिलापर्यंतचा प्रवास करणाऱ्या पुष्पाची (करुणा पांडे) कहाणी उलगडून सांगितली आहे. मालिका आत्ता एका अत्यंत तीव्र आणि धक्कादायक टप्प्यावर येऊन पोहोचली आहे.

त्यात विरेन सेतलवाडच्या रूपात हेमंत खेरच्या पुनरागमनामुळे मालिकेतील नाट्य आणखीनच वाढणार आहे. ही व्यक्तिरेखा जुन्या जखमा पुन्हा ताज्या करणार आहे आणि नवे संघर्ष उभे करणार आहे. जुगल (अंशुल त्रिवेदी) चा चुलता विरेन हा एकेकाळी एक यशस्वी व्यावसायिक होता आणि भरभराटीला आलेला पटोळा व्यवसाय चालवत होता. पुष्पा आणि जुगल यांनी जेव्हा ताना बानाच्या रूपात या मार्केटमध्ये प्रवेश केला, तेव्हा त्याची पडती सुरू झाली आणि व्यवसाय कोलमडला. निराश झालेल्या विरेनने एक अंधारा मार्ग स्वीकारला आणि पुष्पाचे जीवन उद्ध्वस्त करायला निघालेल्या विरेनचे पितळ उघडे झाल्यावर त्याची रवानगी तुरुंगात करण्यात आली होती.

## 'भाबीजी घर पर है २.०' मध्ये अक्षय पाटील यांचे पेलीच्या भूमिकेत पुनरागमन

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ३० :




एण्ड टीव्हीवरील लोकप्रिय विनोदी मालिका 'भाबीजी घर पर है २.०' चाहत्यांचा आवडता पेलीच्या भूमिकेत अक्षय पाटील आपल्या पुनरागमनासह हास्याचा नवीन डोस घेऊन येण्यास सज्ज आहे, पण यावेळी तो पूर्णतः नवीन व अचंबित करणाऱ्या लुकमध्ये पाहायला मिळणार आहे. एकही शब्द न बोलता अधिक प्रभाव पाडण्यासाठी ओळखला जाणारा पेली गोंधळ व विनोदी स्थिती निर्माण करण्यासाठी परतला आहे, पण त्यामध्ये उत्साहवर्धक ट्विस्ट आहे, जो प्रेक्षकांना अचंबित करेल. पुन्हा भूमिका साकारण्याबाबत मत व्यक्त करत अक्षय पाटील म्हणाल्या, "मला पूर्णतः नवीन लुकमध्ये पेलीची भूमिका साकारण्याचा आनंद होत आहे. मी नेहमी ही भूमिका साकारण्याचा आनंद घेतला आहे. सर्वांना माहित आहे की, पूर्वीचा पेली जास्त बोलायचा नाही आणि यावेळी देखील मी एकही शब्द बोलणार नाही. हे वेषांतर आणि सेटवरील नवीन उत्साहाबाबत सांगताना अक्षय पुढे म्हणाले, "हे वेषांतर फारसे आव्हानात्मक नव्हते, कारण मी गेल्या दहा वर्षांपासून ही शैली साकारत आलो आहे. पूर्वी, माझी मिशी लोकप्रिय ठरली, यावेळी माझ्या दोन वेण्या लोकप्रिय ठरतील (हसतात). बदललेला सेट आणि शिल्पा शिंदे (अंगूरी भाबी) यांचे पुनरागमन उत्साहाचे वातावरण आहे.

## एण्ड टीव्हीवरील अभिनेत्रींनी सांगितले नववर्ष स्वागत योजनांबाबत

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ३० :





वर्षाची सांगता होण्यासह संपूर्ण विश्व नववर्षाचे आनंदात स्वागत करण्यासाठी सज्ज असताना एण्ड टीव्हीवरील अभिनेत्री सीरत कपूर (मालिका 'घरवाली पेडवाली'मधील सावी), गीतांजली मिश्रा (मालिका 'हप्पू की उलटन पलटन'मधील राजेश) आणि विदिशा श्रीवास्तव (मालिका 'भाबीजी घर पर है'मधील अनिता भाबी) त्यांच्या हृदयस्पर्शी नववर्ष स्वागत योजनांबाबत, तसेच सेलिब्रेशनला विशेष बनवणाऱ्या खासपरंपरांबाबत सांगत आहेत. मालिका 'घरवाली पेडवाली'मध्ये सावीची भूमिका साकारणाऱ्या सीरत कपूर म्हणाल्या, "मी नववर्ष पूर्वसंध्येला वर्षभरात घडलेल्या घडामोडींना उजाळा देण्यासोबत नवीन संकल्प करते. दरवर्षी मी वेळात वेळ काढून मला मिळालेल्या शिकवणींना, भेटलेल्या व्यक्तींना आणि संपादित केलेल्या यशांना उजाळा देते. मला माझे कुटुंब व जिवलग मैत्रिणींसोबत धमाल करायला आवडते, जेथे फूड, हास्य व संगीताचा आनंद घेते. यंदा, मी घरामध्ये गेट-टूगेदरचे आयोजन करणार आहे, तसेच घरी बनवलेल्या खाद्यपदार्थांचा आस्वाद घेणार आहे, गेम्स खेळणार आहे आणि कृतज्ञता व्यक्त करणारा जार ठेवणार आहे, ज्यावर प्रत्येकजण आपले आभार व्यक्त करू शकतात. आरोग्यावर अधिक लक्ष केंद्रित करण्याचा, तसेच २०२६ ची सुरूवात उत्तमपणे व प्रेरित होत करण्याचा माझा संकल्प आहे."

मालिका 'हप्पू की उलटन पलटन'मध्ये राजेश सिंगची भूमिका साकारणाऱ्या गीतांजली मिश्रा म्हणाल्या, "नववर्ष स्वागतासाठी माझ्या कुटुंबामधील सर्वजण एकत्र येतात. बालपणी, आम्ही आमच्या टेरेसवर आयोजित केल्या जाणाऱ्या पार्टीची आतुरतेने वाट पाहायचो, जेथे सर्व शेजारी एकत्र येऊन नृत्याचा आनंद घ्यायचे, खाद्यपदार्थांचा मनसोक्त आस्वाद घ्यायचे आणि फटाक्यांची आतिषबाजी करत नववर्षाचे स्वागत करायचे. ' मालिका 'भाबीजी घर पर है'मध्ये अनिता भाबीची भूमिका साकारणाऱ्या विदिशा श्रीवास्तव म्हणाल्या, "यंदा, मी काहीशा वेगळ्या पद्धतीने नववषार्चे स्वागत करणार आहे, ज्यासाठी कामामधून काहीसा ब्रेक घेणार आहे. मी माझ्या जिवलग मैत्रिणींसोबत गोव्याला जाणार आहे, तेथील समुद्रकिनाऱ्यांचा मनमुराद आनंद घेणार आहे.

## आयडीएफसी खाजगी बँकिंग ग्राहकांसाठी गज

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ३० :

आयडीएफसी फर्स्ट बँकेने गजः (संस्कृतमध्ये गजः) क्रेडिट कार्ड लॉन्च करण्याची घोषणा केली आहे. हे बँकेच्या ओळखीच्या उच्च-निव्वळ संपत्ती असलेल्या व्यक्तींसाठी (एचएनआय) डिझाइन केलेले प्रीमियम, केवळ आमंत्रणासाठी उपलब्ध असलेले धातूचे क्रेडिट कार्ड आहे. गजः क्रेडिट कार्ड हे अश्व-मयूर-गजः ट्रायलॉजीचा सर्वात मोठा भाग आहे, बँकेच्या प्रीमियम मेटल क्रेडिट कार्डच्या निवडक मालिकेत.

उपलब्धताः गज क्रेडिट कार्ड ही निवडक आयडीएफसी फर्स्ट बँक प्रायव्हेट बँकिंग ग्राहकांसाठी आहे ज्यांच्याशी तुमचे मजबूत नाते आहे. कार्डची जॉइनिंग आणि वार्षिक फी १२,५०० + जीएसटी आहे. कार्डमध्ये १ आरपी = रु.१ किमतीचे १२,५०० इन्व्हिटेशन रिवॉर्ड पॉइंट्स आहेत, जे आयडीएफसी फर्स्ट बँक ॲपद्वारे प्रवास बुकिंगवर रिडीम केले जाऊ शकतात, ज्यामुळे जॉइनिंग फी ऑफसेट होते. १० लाखांच्या वार्षिक खर्चावर वार्षिक फी देखील माफ केली जाते. शिवाय, गज एक आकर्षक मेटल कार्ड डिझाइन, शून्य परकीय चलन मार्क-अप, एक साधी १:१ रिवॉर्ड स्ट्रक्चर आणि आधीच मजबूत ऑफर वाढविण्यासाठी डिझाइन केलेले प्रीमियम ट्रॅव्हल आणि लाइफस्टाइल विशेषाधिकारांचा संच देते.

### श्रेयस अय्यरला फिटनेस क्लिअरन्स मिळाले नाही

# वनडेसाठी फिट नाही

■ वृत्तसंस्था, बंगळूरु, दि. ३० :



भारतीय फलंदाज श्रेयस अय्यरला टीम इंडियात परत येण्यासाठी प्रतीक्षा करावी लागेल. त्याला न्यूझीलंडविरुद्धच्या वनडे संघात निवडले जाणार नाही. अय्यर सध्या बेंगळुरू येथील बीसीसीआयच्या सेंटर ऑफ एक्सलन्समध्ये (उत्कृष्टता केंद्र) उपचार घेत आहे. या आठवड्यात त्याच्या रिकव्हरीचे (उपचारांचे) मूल्यांकन केले जात आहे.

बीसीसीआयच्या सूत्रांनी भास्करला सांगितले आहे की, वैद्यकीय पथक लवकरच आपला अहवाल देईल. श्रेयस वनडे क्रिकेटसाठी पूर्णपणे फिट झालेला नाही. त्यामुळे संघात त्याची निवड होणे कठीण आहे.

## बुधवार दि. ३१ डिसेंबर २०२५

| कल्याण बाजार पत्थर फोड एकच | | | | मुंबई बाजार पत्थर फोड एकच | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| २ | ५ | ६ | ९ | ३ | ४ | ५ | ८ |
| ५८९ | १६८ | २४० | ११७ | १२० | ४४६ | ६९० | १२५ |
| ६७९ | ३४८ | ३५८ | ४७८ | २२९ | ११२ | ५०० | २७९ |
| ४८० | २३० | ११४ | २२५ | ३०० | ३३८ | ७८० | ३५० |

| जोडी | जोडी |
|---|---|
| २१ - ५१ - ६४ - ९४ | ३२ - ४२ - ५१ - ८१ |
| २७ - ५७ - ६० - ९० | ३० - ४० - ५६ - ८७ |
| २८ - ५८ - ६३ - ९३ | ३९ - ४९ - ५६ - ८६ |

जबरदस्त पास होणारे चान्सेस ३१ डिसें. २०२५

## बुधवार दि. ३१ डिसेंबर २०२५

**सर्व बाजार साठी**

०२ - १२ - ४३ - ७३
०५ - १५ - ४६ - ७६
०८ - १८ - ४९ - ७९
--------------------
११८ - ५८८ - १६७ - २६९
४८८ - ११९ - ३५६ - ४५८
६६८ - ३९९ - २२० - १८८

सर्व बाजारासाठी

| सोम. ते बुध. ओपन डे | | | | | | सोम. ते बुध. ओपन नाईट | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १२९ | | ४७० | | १५९ | | ९०० | | ३७० | | ५५८ | |
| २०० | २ | ५६० | १ | २५८ | ५ | २३४ | ९ | ४६० | ० | ३५० | ८ |
| ३९० | | ३८० | | ३५७ | | ३६० | | ५५० | | २६० | |

| सोम. ते बुध. क्लोज डे | | | | | | सोम. ते बुध. क्लोज नाईट | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १३९ | | ६९० | | २५० | | १४९ | | १२३ | | ४५० | |
| २३८ | ३ | ७८० | ५ | ३४० | ७ | २६६ | ४ | २६८ | ६ | ५५९ | ९ |
| ३३७ | | ५०० | | १६० | | ३३० | | ३६७ | | ३६० | |

सर्व बाजारासाठी सिंगल अंक ओपन टू क्लोज

१ २ ९ ८ ०

प्रो. बालाजी कुमार ९८२२४८६०३४

## आजचे राशीभविष्य

**मेष :** आज तुमचे प्रलंबित काम पूर्ण होईल, ज्यामुळे मनाला शांती मिळेल. तुम्ही काम करण्याच्या नवीन पद्धतींचा विचार कराल.

**वृषभ :** आज, ऑफीसमध्ये तुमचे सहकारी तुमच्या कल्पनांनी प्रभावित होतील, पण तुम्ही इतरांच्या कामात हस्तक्षेप करणे टाळले पाहिजे. तुम्हाला तुमची कामे अधिक सहजपणे पूर्ण करण्याचा मार्ग सापडेल.

**मिथुन :** आज, मित्र बनवताना आणि तुमचे विचार इतरांशी शेअर करताना काळजी घ्या. सगळी गुपितं सांगू नका. तुमची आर्थिक परिस्थिती मजबूत राहील.

**कर्क :** आज तुमचे संपूर्ण लक्ष तुमच्या कामात सुधारणा करण्यावर असेल. मुले त्यांच्या पालकांकडे अधिक लक्ष देतील आणि त्यांचे ऐकतील. उधार घेतलेले पैसे परत मिळतील आणि व्यवसायात यश मिळण्याची शक्यता आहे.

**सिंह :** आज मुलांना त्यांच्या करिअरबद्दल चांगली बातमी मिळेल. तुमच्या वडिलांचे म्हणणे काळजीपूर्वक ऐका, कारण भविष्यात हे तुमच्यासाठी फायदेशीर ठरेल.

**कन्या :** आज, तुम्ही पूर्वी केलेल्या छोट्या छोट्या कामांचेही सकारात्मक परिणाम होतील. यश जरी लहान असले तरी ते सातत्यपूर्ण राहील. ऑफिसची कामे पूर्ण करताना लक्ष केंद्रित करा.

**तूळ :** आज, तुमचे अडकलेले पैसे परत मिळतील, ज्यामुळे तुमची आर्थिक परिस्थिती आणखी मजबूत होईल. गणरायाची कृपा असेल. तुम्ही सामाजिक कार्यात योगदान देण्याचा विचार कराल.

**वृश्चिक :** तुमच्या करिअरमध्ये प्रगती करण्याच्या तुमच्या प्रयत्नांना यश मिळेल. आज, तुमच्या प्रिय व्यक्तीच्या भेटीने तुम्ही आनंदी व्हाल.


**धनु :** जर तुम्ही तुमच्या सकारात्मक विचारसरणीचा वापर अर्थपूर्ण कामात केला तर तुमची सर्जनशील प्रतिभा सर्वांसमोर येईल आणि लोकांमध्ये तुमचा आदर वाढेल.

**मकर :** अचानक आर्थिक फायदा झाल्यामुळे आज तुम्हाला आवश्यक वस्तू खरेदी करण्यास मदत होईल. तुमचे वैवाहिक जीवन अधिक सुसंवादी होईल. नकारात्मक विचार दूर करून आणि वाईट संगत टाळून तुम्ही स्वतःला सुधाराल.

**कुंभ :** आज तुमची आर्थिक परिस्थिती मजबूत राहील आणि तुम्ही वस्तू खरेदी करण्यासाठी बाजारात जाऊ शकता.

**मीन :** आज, कामावर तुमचे सहकारी आणि वरिष्ठ तुमच्या कामगिरीवर खूश होतील आणि तुमची प्रशंसा करतील. आज तुम्हाला योग्य ते निकाल मिळतील. तुम्हाला हवे असलेले मोठे ध्येय साध्य करण्याचा मार्ग तुम्हाला सापडेल.

## शब्दकोडे क्रमांक २३०९



**आडवे शब्द :-**
१) एकाचा राग दुसऱ्यावर काढणे
९) मनाचा ओढा
१०) कौत्सल्यापुत्र
११) अंत:करण
१२) हत्तीचे ओरडणे
१४) कणिक मळण्याचे भांडे
१५) सैलसर वस्त्र
१६) सम्राट, मोठा राजा
१७) दारूचा एक प्रकार
१८) व्रत
२०) वेल
२२) गवंडी
२३) सूर्याचे एक नाव
२४) वितरण
२५) भूताखेतांच्या वस्तीची दोन झाडे
२६) अरण्य
२८) सोंगट्या मांडण्याचे वस्त्र
३०) मध्यम प्रमाण
३२) फुरसतीनुसार
३५) आवडता, प्रिय
३६) समाजातील दबदबा
३७) रचलेले कारस्थान
३८) नष्ट होणारे
३९) पत्थर
४१) कशा प्रकारचा
४२) पातक
४३) शरीर
४४) लाजणे, ओशाळणे
४५) जन्म-मृत्यू
४७) बाण
४९) लाकूड कापण्याचे साधन
५२) आवरण, आच्छादन
५३) बंदूक
५५) वजनदार
५६) डोंगरावरतून सतत पडणारा पाण्याचा मोठा प्रवाह
५७) बडबडी, लोचट स्त्री
५८) गाय

**उभे शब्द**
१) नसता संबंध जोडणे या अर्थाचा वाक्प्रचार
२) तपासणी करणारा (इं.)
३) ऑईलला मराठी शब्द
४) भरीताचे फळ
५) सिंह
६) तुरूंग
७) ढोल या वाद्याचा आवाज
८) द्रव्य, संपत्ती
११) कपाळावर लावलेले कुंकू
१३) पैसे खर्च करायला काचकूच करणारा
१४) हार
१७) रविवार
१९) भेग, चीर
२१) संतापी, रागीट
२२) दशानन
२४) उत्तराधिकारी
२७) फायदा, तोटा
२९) वात्रट, चहाटळ
३१) ठेकेदार
३२) फुरसत
३३) आंब्याची पोळी
४३) मुलगी
३८) जैन साधू
४०) गणपती
४१) सोन्याचा पर्वत
४२) झाडाभोवतीचा कट्टा
४३) जनावरांचे पिल्लू
४६) मनाला आलेला थकवा
४८) गावाखालची जमीन
५०) रात्र
५१) पुष्परस
५४) आकाश

(उत्तर उद्याच्या अंकात)

**मागील शब्दकोड्याचे उत्तर**



# नववर्ष आनंदाच्या अवकाशातील भरारी अन् पाचवीला पुजलेली गरिबी..

नववर्षाच्या पूर्वसंध्येला जवळजवळ प्रत्येकच घरातले दिवे मध्यरात्रीपर्यंत सुरू असते. त्यामुळे देश रात्रीसुध्दा जागा असतो असं म्हणायला हरकत नाही. सरत्या वर्षाला निरोप देत असताना कटू-गोड आठवणींची सोबत असते. हे वर्ष खूप काही देऊन आणि शिकवून जाते. त्यामुळे हे सरतं वर्ष अनेक प्रकारे प्रेरणादायी आणि आश्चर्यकारक ठरते. याच आश्चर्यामुळे सरत्या वर्षाला निरोप देत नवीन वषाचं जल्लोषात स्वागत केल्या जातं. हा सोहळा जेवढा नेत्रदीपक असतो, तेवढाच मनाला सुखावणारा आणि नवी उमेद देणारा ठरतो. पण...

-------------

ज्याप्रमाणे कोणतीही व्यक्ती जडभरीत वस्त्रांनी आणि वेगवेगळ्या सौंदर्य प्रसाधनांनी नटून-थटून चारचौघात गेल्यावर त्याला कुणीही नवं तर म्हणणार नाही ना! एवढच का जोपर्यंत त्याच्या शरीरावर जडभरीत वस्त्र व प्रसाधनं असते, तोपर्यंत तो थोडा वेगळा वाटतो. ते सर्व उतरल्यावर 'जुनं ते सोनंच' असते.

अगदी त्याचप्रमाणे आयुष्यात येणारा प्रत्येक दिवस हा सारखा नसतो. असं असलं तरीही प्रत्येक दिवसात काहीतरी 'नवं' असतंच असं नाही. पण एक मात्र निश्चित त्यात 'वेगळं' काहीतरी नक्कीच असतं. आणि या वेगळेपणामुळेच उगवणारा प्रत्येक दिवस आपल्याला नवा वाटत असतो. याच वेगळेपणाचे नाविन्य ओळखले तर प्रत्येक दिवस हा नववषाची 'सुरुवात' ठरू शकतो.

सूर्याच्या प्रत्येक किरणाला सप्तरंग असते. ज्याला आपण 'इंद्रधनुष्य' या नावाने ओळखत असतो. या सात रंगापैकीच एक रंग स्मृतीचा असतो आणि हा स्मृतीचा रंग ज्या क्षणाला सर्वांगाने स्पर्शून जातो, तो क्षण अविस्मरणीय ठरतो. पण या रंगालाही वेगवेगळ्या छटा असतात. कधी सुखाची तर कधी दुःखाची, कधी यशाची तर कधी अपयशाची, कधी कॅन्सरची तर कधी कोरोनासारख्या व्हायरसची. पण काहीही असो, अशा क्षणामुळेच पूर्ण वर्ष अविस्मरणीय ठरत असते. म्हणूनच नववर्षाचं स्वागत करताना पाठमोऱ्या वर्षाला विसरावं असं वाटत नाही.

*ऊन पावसाचा मिलाफ होता*
*इंद्रधनुष्य नभी दिसतो*
*सुख दुःखाचे सप्तरंग अवतरता*
*नियतीचा खेळ कळतो*

नवीन वर्ष म्हणजे विविध संकल्पाचा मुहूतार्चा क्षण! भूतकाळाच्या अंधारात हरवलेल्या क्षणांच्या गर्ततेतून आलेली जीवनाची 'नाव' उज्ज्वल भविष्यातील स्वप्नांच्या यशाच्या किनारी लावण्याची नवी उमेद देणारा क्षण...पण स्वप्न कितीही आपुलकीनं रंगविली तरीही ते कधीच आपली होत नसतात.

मानवी जीवनाची अस्थिरता आणि स्वप्नांची क्षणभंगुरता यांचं नातं कासवाच्या कवचासारखं घट्ट विणलेलं. हा त्यांचा संबंध नववर्षाच्या पहिल्या दिवशी जाणवतच नाही. पण जुनं होणा-या वर्षाकडे पाहिलं की, हे खरं वाटायला लागतं. म्हणून मग नववषाचं स्वप्न रंगविणे म्हणजे तळहातावरच्या आयुष्य रेषेची लांबी मोजण्यासारखं आहे. मानवी कल्पक बुद्धीचा विचार करता...

*ईश्वर साक्षी नवीन वर्षी*
*करीन प्रयत्न नव्या दमाने*
*संकल्पांच्या पुण्यतिथीला*
*संकल्पाचे स्मरण नव्याने*

सुरू होणारं नववर्ष एक वषानंतर जुनं होणारं असतं. पण तरीही नववषार्चा पहिला दिवस आपल्या आयुष्यात वेगळच महत्त्व घेऊन येतो. या दिवशी उगवणारा सूर्य तोच असला तरी नववर्षाच्या 'सुखाची भूपाळी' गात येतो. त्यामुळे त्याच्या चेहऱ्यावर एक 'पाहुणपण' जाणवतं आणि म्हणूनच अशा पाहुण्याचं स्वागत करण्याची अदम्य इच्छाशक्ती प्रत्येकाच्या चेहऱ्यावर स्पष्टपणे जाणवते.

*इंचभराने फुगली नाही*
*यगायुगांची खोगिरभरती*
*सूर्य कारकुन रोज सारखी*
*सही ठोकतो मस्टर वरती*

नववर्षाच्या पूर्वसंध्येला मावळतीकडे निघालेल्या सूर्याला निरोप देताना मनाला लागलेली भावस्पर्शी हुरहुर तर दुसरीकडे गुलाबी बोचऱ्या थंडीत कुडकुडत का होई ना थर्टीफर्स्ट साजरा करण्यासाठी चाललेली लगबग यामुळे निरोप आणि स्वागताचा हा एक आनंददायी 'सोहळा' होत असतो.

मावळतीच्या वर्षात केसर रंगात अर्घ्यस्नान करून सूर्य मोतीजडीत लाल जडभरीत प्रकाशमय वस्त्र परिधान करण्यासाठी क्षीतिजाआड गळप होतांना गलबलून आलेलं हळवं मन कृत्रिम रोषणाईच्या आरासीत, फटाक्यांच्या आतषबाजीत विचारांना नाविन्याचा मुलामा चढवून नव्या वर्षात समरस व्हायला लागतं. संगिताच्या मधूर स्वरात अन ढोलताशांच्या निनादात नव्या वर्षाच्या स्वागतासाठी सर्वजन सज्ज असते.

*'सुखमय वैभवाच्या पानाफुलांनी*
*बहरत यावे नववर्ष*
*अमृतमय आनंद फळांनी*
*बहरावा जीवनवृक्ष'*

यासारख्या लक्षवेधी शब्दांच्या संगतीनं मनही हरखून जातं. येणारी आव्हानं नव्या



**शब्दस्पर्शी सुनील शिरपुरे**
**कमळवेल्ली, यवतमाळ.**
**७०५७१८५४७९**

उमेदीनं पेलण्यासाठी हे नववर्ष प्रत्येकाला खुणावत असतं आणि प्रत्येकजन हे आव्हान पेलण्यासाठी आपआपल्या परीने तयार होत असतो आणि प्रत्येकाला सांगत असतो...

*गेले दिवस विसरूनिया*
*करा स्वागत नववर्षाचे*
*पाऊल उचला न डगमगता*
*नव कल्पीत आशेचे*

पण जरा वैचारिक दृष्टीकोनातून हा नववर्षाच्या स्वागताचा चाललेला फापटपसारा सत्कामी लावला, तर कित्येक हतबल जीवनात सप्तरंग फुलवता येईल. आजच्या धकाधकीच्या जीवनात कुणी कुणाला मदत करत नाही. त्यामुळे कुणाकडूनही कोणत्याही गोष्टीची अपेक्षाही करता येत नाही.

पण असं कोणतच कार्य नाही की, ज्या कार्यासाठी कुणाचीही मदत घ्यावी लागणार नाही. माणूस कसाही असो, तो कोणत्याही क्षेत्रात कार्यरत असो, त्याला कुणाची ना कुणाची मदत घ्यावीच लागते. यासाठी प्रत्येकाने प्रत्येकाला आपआपल्या परीने मदत करायला हवी.

पण मदतकर्त्याने पुढच्या व्यक्तीकडून कोणत्याही गोष्टीची अपेक्षा करू नये. त्याला आपल्याच परिवारातील एक सदस्य समजायला हवे. पण हे तेव्हाच शक्य आहे, जेव्हा त्याला भावनेची जाण असते. परंतु वास्तविक जीवनात असं खूपच कमी पहायला मिळते आणि हे शाश्वत सत्य आहे की, आपल्याकडून सहसा असं घडत नाही, घडलं तरी ते अवचितच.

विशेष करून अनुभवात्मक दृष्टीकोनातून पाहल्यास परक्याकडूनच जास्त असं काही घडत असते. कारण या जीवनात सर्वप्रथम माणसाला माणसं ओळखण्याची कला अवगत करावी लागते. पण सद्यस्थितीत ती आपल्याजवळ नाही. ज्या व्यक्तीला आपण आपला म्हणत असतो किंवा ज्या व्यक्तीवर आपण सर्वात जास्त विश्वास करत असतो, तोच दगा देत असतो. परंतु ज्या व्यक्तीला आपण वाईट म्हणून संबोधत असतो. वेळप्रसंगी तोच आपल्याला मदत करीत असतो.

ज्यांची आर्थिक परिस्थिती अत्यंत हलाकिची असते. अशांना प्रत्येक गोष्टीला तोंड देत आपलं जीवन व्यतीत करावं लागते. कोणतही कार्य करावं म्हटलं तर त्यांच्यासमोर एक आव्हानच असते. यामुळे ते एखादं कार्य इच्छा असूनसुध्दा करू शकत नाही. यामुळे त्यांच्या कार्यात खंड पडत असते.

या खंडीकरणामुळे त्यांच्यासमोर पुन्हा एक मोठं संकट उभं राहते. नंतर त्यांना आर्थिक समस्येचा सामना करावा लागतो. या द्विधा मनःस्थितीत त्यांची स्थिती 'इकडे आड तिकडे विहीर' यासारखी होते. यामुळे त्यांची प्रगती खुंटत असते. त्यांच्याजवळ इतर सर्व काही असतानाही ते यशाचं शिखर गाठू शकत नाही.

कारण आनंदाच्या अवकाशात उत्तुंग भरारी घेण्यासाठी तेही आसुसलेले असते. पण पाचविलाच पुजलेल्या गरिबीनं त्यांचे पंख गळून पडलेले असते. वैचारिकदृष्ट्या त्यांना स्वतःच्या मनाने काहीच करता येत नसते. आलेली परिस्थितीच त्यांना एखादं कार्य करण्यास किंवा न करण्यास भाग पाडत असते. पण श्रीमंतीत लोळण घेणाऱ्यांना किंवा दोन नंबरने कमाई करणाऱ्यांना गरिबांची अवस्था काय कळेल?

*साकार व्हावी सारी स्वप्ने*
*पोचावे यशाच्या उत्तुंग शिखरी*
*ध्येय,जिद्द अन् चिकाटीने*
*घ्यावी आकाशी उंच भरारी*

आज जग आधुनिक झालं आहे. सुख-सोयींची सर्वच साधनं क्षणात मिळविता येतात. एक आदेश दिला की रूचकर जेवनाचं ताट तुमच्यासमोर असेल. पण त्याचवेळी तुमच्या शेजारच्या झोपडीत कुणीतरी भुकेल्या पोटाने झोपी जायच्या प्रयत्नात असेल.

वचार करा, आपल्या प्रयत्नाने जर त्याची भूक शमविता आली तर त्यातून मिळणारं समाधान लाखो रुपयांना पुरून उरेल. गुलाबी बोचऱ्या थंडीत मखमली दुलईमध्ये स्वतःला झोकून देणा-यांनी फुटपाथवर कुडकुडत रात्र काढणा-या निष्पाप जीवावर मायेने एक ब्लँकेट पांघरले, तर त्यांच्या अंतर्मनातून निघणारा आशीर्वाद लाख तोळे सोन्याच्या तुलनेत केव्हाही मोठाच राहील.

*असता श्रीमंती जवळ*
*नको गर्व कसला मनी*
*सतत करावे दान धर्म*
*व्हावे गरिबांचे ऋणी*

आता समाजाने विशेषतः युवा पिढीने आपला जीवनक्रम बदलायला हवा. मी, माझं घर, माझं आयुष्य या तीन घटकात गुरफटत राहण्यापेक्षा आपलं जीवन इतरांच्या कामी आलं तो क्षणच आनंदाचा क्षण असं समजून या कोमेजलेल्या रोपाला मदतरूपी पाणी देऊन नवीन अंकूर फुलविण्याचा संकल्प करायला पाहिजे.

खरं तर आयुष्याच्या प्रत्येक क्षणात आनंद दडलेला असतो. त्यासाठी फक्त दुसऱ्याच्या सुखासाठी स्वतःच्या सुखाचा त्याग करता यावा लागतो. मग अश्रू हे दुबळ्यांच्या डोळ्याचे वैभव अन् त्याग ही श्रेष्ठ माणसांची संपत्तीच नव्हे का? म्हणून जे व्यक्ती स्वतःचे अश्रू पापण्यांमध्ये लपवून दुस-याच्या ओठावर हसू फुलवितात त्यालाच सर्वजन प्रणाम करतात, याचा विसर पडू देऊ नये.

*सुख-दुःखाच्या वाटेवरती*
*मदतीचा हात द्यावा*
*आपुलकीच्या नात्यांनी*
*जीवन सुंदर व्हावा.*

यासाठी आपल्या मिळकतीचा काही भाग अंधारातही आशेचा किरण शोधणा-यांसाठी खर्च करायला पाहिजे. त्यांना प्रेमाची छाया देऊन समस्यारूपी सूर्याच्या अतिनील किरणांपासून मुक्त करून जगण्याची नवी दिशा द्यायला हवी. अशाप्रकारे त्यांना उध्वस्त जीवनाच्या विळख्यातून बाहेर काढून त्यांचे भविष्य घडवायला हवी. तरच खऱ्या अर्थाने आपल्या वैभवाला अर्थ आहे, नाही तर सारं काही व्यर्थ आहे.

आसपास दिसता गरिबी
माणुसकी दाखवावी
ना उच्च निच कोणी
समानता पसरवावी

# वादाशिवाय साहित्य संमेलन व्हावे!

९९ वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन १ ते ४ जानेवारी दरम्यान सातारा येथे मराठी भाषेतील ज्येष्ठ लेखक पानिपतकार विश्वास पाटील यांच्या अध्यक्षतेखाली होणार आहे. या संमेलनाची तयारी पूर्ण झाली असून साहित्य रत्नांचे स्वागत करायला सातारा नगरी सज्ज झाली असून या संमेलनाची कार्यक्रम पत्रिकाही नुकतीच जाहीर करण्यात आली आहे. तब्बल ३२ वर्षानंतर सातारा येथे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन होणार आहे. सातारा हे केवळ ऐतिहासिक वारसा आणि निसर्गसौंदयासाठीच प्रसिद्ध नाही तर साहित्य आणि कला यांचे केंद्र म्हणूनही प्रसिद्ध आहे.

छत्रपती शिवाजी महाराजांचा वारसा लाभलेले हे शहर मराठी साहित्याच्या या महाकुंभाचे आयोजन करण्यास सज्ज झाले आहे. राज्य सरकारमध्ये कॅबिनेट मंत्री असलेले शिवेंद्रराजे भोसले हे या साहित्य संमेलनाचे संमेलनाचे स्वागताध्यक्ष असून महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व अजितदादा पवार हे देखील या साहित्य संमेलनाला उपस्थित राहणार आहे.

हे साहित्य संमेलन महाराष्ट्र साहित्य परिषद, शाहूपुरी शाखा व मावळा फाऊंडेशन यांच्या मार्फत आयोजित केले जात आहे. या साहित्य संमेलनात मोठ्या संख्येने राजकीय नेते उपस्थित राहण्याची शक्यता आहे. राजकीय नेत्यांसोबत साहित्य रसिकही या संमेलनाला मोठ्या संख्येने उपस्थित राहणार आहेत. केवळ महाराष्ट्रातूनच नव्हे तर देशातील अनेक राज्यातून मराठी साहित्य रसिक या साहित्य संमेलनाला हजेरी लावेल असा विश्वास आयोजकांना आहे. साताऱ्यात होणारे हे साहित्य संमेलन मराठी साहित्य रसिकांना पर्वणीच ठरणार आहे.

यावेळच्या साहित्य संमेलनाला मोठ्या प्रमाणात रसिक भेट देतील यात शंका नाही त्यामुळेच साताऱ्यात होणारे हे साहित्य संमेलन ऐतिहासिक ठरेल यात शंका नाही. या साहित्य संमेलनात विविध विषयांवर परिसंवाद, चर्चा तसेच भरगच्च कार्यक्रम होणार आहे.

संमेलनाचे अध्यक्ष विश्वास पाटील यांच्या भाषणाकडे साहित्य वतुर्ळाचे लक्ष लागून राहिले आहे. संमेलनात सांस्कृतिक कार्यक्रमाची रेलचेल असणार आहे तसेच अनेक ठराव करण्यात येणार आहे.

मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्यानंतर होणारे हे पहिलेच साहित्य संमेलन असल्याने या साहित्य संमेलनाचे वेगळे महत्व आहे त्यामुळेच हे साहित्य संमेलन कोणत्याही वादाशिवाय पार पडेल अशी अपेक्षा साहित्य रसिक व्यक्त करीत आहेत. साहित्य संमेलन आणि वाद हे समीकरण गेल्या काही वर्षापासून बनले आहे. हे समीकरण यावेळी तरी बदलावे, या साहित्य संमेलनाला कोणत्याही वादाचे गालबोट लागू नये अशी अपेक्षा साहित्य रसिक व्यक्त करीत आहेत.

अजून तरी या साहित्य संमेलनाविषयी कोणताही वाद उत्पन्न झाला नाही ही आनंदाची बाब आहे. असेच वादाविना साहित्य संमेलन पार पडावे. साहित्य संमेलन म्हणजे सारस्वतांचा मेळा वारकरी ज्या प्रमाणे पंढरपूरची वारी न चुकता करतात त्याप्रमाणे साहित्यिकही न चुकता संमेलनाला हजेरी लावतात.

साहित्य रसिकही साहित्यिकांचे मत, विचार, चर्चा ऐकण्यासाठी आतुर असतात पण दरवेळी नको त्या विषयावर वाद होतो आणि त्या वादाच्या छायेतच साहित्य संमेलन पार पडते. त्यामुळे साहित्य संमेलनाचा मूळ उद्देशच भरकटतो. माध्यमात देखील त्या वादावरच चर्चा होते त्यामुळे साहित्य रसिकांचा मोहभंग होतो.



**श्याम ठाणेदार**
**दौंड. जिल्हा पुणे.**
**९९२२५४६२९५**

त्यामुळे वादा शिवाय साहित्य संमेलन पार पडेल याची दक्षता आयोजकांनी घ्यावी. याशिवाय संमेलन आणखी लोकप्रिय होऊन तरुणाई या साहित्य संमेलनाकडे कशी आकर्षित होईल याचाही विचार आयोजकांनी करावा. आजचे तरुण सोशल मीडियाचा अधिकाधिक वापर करतात.

तरुण वर्गाला साहित्य संमेलनामध्ये आकर्षित करायचे असेल आयोजकांनी साहित्य संमेलनाला समाज माध्यमांशी जोडावे. आयोजकांनी साहित्य संमेलनाचे सर्व अपडेट फेसबुक, इंस्टाग्राम, व्हॉट्सअप, ट्विटर या सारख्या समाज माध्यमांवर द्यावीत म्हणजे तरुणाईत देखील साहित्य संमेलन लोकप्रिय होईल.

छत्रपती शिवाजी महाराजांचा वारसा लाभलेल्या साताऱ्यात होत असलेल्या हे ९९ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन लोकप्रिय होऊन कोणत्याही वादाशिवाय पार पडेल ही अपेक्षा . ९९ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाला मनापासून शुभेच्छा!

# सोशल मीडियाचा वाढता वापर धोकादायक

आजच्या परिस्थितीत सोशल मीडिया किंवा मोबाईल मानवी शरीरावर स्लोपॉयझनचे काम करीत असुन घणाघाती प्रहार करीत आहे व संपूर्ण दिनचर्येवर अंकुश लावत आहे. आज लहानांपासून तर मोठ्यांपर्यंत सर्रास सोशल मीडियाचा वाजवीपेक्षा जास्त वापर होतांना दिसत आहे. यामुळे लहान मुलांचे बालपण हिरावण्याचे मोबाईलसह सोशल मीडिया करीत आहे ही अत्यंत गंभीर बाब आहे. जिथे गरज नाही तीथेही सोशल मीडियाचा वापर दिसून येतो.

आज फक्त ऑस्ट्रेलिया, स्वीडनमध्येच नाही तर संपूर्ण जगात टिव्ही आणि मोबाईलच्या अती वापरामुळे म्हणजेच सोशल मीडियामुळे दुष्परिणामाला सुरूवात झाली आहे.कारण टीव्ही आणि मोबाइलने लहान मुलांसह संपूर्ण मानवजातीला कौटुंबिक नाते तोडून आपलेसे करून ठेवले आहेत. यामुळे लहान मुलांचे बालपण हिरावले आहे.टिव्हि आणि मोबाइलचा दुष्परिणाम लहान मुलांवर मोठ्या प्रमाणात होऊन पुढील आयुष्यासाठी धोका निर्माण करण्याचे चिन्ह स्पष्ट दिसत आहे.

यामुळे अनेक नवीन –नवीन आजार जन्म घेऊ शकतात आणि घेत आहे.आधुनिक काळात लहान मुले रडायला लागली की आई-वडिल त्यांच्या हातात मोबाईल देऊन त्यांना शांत करण्याचा प्रयत्न केला जातो आणि ही प्रथा जगातील अनेक देशांमध्ये आहे.

याचा दुष्परिणाम स्वीडनमध्ये व ऑस्ट्रेलियामध्ये दिसायला लागला आहे. त्यामुळे आता स्वीडनमध्ये दोन वर्षांखालील मुलांना मोबाइल, टीव्ही पाहण्यास बंदी घालण्यात आली आहे. तर ऑस्ट्रेलियामध्ये १६ वषार्खालील मुलांच्या सोशल मीडिया वापरावर बंदी घालण्यात आली आहे.एका पाहणीनुसार १३ ते १६ वयोगटातील स्वीडिश किशोरवयीन मुले शाळेबाहेर पडल्यानंतर दररोज सरासरी साडेसहा तास मोबाइल, टीव्हीवर घालवत आहेत.

८ तासांपेक्षा जास्त वेळ स्क्रीनवर अमेरिकेतील किशोरवयीन मुले घालवत आहेत. ही बाब भविष्यासाठी अत्यंत घातक आहे.देशांच्या आरोग्य संस्थेच्या मते मोबाईल आणि टिव्ही स्क्रीनचा वापर शारीरिक आणि मानसिक आरोग्यावर नकारात्मक परिणाम करीत असल्याने लहान मुलांना डिजिटल मिडिया आणि टेलिव्हिजन पासुन पूर्णपणे दुर ठेवले पाहिजे.

मोबाईल, टीव्हीच्या अतिवापरामुळे कौटुंबिक संवाद आणि शारीरिक व्यायाम बंद झाले आहे.आपण म्हणतो रबालपण देगा देवा !रपरंतु आज आपले बालपण मोबाईल आणि टिव्हीने हिरावून घेतले आहे ही अत्यंत चिंताजनक आणि घातक बाब आहे. स्मार्टफोन दिवसेंदिवस छोट्या-छोट्या बालकांसाठी व युवावर्गासाठी घातक सिद्ध होत.

त्याचप्रमाणे शाळांमध्ये व ऑनलाईन शिक्षणप्रणालीमध्ये विद्यार्थीवर्ग मोबाईलचा मोठ्या प्रमाणात वापर करीत आहे व यांचे दुष्परिणाम हळूहळू सामोरं येतांना दिसत आहे.एक वर्षांवरील मुलं रडतात म्हणून आई-वडील मुलांच्या हातात मोबाईल देवुन आपली सुटका करून घेतात. याचेही दुष्परिणाम हळूहळू समोर येतांना दिसत आहे.

याचेच प्रायश्चित्त आज स्वीडिश व ऑस्ट्रेलियन किशोरवयीन मुले भोगत आहेत.ही परिस्थिती फक्त स्वीडनमध्ये किंवा ऑस्ट्रेलियामध्येच नाही तर भारतासह संपूर्ण जगात आपल्याला पहायला मिळते.यामुळे जगातील संपूर्ण शाळांनी मोबाईलवर बंदी आणावी असा सुचक सल्ला युनेस्कोने सुध्दा दिला आहे.

देशासह जगात डिजिटल क्रांती झाली अवश्य परंतु त्याचा गैरवापर विद्यार्थांच्या व युवकांच्या अंगाशी येतांना दिसत आहे. सोबतच बालवयात आई-वडील मुलांना मोबाइलच्या आहारी टाकतांना दिसतात. स्मार्टफोनमुळे सामाजिक, व्यवहारीक व इतर क्षेत्रात आमूलाग्र बदल झाल्याचे आपल्याला दिसुन येते. आज मोबाईलच्या अतिवापरामुळे कोणीही कोणासोबत समक्ष बोलायला तयार नाही, घरात सर्वसाधारण चर्चा करायला तयार नाही,



**रमेश कृष्णराव लांजेवार**
**स्वतंत्र पत्रकार, नागपूर.**
**९९२१६९०७७९**

कोणत्याही गोष्टीची बोलण्यातून देवाणघेवाण किंवा आदानप्रदान होत नाही.कारण एक वर्षांच्या मुलांपासून ते मोठ्या पर्यंत सर्वच घंटोनघंटे मोबाईलमध्ये व्यस्त असतात. पालक आपल्या जबाबदारीपासुन पळ काढण्यासाठी व अतिलाडामुळे चिमुकले सुध्दा मोबाईलच्या व टिव्हीच्या आहारी गेले आहेत.यामुळे मानसिक आजार वाढण्याची दाट शक्यता आहे आणि वाढत आहे.

मोबाईलच्या गेममध्ये युवावर्ग दिवसेंदिवस फसतांना दिसत आहे.याचे मुख्य कारण म्हणजे भारतात युवावर्ग मोठ्या प्रमाणात मोबाईलच्या आदिन झालेले आहेत. यामुळे त्यांना अनेक व्याधींचा सामना करावा लागतो आहे. शिक्षण क्षेत्रातील डिजिटल क्रांती विद्यार्थांसाठी चिंताजनक असल्याचे मत युनेस्कोच्या अहवालातून समोर आले आहे.

मोबाईलचा अतिरिक्त वापर झाल्याने शैक्षणिक कामगिरी मंदावते.स्क्रीन टाईम वाढल्याने मुलांच्या भावनिक स्थिरतेवर नकारात्मक परिणाम होतो.परिणामी,मुले चिडचिडे व रागीट बनतात असेही युनेस्कोने म्हटले आहे.यामुळे मुलांमधील फिजिकल ॲक्टिविटी दिवसेंदिवस मोठ्या प्रमाणात कमी-कमी होतांना दिसत आहे हा अत्यंत चिंतेचा आणि गंभीर विषय आहे.

देशात ७४ टक्के मुले (११ ते १७ वयोगटातील) रोज ३० मिनीटेही मैदानी खेळ खेळत नाही. त्याचप्रमाणे १६ ते ३४ वयोगटातील ५९ टक्के लोक ऑनलाईन खेळ ३-३ तास खेळण्यात मग्न असतात. म्हणजेच आजची युवा पिढी मोबाईलच्या खेळांमध्ये (गेममध्ये) मोठ्या प्रमाणात मग्न असल्याचे स्पष्ट दिसून येते. यामुळे शरीराला आवश्यकतेनुसार पाहिजे तेवढा व्यायाम मिळत नाही.

डब्लुएचओच्या रिपोर्ट नुसार भारतात ११ ते १७ वयोगटातील ७४ टक्के मुले फिजीकल ॲक्टिव्ह नसल्याचे सांगितले जात आहे. म्हणजेच एका आठवड्यात मुलं १५० मिनिटसुध्दा खेळत नाही किंवा शारीरिक हालचाली ज्या पध्दतीने पाहिजेत त्या पध्दतीने दिसून येत नाही.यावरून स्पष्ट होते की आजचा विद्यार्थीवर्ग व युवावर्ग दिवसेंदिवस डोक्यानी कीतीही हुशार असेल परंतु शारीरिक दृष्ट्या खालावत असल्याचे दिसून येते.

देशातील ४५ टक्के लोक मोबाईलच्या नादामुळे शारीरिक व्यायामाच्या दृष्टीकोनातून ॲक्टिव नसल्याचे दिसून येते. म्हणजे आज बालपणापासुन तर युवा वर्गापर्यंत आणि युवावर्गापासुन तर वयस्कर लोकांना सुद्धा मोबाईलने जखडल्याचे आपण पहातो.

यामुळे शरिराला ज्या पध्दतीने आणि ज्याप्रमाणात व्यायामाची आवश्यकता आणि गरज आहे तो मिळत नसल्याने अनेक व्याधी किंवा आजार बालकांमध्ये, युवावर्गामध्ये व अन्य लोकांमध्ये दिसून येते व यांचा आरोग्यावर मोठ्या प्रमाणात विपरीत परिणाम होत आहे.

आज भारतातच नाही तर संपूर्ण जगात मोबाईल शिवाय जिवन अधुरे असल्याचे सर्वांना वाटते. परंतु मोबाईलचा अती वापर दिवसेंदिवस मानवाच्या दृष्टीकोनातून घातक सिद्ध होत आहे. मानवाच्या मेंदूला (मस्तिष्कला) रक्तपुरवठा व्यवस्थित आणि सुरळीत झाला नाही तर (स्ट्रोक) होण्याचे मोठे कारण ठरू शकते.स्ट्रोक म्हणजे पॅरालिसीसचा अटॅक अथवा लकवा किंवा ब्रेन अटॅक असेही म्हणतात. देशात स्ट्रोकच्या आजाराचे जवळपास ६५ लाख रूग्ण असल्याचे सांगितले जाते.म्हणजेच आजच्या घडीला मोबाईलच्या अती वापरामुळे मानवजाती अत्यंत धोकादायक स्थितीत आल्याचे समजते. ही बाब स्पष्ट होते की मोबाईलच्या अती वापरामुळे लठ्ठपणा, शुगर (मधुमेह), डोळ्यांचा आजार, मानेचा त्रास, मेंदूचा त्रास, हार्टच्या आजारासह अनेक आजार मानवाच्या शरिरात घर करीत आहे. मानवाला मोबाईलमुळे व टिव्हीमुळे जेवढा आनंद मिळतो त्यापेक्षा जास्त धोका आणि गंभीर परिणाम मोबाईल व टिव्हीच्या स्क्रीनमुळे होणाऱ्या आजारामुळे निर्माण होत आहे.

# प्रख्यात इतिहासाचार्य विश्वनाथ काशीनाथ राजवाडे

(३१ डिसेंबर : इतिहासाचार्य वि.का.राजवाडे पुण्यस्मरण विशेष)

------------------------

इतिहासाचार्य विश्वनाथ काशीनाथ राजवाडे हे मराठी इतिहास संशोधक होते. त्यांनी संपादित केलेले मराठ्यांच्या इतिहासाची साधने या ग्रंथाचे २२ खंड हे मराठा साम्राज्य इतिहासाच्या अभ्यासात महत्त्वाचे साधन मानले जाते.

सन १८९८ साली त्यांनी लिहिलेल्या मराठ्यांच्या इतिहासाची साधने या ग्रंथाचा पहिला खंड प्रकाशित झाला. दि. ७ जुलै १९१० रोजी भारत इतिहास संशोधक मंडळाची स्थापना त्यांच्या पुढाकाराने झाली. राजवाडे म्हणायचे- ज्ञानार्जनाची हौस असेल तर माझी मराठी भाषा पाश्चिमात्य लोक शिकतील; माज्या ग्रंथांची पूजा करतील. मी परकीय भाषेत माझा ग्रंथ लिहिणार नाही. मी कीतीर्ला हपापलेला नाही.

वि. का. राजवाडे यांचा जन्म रायगड जिल्ह्यातील वरसई येथे दि. २४ जून १८६३ रोजी झाला. बीएपर्यंतचे शिक्षण झाल्यावर त्यांनी पुण्याच्या न्यू इंग्लिश स्कूलमध्ये काही दिवस शिक्षक म्हणून काम केले. इंग्रजी भाषेतील उत्कृष्ट ग्रंथांचे भाषांतर करून ते प्रकाशात आणण्यासाठी त्यांनी भाषांतर नावाचे मासिक सुरू केले. त्यांच्या जन्माच्या वर्षाबाबत थोडा गोंधळ झालेला दिसतो. त्यांच्याविषयीच्या विविध लेखनांत त्यांचे जन्मवर्ष वेगवेगळे दिलेले आढळते.

राजवाडे यांच्या मृत्यूनंतर द. वा. पोतदार यांनी केसरीत लिहिलेल्या लेखात त्यांची जन्मतिथी आषाढ शु.८ शके १७८६ अशी नोंदवलेली आढळते. यानुसार इ.स.१२ जुलै १८६४ हा दिनांक मिळतो. मात्र त्यांच्या स्मृतिप्रित्यर्थ प्रकाशित झालेल्या ब्राह्मण-पत्रिकेच्या राजवाडे तिलांजली अंकात वा. दा. मुंडले यांनी जे स्पष्टीकरण दिले आहे, त्यानुसार राजवाडे यांनी मुंडल्यांना आपला जन्मशक १७८५ असा सांगितला होता.



**श्रीकृष्णदास (बापू) निरंकारी**
**रामनगर वॉर्ड, गडचिरोली.**
**९४२३७१४८८३**
**krishndas.nirankari@gmail.com**

त्याबाबत मुंडले यांनी पोतदारांकडे विचारणा केली आणि राजवाड्यांचे थोरले बंधू वैजनाथपंतांकडे विचारणा करण्यास सांगितले. त्याप्रमाणे विचारणा केली असता राजवाडे यांची एक जन्मपत्रिका वैजनाथपंतांनी पोतदारांना उपलब्ध करून दिली. ती मुंडलेंच्या लेखात छापली असून त्यावर राजवाड्यांची जन्मतिथी आषाढ शु.८ शके १७८५ अशी नोंदवलेली आहे.

इसवी सनानुसार हा दिनांक २४ जून १८६३ असा आहे. दत्तोपंत पोतदार यांनीही नंतरच्या काळात याच तिथीचा उल्लेख केलेला आढळतो. याव्यतिरिक्त दि.१२ जुलै १८६३ आणि दि. २४ जुलै १८६३ असे दोन दिनांक राजवाडे त्यांच्या जन्मतारखा म्हणून नोंदवलेल्या आढळतात. मात्र त्यांचे आधार नोंदवलेले आढळत नाहीत. त्यामुळे उपलब्ध पुरावे पाहता आषाढ शु.८ शके १७८५ अर्थात दि. २४ जून १८६३ हाच त्यांचा खरा जन्मदिनांक असावा, असे म्हणता येते.

राजवाडे यांच्या नावावर स्वतंत्र असा एकही ग्रंथ नाही. त्यांनी नियतकालिकांमधून किरकोळ स्वरूपाचे लेख लिहिले. महिकावतीची बखर आणि राधामाधव विलास चंपू या प्राचीन ग्रंथांचे संपादन केले. मुख्य म्हणजे मराठ्यांच्या इतिहासाची साधने गोळा करून ती तब्बल बावीस खंडांमध्ये छापली.

त्यांच्यापैकी काही खंडांना प्रस्तावना लिहिल्या. ते संपादनापेक्षा अधिक गाजले ते या प्रस्तावनांमुळे. ज्यांना या प्रस्तावना आवडल्या नाहीत, त्यांनाही त्यांनी अविश्रांत कष्ट घेऊन ऋणी केले. प्रचंड भ्रमंती करून जमा केलेल्या इतिहासाच्या साधनसामग्रीसाठी त्यांच्या ऋणात राहण्यावाचून पर्यायच नव्हता. त्यांनी लिहिलेली राधामाधव विलास चंपू या प्राचीन ग्रंथांचे संपादन त्यांनी केले. असेच त्यांच्या बहुतेक पुस्तकांबद्दल म्हणता येईल.

महाराष्ट्राच्या विचारविश्वात इतिहासाचार्य वि. का. राजवाडे यांचा मोठा दरारा, दबदबा आणि धाक होता. ते आपल्या हयातीतच एक आख्यायिका बनून गेले होते. त्यांच्यावर भरपूर टीका झाली. त्यांच्या हयातीतच प्रबोधनकार के. सी. ठाकरे, विठ्ठल रामजी शिंदे, जिवाजी मंगेश तेलंग यांनी त्यांना चांगलेच धारेवर धरले होते.

नंतरही इतिहास संशोधक त्र्यं. शं. शेजवलकर यांनी राजवाडेंच्या मयार्दा स्पष्ट केल्या. तथापि या सर्व गोष्टी एकत्र केल्या तरी त्यांचे वाक्य न् वाक्य ब्रह्मवाक्य मानणारा एक वर्ग अस्तित्वात होता. विशेष म्हणजे मराठी विचारविश्वात याच वर्गाचे वर्चस्व असल्यामुळे त्यांचे स्थान अबाधित राहिले.

इतिहासकार राजवाडे हे बुद्धिमान तर होतेच; पण त्यांना प्रतिभाशक्तीचीही देणगी लाभली होती. जबरदस्त आत्मविश्वास हे त्यांचे आणखी एक वैशिष्ट्य होते. त्यामुळे साधा अंदाज किंवा कयाससुद्धा ते अशा पद्धतीने व अशा आक्रमकपणाने मांडत, की जणू काही तो त्रिकालाबाधित सत्य असलेला महासिद्धान्तच आहे.

मानवी इतिहास काल व स्थल यांनी बद्ध झालेला आहे. कोणत्याही प्रसंगाचे वर्णन द्यायचे म्हटले म्हणजे त्या प्रसंगाचा परिष्कार विशिष्ट कालावर व विशिष्ट स्थलावर पसरवून दाखवला पाहिजे. काल, स्थल व व्यक्ती या त्रयीची जी सांगड तिलाच प्रसंग वा ऐतिहासिक प्रसंग ही संज्ञा देता येते. अंतिम चित्रण, इतिहासलेखन, भाषाशास्त्र, व्युत्पत्ती, व्याकरण अशा अनेक विषयांवर मूलभूत संशोधन करणारे आणि मराठी भाषेतून लेखन करणारे इतिहासकार म्हणून राजवाडे परिचित आहेत.

मराठ्यांच्या इतिहासाची साधने असे शीर्षक असणारे २२ खंड त्यांनी संपादित केले. त्यांच्या मते इतिहास म्हणजे भूतकालीन समाजाचे सर्वांगीण समग्र जीवनदर्शन होय. केवळ राजकीय घडामोडी, सत्तांतरासाठी कटकारस्थाने आणि युद्धे यांच्याच हकिकती नव्हेत, असे त्यांचे मत होते. अस्सल कागदपत्रांच्याच आधारे इतिहास लिहिला पाहिजे, असा त्यांचा आग्रह होता. अशा या थोर इतिहासाचार्यांचे दि.३१ डिसेंबर १९२६ रोजी निधन झाले.

!! राजवाडेंच्या अचाट अविस्मरणीय स्मृतींना विनम्र अभिवादन!!

# नागपुरात आघाडीत बिघाडी

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ३० :
नागपुरात महापालिका निवडणुकीतील अर्ज भरण्याच्या शेवटच्या दिवशी महाविकास आघाडीत बिघाडी झाली आहे. राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे नेते व माजी गृहमंत्री अनिल देशमुख यांनी काँग्रेसवर जाणीवपूर्वक हा प्रकार केल्याचा आरोप केला आहे.

नागपुरात पहिल्या दिवसापासून काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) आणि शिवसेना (उद्धव ठाकरे गट) यांची महाविकास आघाडी होणार असल्याचे बोलले जात होते. त्यानुसार तिन्ही पक्षांच्या नेत्यांच्या स्थानिक पातळीवर सातत्याने बैठका झाल्या.

काँग्रेस शहराध्यक्ष आमदार विकास ठाकरे यांच्यासोबत झालेल्या बैठकीत उद्धव ठाकरे यांची शिवसेना आणि शरद पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसला प्रत्येकी १२ ते १५ जागा सोडण्याचे संकेत दिल्याचा दावा शरद पवार गटाकडून करण्यात आला होता. यासाठी मागील निवडणुकीत कोणी किती मते घेतली होती, तसेच कोणाचे किती नगरसेवक निवडून आले होते, हे निकष लावले जाणार असल्याचेही सांगण्यात आले होते.

मात्र, निवडणूक अर्ज भरण्याच्या शेवटच्या दिवशी महाविकास आघाडीतील काँग्रेस आणि शरद पवार गटात फारकत झाली आहे. त्यामुळे शरद पवार गटाने एबी फॉर्म देऊन त्यांच्या उमेदवारांना अर्ज भरण्यास सांगितले आहे.

नागपुरात अखेरच्या क्षणी शरद पवार गट राष्ट्रवादी आणि काँग्रेसची आघाडी तुटल्याच्या मुद्द्यावर अनिल देशमुख म्हणाले, नागपूर महानगरपालिकेमध्ये राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) आणि काँग्रेस पक्षाच्या आघाडीबाबत गेल्या चार-पाच दिवसांपासून चर्चा सुरू होती. मात्र काँग्रेस पक्षाने रात्री तीन वाजता एकतर्फी युती तोडली. त्यामुळे आता आम्ही आमच्या पद्धतीने एबी फॉर्म आमच्या उमेदवारांना वाटप करून निवडणूक लढवत आहोत.

काँग्रेसकडून हे सर्व जाणीवपूर्वक व ठरवून केल्याचे दिसत आहे. मागील काही दिवसांत चार-पाच वेळा आमच्या अध्यक्षांसह इतर सहकाऱ्यांच्या काँग्रेसच्या स्थानिक नेत्यांसोबत बैठका झाल्या. त्यामध्ये यादी अंतिम होऊन दोन्ही पक्षांच्या नेत्यांच्या सह्याही झाल्या होत्या. यादीही निश्चित झाली होती. मात्र काँग्रेसकडून अचानक रात्री तीन वाजता आघाडी तुटल्याचे सांगण्यात आले.

हे सगळे नियोजनबद्ध पद्धतीने झालेले दिसत आहे.ह्व दरम्यान, आता दोन्ही पक्षांची आघाडी तुटली असली तरी काँग्रेस आणि शिवसेना (उद्धव ठाकरे गट) यांची आघाडी आहे की तीही अडचणीत आहे, याबाबत वृत्त लिहेस्तोवर स्पष्ट झाले नव्हते.

# राष्ट्रवादीच्या कार्यालयाची कार्यकर्त्यांकडून तोडफोड

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ३० :
महापालिका निवडणुकीसाठी अर्ज भरण्याच्या शेवटच्या दिवशी कार्यकर्त्यांचा रागाचा बांध अखेर फुटला. अनेक वर्षे पक्षासोबत प्रामाणिक राहूनही उमेदवारी नाकारल्याने संतप्त कार्यकर्ते उघडपणे आपली नाराजी व्यक्त करत आहेत.

कुठे नेत्यांच्या घरावर मोर्चा तर कुठे पक्ष सोडण्याची धमकी दिली जात आहे. काही ठिकाणचे कार्यकर्ते उमेदवारी नाकारल्यामुळे पक्षकार्यालयासमोर आत्मदहनाचा इशारा देत आहेत. त्यामुळे नेत्यासमोरही अडचण निर्माण झाली आहे.

नागपूरमध्ये राष्ट्रवादी काँग्रेस अजीत पवार गटाच्या एका कार्यकर्त्याने चक्क कार्यालयामध्ये तोडफोड केली आहे. यामध्ये कार्यालयातील मालमत्तेचे प्रचंड हानी झाली आहे.



महापालिका निवडणुकीच्या निमित्ताने राज्यातील राजकीय समीकरणांमध्ये मोठा बदल पाहायला मिळत आहे. ठाकरे बंधूंच्या युतीनंतर आता काका-पुतण्यांनीही एकत्र येण्याचे ठरवले आहे. पुणे व पिंपरी चिंचवड महापालिका निवडणुकीसाठी राष्ट्रवादी काँग्रेसच्या दोन्ही गटांनी अखेर युतीची घोषणा केली आहे. स्थानिक पातळीवर झालेल्या या युतीमुळे दोन्ही पक्षांतील विलिनीकरणाच्या चर्चांनी जोर अधिकच धरला आहे.

१५ जानेवारीला होणाऱ्या महापालिका निवडणुकांसाठी भाजपाने शिवसेना शिंदे गटाबरोबर युती केली. यादरम्यान अजित पवार यांच्या नेतृत्वाखालील पक्षाला त्यांनी युतीत घेतले नाही. त्यामुळे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षासमोर मोठे आव्हान निर्माण झाले होते. राज्यभरात भाजपाचा प्रभाव आणखीनच वाढला, तर महायुतीत आपले वजन कमी होईल, अशी भीती त्यांना सतावत होती.

मात्र, नागपूर महापालिकेमध्ये अजीत पवार गटा महायुतीपासून वेगळा आहे. भाजपसोबत त्यांची चर्चा झाली असली नागपूर हा भाजपचा बालेकिल्ला असल्याने राष्ट्रवादीला अधिकच्या जागा देण्यास नकार दिला. त्यामुळे राष्ट्रवादीने स्वतंत्र लढण्याचा निर्णय घेतला. मात्र, पक्षाला कार्यकर्त्यांचे समाधान करता आले नाही.

राष्ट्रवादी काँग्रेसचे गणेशपेठ येथे कार्यालय आहे. याठिकाणी उमेदवारी दिली जात आहे. यासाठी बाहेरील प्रभारीही आले आहेत. यावेळी अविनाश मार्डिकर या कार्याकत्यार्ला पक्षाने उमेदवारी नाकारली असता त्याने संतप्त होत सामानाची तोडफोड केली. यावेळी एक संगणक आणि खिडक्यांची काचेही तुटली. यामुळे प्रचंड नुकसान झाले आहे. पक्षाचे अनेक कार्यकर्ते अद्यापही नाराज आहेत.

# तिकीट नाकारल्याने फुटला अश्रूंचा बांध

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ३० :
महापालिका निवडणूक अर्ज भरण्यासाठी शेवटचा दिवस शिल्लक असताना भाजपने उमेदवारांची यादी जाहीर केली नसली तरी काहींना संपर्क करून अर्ज दाखल करण्याच्या सूचना दिल्या आहेत. त्यामुळे उमेदवारांची नावे समोर येताच भाजपच्या कार्यकर्त्यांमधील असंतोष बाहेर येत आहे.

पक्षामध्ये नव्याने प्रवेश करणाऱ्यांना संधी दिली जात असून अनेक वर्षांपासून पक्षासाठी काम करणाऱ्या निष्ठावंतांना डावलले जात असल्याचा आरोप होत आहे. भाजपच्या अनेक निष्ठावंतांनी केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या जनसंपर्क कार्यालयात भेट घेत आपली नाराजी व्यक्त केली. तर काहींनी पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांचा ताफाही अडवला होता.

प्रभाग १५ रामदासपेठमधील कमल मोहता यांनी सांगितले की, मी चाळीश वर्षांपासून रामदासपेठ परिसरातील नागरिक आहे. माझे कार्यकर्ते माझा सोबत आहेत. मुलाखतीमध्ये सर्व म्हणाले की कमलाताई या आमदारकीच्या उमदेवार आहेत. असे असतानाही मला साधी नगरसेवकाची उमेदवारी दिली जात नाही. मी गडकरींकडे नाराजी बोलून दाखवली आहे.

भाजप पदाधिकारी दिनेश गावंडे यांनी ही नाराजी माध्यमांसमोर बोलून दाखवली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या विधानसभा दक्षिण पश्चिम विधानसभा मतदारसंघात हा प्रभाग १५ धरमपेठ परिसरात येतो. मुख्यमंत्र्यांच्या परिसरातील स्थानिक निष्ठावान कार्यकर्त्यांनी बाहेरच्या पक्षातून आलेल्या नवीन लोकांना उमेदवारी दिली जात असल्याची नाराजी व्यक्त केली आहे.

प्रभाग १५ मधून उमेदवारी न मिळाल्याने एका इच्छुक महिला उमेदवाराला अश्रू अनावर झाले. माझ्या लहान मुलाला आईकडे ठेवून मी पक्षाचे काम केले. सतरंजी उचलण्यापासून आम्ही काम करणारे आहोत. एक हजार सदस्य केले. पदवीधर मतदारसंघाचेही अर्ज भरले. इतके काम करूनही पक्षाने उमेदवारी न देता बाहेरच्या लोकांना संधी दिली आहे. गडकरींची भेट घेऊन आपली नाराजी बोलून दाखवल्याचे त्यांनी सांगितले.

# आमदार खोपडेंच्या पुत्रालाही नकार

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ३० :
नागपूर पूर्व विधानसभा मतदारसंघात भाजपचे उमेदवार कृष्णा खोपडे यांनी एक मोठा विक्रम केला आहे. पूर्व नागपूर विधानसभा मतदारसंघातील भाजपचे उमेदवार कृष्णा खोपडे यांनी सर्वाधिक १ लाख १३ हजार २८६ मतांनी विजय मिळवला होता. जो नागपूर जिल्ह्यातील सर्वाधिक मतांचा विजय ठरला.

यावेळी खोपडे मुलगा रोहित खोपडे यांनी महापालिकेसाठी उमेदवारी मागितली होती. मात्र, वडिलांना मंत्री पद न देणाऱ्या भाजपने रोहित खोपडेंना उमेदवारीही नाकारली आहे. मुलाला उमेदवारी मिळावी अशी खोपडेंची इच्छा होती. परंतु, पक्षाने रोहित खोपडेंना उमेदवारी नाकारल्याने नाराज रोहित यांनी भाजपच्या प्राथमिक सदस्यत्वाचा राजीनामा दिला आहे. खोपडेंवर होणाऱ्या अन्यायाची चर्चा राजकीय वर्तुळात सुरू आहे.

# कमळ - धनुष्यबाण स्वतंत्र लढणार



■ महासागर प्रतिनिधी
अमरावती, दि. ३० :
महापालिका निवडणुकीसाठी जागावाटपाविषयी भाजप आणि शिवसेना शिंदे गटात सुरू असलेली बोलणी अंतिम क्षणी फिस्कटली असून शिंदे गटाने सर्व जागा स्वबळावर लढण्याचा निर्णय घेतला आहे.

दोन्ही पक्षांमध्ये गेल्या काही दिवसांपासून चर्चा सुरू होती. तब्बल सहा बैठका झाल्या. शिवसेना नेते आणि मंत्री संजय राठोड, माजी आमदार अभिजीत अडसूळ यांच्यासह शिवसेनेचे नेते बैठकीला उपस्थित होते. पण, युतीसंदर्भात मतैक्य होऊ शकले नाही. अभिजीत अडसूळ यांनी युवा स्वाभिमान पक्षाचे नेते रवी राणा यांच्यावर टीका करीत युती तुटल्याचे जाहीर केले.

अभिजीत अडसूळ म्हणाले, महापालिका निवडणुकीसाठी शिवसेना शिंदे गटाने ज्या जागा मागितल्या होत्या, त्या आम्हाला मिळाल्याच नाहीत. परिणामी, आम्ही स्वतंत्र लढणार असल्याचे त्यांनी सांगितले.

## धान भरडाई करीता होणाऱ्या वीज खर्चाची
# उच्चस्तरीय चौकशी करा

■ महासागर प्रतिनिधी, गडचिरोली, दि. ३० :
जिल्ह्यात सिएमआर मिलींग मध्ये मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार होत असल्याचे धक्कादायक वास्तव आहे. सिएमआर मिलींग करणारे राईसमिलर्स शासकीय धान खरेदी केंद्रावरुन उचल केलेल्या धानाची भरडाई न करता परस्पर खुल्या बाजारात विक्री करून शासनाला खाण्यास अयोग्य तांदळाचा पुरवठा करीत असल्याचे धक्कादायक वास्तव वारंवार समोर येत आहे.

त्यामुळे भरडाई करीता उचल केलेल्या धानाची संबंधित राईसमिलर्सने भरडाई केली अथवा नाही करीता धान भरडाई करीता प्रत्यक्षात वापर होत असलेल्या वीज युनिट खर्चाची उच्चस्तरीय चौकशी करण्यात आल्यास मोठे घबाड उघडकीस येण्याची दाट शक्यता लक्षात घेता चौकशी करण्याची मागणी देसाईगंज सिटीझन फोरमचे अध्यक्ष किशोर कऱ्हाडे यांनी अन्न,नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाचे प्रधान सचिव यांचेकडे केली आहे.

गडचिरोली जिल्ह्यात किमान आधारभूत किंमत खरेदी योजनेंतर्गत शेतकऱ्यांकडून खरेदी केलेला धान जिल्ह्यातील राईसमिलर्सना भरडाई करीता देण्यात येतो.त्यापासून तयार झालेला तांदूळ शासकीय गोदामात जमा करून सार्वजनिक वितरण प्रणालीच्या माध्यमातून गोरगरीबांना वाटप करण्यात येतो.

मात्र वाटप करण्यात येत असलेला तांदूळ मानवी खाण्यास अयोग्य, दोन ते तीन वर्ष जुना राहात असल्याने पुरवठा करण्यात येत असलेल्या तांदूळ बाहेर राज्यातून आयात केलेला तसेच खुल्या बाजारातून खरेदी करून शासनाला पुरवठा करण्यात येत असल्याची शक्यता नाकारता येत नाही.

पणन हंगाम २०२५-२६ मध्ये खरेदी केलेल्या धानाची भरडाई व राईस फोर्टिफिकेशन बाबत अन्न,नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग महाराष्ट्र राज्य मंत्रालय मुंबई,शासन परिपत्रक क्रः-धानभ-१३२५/प्र.क्र.१८३/नापु.२९ दि.२० नोव्हेंबर २०२५ च्या परिपत्रकातील मुद्दा क्रमांक ५.१७ नुसार प्रती क्विंटल धान भरडाई करीता सर्वसाधारणपणे किमान ०.८ युनिट वीज खर्च होत असल्याची खातरजमा करावी असे परिपत्रकात नमुद आहे.

परंतु पणन हंगाम २०२० -२१ मध्ये खरेदी केलेल्या धानाची भरडाई व राईस फोर्टिफिकेशन बाबत अन्न,नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग महाराष्ट्र राज्य मंत्रालय मुंबई,शासन परिपत्रक क्र.:-धानभ-१२२०/प्र.क्र.१५७/नापु.२९ दि.२१ ऑक्टोबर २०२० च्या परिपत्रकातील मुद्दा क्र. ७७ नुसार राईसमिल मध्ये भरडाईचे काम प्रत्यक्षात होते हे तपासण्यासाठी प्रती क्विंटल धान भरडाई करीता सर्वसाधारणपणे १.५ युनिट वीज खर्च होत असल्याने त्या बाबीच्या आधारे शहानिशा करावी असे परिपत्रकात नमुद आहे.

प्रत्यक्षात एक क्विंटल धान भरडाई करीता १.५ ते २.० युनिट वीज खर्च होत असतांना ०.८ वीज युनिट खर्च होत असल्याचे कोणत्या कारणाने सबब तयार केले याची सखोल तपासणी करण्यात यावी व शासकीय धान भरडाई करणाऱ्या राईसमिलर्सला फायदा पोहचवण्याकरीता शासन परिपत्रकात चुकिची दुरुस्ती करणाऱ्या दोषी अधिकाऱ्यावर निलंबनाची कारवाई करावी तसेच त्रयस्थ विभागाच्या उच्च अधिकाऱ्यामार्फत प्रत्यक्ष भरडाईची तपासणी करून १ क्विंटल धान भरडाई करीता किती युनिट वीज खर्च होते याची तपासणी करण्याची मागणी केली आहे. याबाबत अन्न,नागरी पुरवठा विभाग मंत्रालय मुंबईचे प्रधान सचिव काय कारवाई करतात याकडे येथील नागरीकांचे लक्ष लागून आहे.

# कलेचा वापर निसर्ग संवर्धनासाठी करणारा प्लॅस्टिकवाला

कचऱ्याचं कलेमध्ये रूपांतर करण्याचा विचारच किती सुंदर आहे. हाच विचार घेऊन मनवीर सिंगने त्याच काम सुरु केलं आणि आता त्या कामाला त्याने आपल्या जीवनाचे ध्येय बनवले आहे.

प्लॅस्टिकवाला म्हणून मनवीर सिंग या कलाकाराची ओळख आहे. त्याने २०१८ मध्ये आपल्या कामासाठी कामी न येणार प्लॅस्टिक वापरायला सुरु केलं. गेल्या ३ वर्षात या दिल्लीच्या तरुण कलाकाराने २५० किलो फेकून दिलेल्या, वापरात नसलेल्या प्लॅस्टिकला वेगळ रूप देत वापरण्याजोग तयार केलं आहे.



लोकमानस

आपल्या या प्रकल्पाबद्दल बोलताना तो सांगतो की, लँडस्केप पेंटिंग्ज तयार करताना मला लक्षात आले की, नैसर्गिक लँडस्केपचे प्लॅस्टिकस्केप मध्ये रूपांतर होत आहे. हे रुपांतर अर्थातच नकारात्मक होते. आणि म्हणूनच निर्सगावरती कलाकृती तयार करण्यापेक्षा निसगार्साठी कलाकृती तयार करण्याचा निर्णय मी घेतला. मनवीरच्या प्लॅस्टिकपासून बनवलेल्या ३ कलाकृती दुसऱ्या देशात विकल्या गेल्या आहेत.

एक जर्मनी तर दोन अबू धाबीमध्ये कलाकृती विकल्या गेल्या आहेत. मनवीरने जानेवारी २०२० मध्ये अबू धाबी राष्ट्रीय प्रदर्शन केंद्र, फेब्रुवारी २०२० मध्ये अबू धाबीच्या मनारत अल सादियात सांस्कृतिक केंद्र, गोवा संग्रहालय आणि अशा अनेक ठिकाणी आपल्या कलाकृती सादर केल्या आहेत. मनवीर सांगतो की, ह्ममी कलाकृती करण्यासाठी मुख्यतः आरआयसी क्रमांक ७ असलेले एमएलपी किंवा प्लॅस्टिक वापरतो.

मल्टी लेयर्ड पॅकेजिंग (एमएलपी), ज्याला मल्टी लेयर्ड प्लॅस्टिक देखील म्हणतात. ही एक अशी सामग्री आहे जी प्लॅस्टिकच्या एका थरात मुख्य घटक म्हणून कागद, कागद बोर्ड, पॉलिमरिक मटेरियल, मेटलिस्ड सारख्या साहित्याच्या जागी वापरली जाते. ज्याला कॅनव्हासवर काम करण्यास शिकवले गेले आहे अशा व्यक्तीसाठी, प्लॅस्टिकसह काम करणे सुरुवातीला आव्हानात्मकच होते.

तेल, ॲक्रेलिक रंग आणि इतर माध्यमांचा कलाकृती बनवण्यासाठी कसा उपयोग करावा हे आपल्याला शैक्षणिक पद्धतीने शिकवले जाते. पण प्लॅस्टिकचा माध्यम म्हणून वापर करणे एक आव्हान आहे. हे प्लॅस्टिक माध्यम म्हणून वापरण्यासाठी मी खूप चाचण्या केल्या. त्यात काही त्रुटीसुद्धा आल्या. तसेच प्लॅस्टिक कचरा गोळा करण्याचेही आव्हान होते. सुरुवातीला प्लॅस्टिक कचरा मिळवण्यासाठी मी खूप संघर्ष केला. असं मनवीर सांगतो. एकूणच, प्लास्टिकच्या कचऱ्यापासून कलाकृती साकारणारा मनवीर हा खऱ्या अर्थाने पर्यावरण रक्षक आहे अस म्हणता येईल. ■ ■

# उद्योग क्षेत्रातील प्रतिभावंताचा इंडिया आयटीएमई पुरस्काराने सन्मान




भारतीय आंतरराष्ट्रीय वस्त्र यंत्रणा प्रदर्शन सोसायटी (इंडिया आयटीएमई सोसायटी) ने मुंबईतील एका उच्च-स्तरीय उद्योग मेळाव्यात आयटीएमई तंत्रविषयक अवॉर्ड्स २०२५ च्या तिसऱ्या आवृत्तीचे आयोजन केले. वस्त्रोद्योग अभियांत्रिकी क्षेत्रासाठी ही महत्त्वपूर्ण घटना ठरली.

आयटीएमी सोसायटीचे चेअरमन केतन संघवी यांच्या नेतृत्वाखालील या कार्यक्रमात उद्योगातील वरिष्ठ नेते, धोरणकर्ते, शिक्षणतज्ञ, तंत्रज्ञ आणि खादी ग्रामोद्योगच्या मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीमती रूप राशी महापात्रा एकत्र आले.

या कार्यक्रमाच्या शुभारंभावेळी बोलताना केतन संघवी म्हणाले की, या वर्षी आम्हाला मिळालेल्या प्रतिसादामधून भारताच्या वस्त्रोद्योग अभियांत्रिकी उद्योगाचे उज्ज्वल भविष्य स्पष्टपणे दिसून येत आहे. तरुण नवोन्मेषक नवीन कल्पना, प्रबळ इच्छाशक्ती आणि स्टार्टअप मानसिकतेसह नेतृत्व करताना दिसत आहेत. इंडिया आयटीएमई सोसायटीमध्ये, आम्हाला या प्रतिभावंतांना त्यांची स्वप्ने पूर्ण करण्यासाठी एक व्यासपीठ उपलब्ध करून दिल्याचा अभिमान आहे.

इंडिया आयटीएमईने वस्त्रोद्योग अभियांत्रिकी, नवोपक्रम, शाश्वतता आणि तांत्रिक उत्कृष्टतेमधील उत्तम योगदानासाठी व्यक्ती, कंपन्या आणि विद्यार्थ्यांना सन्मानित केलं आहे. या पुरस्कारर्थी मध्ये इंडिया आयटीएमई तंत्रविषयक पुरस्कार २०२५ च्या विजेत्यांमध्ये वस्त्रोद्योग अभियांत्रिकी आणि तंत्रज्ञान विजेता, प्रक्रिया आणि सजावट ,यमुना मशीन वर्क्स, अत्याधुनिक वस्त्रोद्योग अभियांत्रिकी तंत्रज्ञानयमुना मशीन वर्क्स, वस्त्रोद्योग अभियांत्रिकी आणि तंत्रज्ञान विजेताः महिला नेतृत्व सन्मान, श्रीमती अमोली शाह, प्रशांत गामटेक्स प्रा. लि., सार्वोत्कृष्ट पर्यावरणपूरक रूपरेषा (विद्यार्थी श्रेणी) सौरव बॅनर्जी, वस्त्रोद्योग अभियांत्रिकी आणि तंत्रज्ञान विजेता, वस्त्रोद्योग आणि संबंधित क्षेत्रे : झायडेक्स इंडस्ट्रीज प्रायव्हेट लिमिटेड, शाश्वतता-केंद्रित संस्था, झायडेक्स इंडस्ट्रीज प्रायव्हेट लिमिटेड, सर्वोत्तम सीएसआर उपक्रम, वस्त्रोद्योग अभियांत्रिकी कंपनी : प्रशांत गामटेक्स प्रा. लि.,सर्वोत्तम पर्यावरणपूरक रूपरेषा (विद्यार्थी श्रेणी) विजेती : कु. भाग्यश्री खाडे, वस्त्रोद्योग अभियांत्रिकी आणि तंत्रज्ञान विजेता, ॲक्सेसरीज : मॅकस्टील वायर हील्ड्स प्रा. लि., मेक इन इंडिया कार्यक्रमांतर्गत यशस्वी तंत्रज्ञान हस्तांतरण आणि उत्पादन, रिटर इंडिया प्रा. लि.सर्वोत्तम सीएसआर उपक्रम, प्रादेशिक वस्त्रोद्योग किंवा वस्त्रोद्योग अभियांत्रिकी उद्योग संघटना : जोधपूर हँडीक्राफ्ट आदींचा समावेश होता. ■ ■

## ..असा लागला शोध मेणबत्ती



मेणबत्तीचा शोध एका व्यक्तीने लावलेला नाही, तर ती एकामागून एक सुधारणा करत विकसित झाली आहे; प्राचीन इजिप्शियन लोकांनी वेताचा गाभा वापरून मेणबत्तीसारखे दिवे बनवले, तर पुढे तंतुमय वातीचा शोध लागल्यावर वितळलेल्या मेणात किंवा चरबीत ती बुडवून अधिक चांगल्या मेणबत्त्या तयार होऊ लागल्या, ज्यामुळे मेणबत्ती बनवण्याच्या तंत्रज्ञानात मोठा बदल झाला.

सुमारे ३००० वर्षांपूर्वी इजिप्शियन लोक वेताच्या गाभ्याला द्रव चरबीत बुडवून 'रश कँडल' बनवत असत, जे मेणबत्तीचे प्रारंभिक रूप होते. जेव्हा तंतुमय वातीचा शोध लागला, तेव्हा वितळलेल्या मेण किंवा चरबीत ही वात बुडवून मेणबत्त्या बनवणे युरोपमध्ये मेणबत्त्या बनवण्यासाठी वितळलेल्या मेणात वात बुडवणे किंवा वातीभोवती मेण गुंडाळणे यांसारख्या पद्धती वापरल्या जात होत्या. पुढे पॅराफिन वॅक्स सारख्या नवीन पदार्थांच्या शोधानंतर, साच्यांमध्ये ओतलेल्या आधुनिक मेणबत्त्या तयार होऊ लागल्या, ज्यामुळे उत्पादन मोठ्या प्रमाणावर करणे शक्य झाले. थोडक्यात, मेणबत्ती हा एकाच व्यक्तीचा शोध नसून, हजारो वर्षांच्या काळात अनेक लोकांनी त्यात सुधारणा करत ती आजच्या स्वरूपात आणली आहे. ■ ■

: संकलन व संयोजन :
सुबोध रणशेवरे, ९८३३१४६३५६
subodh.ranshevre @rediffmail.com

# नेत्यांसमोर मुजरा केल्याशिवाय कार्यकर्त्यांचे भले नाही बावा...

■ महासागर प्रतिनिधी, अमरावती, दि. ३० :
सर्व राजकीय पक्ष सारखेच आहेत. या पक्षांमध्ये नेत्यांच्या समोर मुजरा केल्याशिवाय कोणत्याही कार्यकर्त्याचे भले होत नाही, येथेही हीच परिस्थिती बघितल्याने निराश झालो.

माझ्यासोबत अनेक कमिटमेंट करण्यात आल्या, त्या काही वैयक्तिक नव्हत्या. ज्या लोकांनी मला अनेक वर्षांपासून साथ दिली, त्यांच्यासाठी मी या कमिंटमेंट स्वीकारल्या होत्या. पण, बोलणी झाल्यानंतर लगेच गोष्टी बदलत होत्या. पक्षात प्रवेश घेतल्यापासून ते आतापर्यंत वारंवार हे होत असल्याने आपण शिवसेना पक्ष (शिंदे गट) सोडण्याचा निर्णय घेतला असून उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे आपण पक्षसदस्यत्वाचा राजीनामा पाठवला आहे, असे माजी राज्यमंत्री जगदीश गुप्ता यांनी मंगळवारी सकाळी पत्रकार परिषदेत जाहीर केले.



जगदीश गुप्ता म्हणाले, कोणत्याही राजकीय पक्षावर माझा विश्वास राहिलेला नाही. फोफावत असलेल्या या व्हीआयपी संस्कृतीला तोडण्यासाठी मी शिंदे गटात प्रवेश घेतला होता. १९९० ते २००० पर्यंत राजकीय नेत्यापर्यंत पोहचण्यासाठी कोणत्याही मध्यस्थाची गरज पडत नव्हती. पण, नंतर ती परंपरा तुटली. मी आऊट डेटेड राजकारणी झालो आहे. आजच्या राजकारणात माझ्यासारख्या कार्यकर्त्याला स्थान नाही. त्यामुळे आता कोणत्याही पक्षात जायचे नाही, हा निर्णय मी घेतला आहे. त्या निर्णयावर मी ठाम असल्याचे गुप्ता म्हणाले.

# भाजपामध्ये मोठे नाराजी नाट्य
## इच्छुक महिला भोवळ येऊन कोसळली

■ महासागर प्रतिनिधी
अकोला, दि. ३० :
अकोला महापालिका निवडणुकीमध्ये तिकीट वाटपावरून भाजपमध्ये प्रचंड नाराजी नाट्य रंगले आहे. उमेदवारी अर्ज दाखल करण्याच्या शेवटच्या दिवशी माजी महापौर विजय अग्रवाल यांच्या निवासस्थानी इच्छूक कार्यकर्त्यांनी प्रचंड गोंधळ घातला.

यावेळी एक इच्छूक महिला कार्यकर्ता भोवळ येऊन कोसळली. इच्छुकांच्या डोळ्यातील अश्रू अनावर झाले होते. शिस्तबद्ध पक्ष म्हणून ओळखला जाणाऱ्या भाजपमध्ये प्रचंड गोंधळ उडाल्याने खळबळ उडाली आहे.

अकोला महापालिकेच्या २० प्रभागातील ८० जागांसाठी निवडणूक प्रक्रिया सुरू आहे. सोमवारी अनेक इच्छुकांनी आपले अर्ज दाखल केले. अधिकाधिक जागा पदरात पाडूण घेण्याचे नेत्यांचे प्रयत्न होते. राष्ट्रवादी अजित पवार गटाने भाजपसोबत हातमिळवणी करण्याचा निर्णय घेतला.

अकोला महापालिकेच्या १४ जागा राष्ट्रवादी लढणार असल्याचे सांगण्यात आले. आज अर्ज दाखल करण्याचा शेवटचा होते.

भाजपने उमेदवारांना एबी फॉर्मचे वाटप करून अर्ज दाखल करण्याच्या सूचना केल्या. पक्षाने दिलेले उमेदवारांची नावे समोर येताच इच्छुकांमध्ये प्रचंड अस्वस्थता पसरली. भाजपने अनेक प्रस्थापितांचे तिकीट कापून नव्यांना संधी दिली.

महापालिका निवडणूक लढण्यासाठी जोमाने तयारी करूनही ऐनवेळी पक्षाने उमेदवारी नाकारल्याने इच्छुकांमध्ये प्रचंड नाराजी आहे. या नाराजीतूनच काही इच्छुकांनी थेट माजी महापौर विजय अग्रवाल यांचे निवासस्थान गाठले. त्या ठिकाणी काही इच्छुकांनी प्रचंड गोंधळ घातला.


यावेळी एक इच्छूक महिला भोवळ येऊन कोसळली. त्यामुळे काही काळ वातावरण तंग झाले. नाराज इच्छुकांची समजूत काढण्याचा प्रयत्न भाजप नेत्यांनी केला. भाजपने निलंबित केलेल्या काही पदाधिकाऱ्यांना देखील परत पक्षात प्रवेश दिला आहे.

# आणि उमेदवार अर्जच विसरला...

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ३० :
मुंबईतील एका पक्षाच्या उमेदवारासोबत एक विचित्र प्रसंग घडला आहे. हा उमेदवार आपल्या समर्थकांसह वाजंत्री घेऊन उमेदवारी अर्ज भरण्यासाठी निवडणूक कार्यालयात पोहोचला. पण ऐनवेळी उमेदवारी अर्जच आपण आणला नसल्याची बाब त्याच्या लक्षात आली.

उमेदवारी अर्ज भरण्याच्या प्रक्रियेला आज शेवटच्या दिवशी मुलुंड, भांडुप व विक्रोळी परिसरात चांगलाच रंग चढला. टी आणि एस वॉर्डाच्या निवडणूक कार्यालयांबाहेर उमेदवार आणि त्यांच्या समर्थकांनी शक्तिप्रदर्शन करत अर्ज भरण्यास सुरुवात केली. या गदारोळात एका पक्षाचा उमेदवार शक्तिप्रदर्शन करत निवडणूक कार्यालयात पोहोचला. पण तो फॉर्मच विसरल्याने कार्यकर्त्यांत काही काळ हास्याचा फवारा उडाला.

एका पक्षाचा उमेदवार गोवंडी, मानखुर्द, भांडुप, सोनापूर येथील कार्यकर्त्यांना घेऊन शक्तिप्रदर्शन करत निवडणूक कार्यालयाबाहेर पोहोचला. आत जाण्यापूर्वी त्याने आपल्या सहकाऱ्यांना अरे फॉर्म कुठाय? असा प्रश्न केला. त्यावर गोंधळ उडाला. अखेर चौकशीअंती उमेदवारी अर्ज घेऊन येणारा कार्यकर्ता गर्दीत मागेच राहिल्याची बाब त्यांच्या लक्षात आली. नंतर कार्यकर्ते अर्ज घेवून आले आणि फॉर्म भरला गेला.

स्व. कुंदाताई गंगाधर देशमुख
(माजी ग्रामपंचायत सदस्य व आशा स्वयंसेविका)
मृत्यू दिनांक ३१ डिसेंबर २०२४

|| प्रथम पुण्यस्मरण ||

तुमच्या आठवणींचा सुगंध आमच्या जीवनात सदैव दरवळत राहील. तुमच्या समाजसेवेचा वारसा आम्ही असाच पुढे नेऊ. तुमच्या पवित्र स्मृतीस विनम्र अभिवादन!

शोकाकुल
मुले व सुना
विशाल आणि सरिता देशमुख
सुहास आणि स्नेहा देशमुख
मुलगी व जावई
सौ. वनश्री आणि श्री. जितेंद्र डोरले
नातवंडे: ल्युकेश्वरी, मितांशी आणि महर्थ: